**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६४७/०२**

**डॉ.मदनलाल हिरालाल सिसोदिया**
**३० चैत्रबन कॉलनी, महाबळ, जळगांव.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा २)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा २)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ.मदनलाल सिसोदिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०८.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

पदोन्नतीचे निकष बदलल्याबाबत अनुषंगिक एकून १७ मुदयावर अपिलार्थी यांनी माहिती मागीतली होती. अर्जातील मुद्‌दा क्रमांक २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ व १३ या बाबी कार्यालयाशी निगडीत नाहीत. या मुद्‌दयाबाबतची माहिती शासन स्थरावरुन प्राप्त करुन घ्यावी. मुद्‌दा क्र.१० मधील माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद जळगांव यांचेकडून उपलब्ध करुन देणेबाबत. कार्यालयाचे स्थरावरुन सुचना देण्यात आल्या आहेत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपिलार्थी यांना कळविले. कोणताही आदेश मिळाला नाही. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलार्थी यांनी व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी एकूण १७ मुद्दयावरील माहिती मागितली आहे. सदर माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणारी प्राधिकरणे वेगवेगळी आहेत. त्याचा तपशिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना कळविला. तसेच अपिलार्थी यांना शासकीय माहिती अधिकारी म्हणून सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उद्देशून अर्ज केला. तथापि अपिलार्थी यांचा अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव यांचेकडून कार्यालयात प्राप्त असल्याचेही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणले. अपिलार्थी यांनी दि.२८.०२.२००६ च्या अर्जान्वये मागणी केलेले मुद्दे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विविध सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असल्याचे दिसून येते. सर्व संबंधीत माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी यांना संबधीत प्राधिकरणाकडे संपर्क साधणे आवश्यक वाटते. अपिलार्थी यांच्या अर्जातील काही मुद्दयाची माहिती शासन स्तरावरुन सार्वजनिक आरोग्य विभागाने उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे दिसते. जसे विशेष प्रशिक्षण घेतलेल्या अधिका-याकडून शासनाच्या अपेक्षा काय आहेत. Non NPA पदावरुन किती अधिका-यांच्या बदल्या २००० ते २००२ या वर्षात केल्या. गट ब मधील शासकीय अधिका-यांना शासकीय निवासस्थान मिळण्यासाठी काय निकष आहेत. अशा शासनाशी संबंधीत सर्व मुद्दयाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव/सेवा-२ यांनी अपिलार्थी यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ०९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७१३/०२**

**श्री.एल.एस.कोल्हे**
**मु.पो.ता.कोपरगांव इंदिरापथ, कोपरंगाव,**
**जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एल.एस.कोल्हे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांचकडे, अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२००८ रोजी अर्ज करुन श्री.सी.डी.फकीर, मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांच्या करारपध्दतीने केलेल्या नेमूणूकीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहितीपोटी एकूण रु.३४/- ची मनीऑर्डर विभागाकडे पाठवावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना दि.२१.११.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दिनांक ०५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. दि.२७.१०.२००८ च्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना आवश्यकती माहिती पाठविण्यात आली आहे. आवश्यक माहितीच्या छायाप्रतीसाठी रु.३४/- ची मनीऑर्डर विभागाकडे पाठवावी असे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी

दि.१७.१२.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविले. रु.३४/- ची मनीऑर्डर पाठविली परंतू माहिती मिळाली नाही. मनीऑर्डर परत केली असल्याच्या कारणावरुन अपिलार्थी यांनी व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना या पदावर नियुक्त करण्यात आलेले श्री.सी.डी.फकीर यांच्या नियुक्तीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना खालीलप्रमाणे दि.२१.११.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली.

देशात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सन २००० पासून राबविण्यात येत आहे. योजनेची कार्यक्षमपणे अंमलबजावणी होण्यासाठी राज्याने स्वतंत्र अधिकारी वर्ग नियुक्त करावा या केंद्र शासनाच्या सुचनेनुसार राज्यस्तरावर मुख्य अभियंत्याचे एक पद व विभागीय स्तरावर अधीक्षक अभियंत्यांची ६ पदे अशी एकूण ७ पदे निर्माण करुन ही पदे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून किंवा कंत्राटी पध्दतीने भरण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. राज्यस्तरावर विहित नियमानुसार श्री.सी.डी.फकीर, मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांची करार पध्दतीने नियुक्ती केली आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१५.०२.१९९५ मधील तरतुदीनुसार करण्यात आली आहे. या नियुक्तीस शासनाची मान्यता घेण्यात आली असून त्यांना प्रतिमाह रुपये ३०, ०००/- वेतन दिले जात आहे. त्यांची करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी दि.१९.०१.२००९ पर्यंत आहे.

वर नमुद केल्यानुसार अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यात आली आहे. माहिती संबंधीच्या कागदपत्राच्या छायाप्रतीकरिता रु.३४/- एवढया रक्कमेची मनीऑर्डर विभागाकडे पाठविण्याबाबत जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविले होते. अपिलीर्थी यांनी रु.३४/- इतक्या रक्कमेची मनीऑर्डर विभागाकडे पाठविली होती. ती परत आली असा अपिलार्थी यांनी व्दितीय अपीलात मुध्द उपस्थित केला आहे. तसेच मागीतलेली माहिती आता मोफत द्यावी अशी अपिलार्थीने मागणी केली आहे. रु.३४/- इतक्या शुल्काचा अपिलार्थी यांनी भरणा केलेला नाही असे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपाद केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत कार्यवाही केली असल्याचे दिसते. मोफत

माहिती पुरविण्याची अपिलार्थी यांची मागणी मान्य करता येत नाही. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.११.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविले असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. माहितीच्या छायाप्रतीकरिता अपिलार्थी यांनी रु.३४/- इतक्या रक्कमेचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ०५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६५१/०२**

**श्री.के.आर.गांगुर्डे**
**अध्यक्ष तरूण नवयुवक विकास मंडळ रायतेल,**
**पो.देवजीपाडा, जि.धुळे.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह/उपसचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.के.आर.गांगुर्डे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केलेल्या तक्रारीवरील केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती अपिलार्थी यांनी मागीतली होती. अपिलार्थी यांनी सदर तक्रारी वरील कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी म्हणून मा.उप मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली होती. माहिती विहित वेळेत प्राप्त झाली नाही. म्हणून अपिलार्थी यांनी प्रथम अपील राज्यसभा अध्यक्ष यांचकडे केले. अपील अर्जातील विषय विधानमंडळ सचिवालयाशी संबंधीत नसूत तो मा.उप मुख्यमंत्री यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्याने अपील अर्ज विधानमंडळाच्या जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांचेकडे दि.१७.०९.२००७ च्या पत्रान्वये परत पाठविला. यामुळे व्यथीत होउन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

"भ्रष्टाचाराचे ओझे खादयांवर घेउन नोक-या करु देणार नाही" अशी मा.उप मुख्यमंत्र्यांची बातमी दि.१७.०४.२००७ च्या दैनिक लोकमत वृतपत्रात प्रसिध्द झाली. अपिलार्थी यांनी बातमी वाचली. त्यानुसार गृहखात्याशी संबंधीत पोलीस विभागाचे कर्मचा-यांनी भ्रष्टाचार करणा-यांना पाठीशी घालून भ्रष्टाचारासारखे कर्तव्य केले. त्याप्रकरणी तत्कालीन मा. उप मुख्यमंत्री यांचेकडे अपिलार्थीने अर्ज केला होता. अपिलार्थी यांनी मा.उप मुख्यमंत्री यांचेकडून माहिती मागीतली होती असे दिसते. मा.उप मुख्यमंत्री महोदयाकडे अपिलार्थी यांना सादर केलेली तक्रार विभागात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी गृह विभागाकडून अपिलार्थीना माहिती पुरविता आली नाही असे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०८.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६५२/०२**

**मेजर. श्री.एस.एस.संधु**
**संधु सेवा, मु.पो.मोहांडी,**
**जि. धुळे ४२३ ३११.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यानगरी**
**मिठठीबाई ठाकरे रोड,**
**मुंबई ४०० ०२०.**

**जन माहिती अधिकारी,**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यानगरी**
**मिठठीबाई ठाकरे रोड,**
**मुंबई ४०० ०२०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार मेजर (सेवानिवृत्त) श्री.एस.एस.संधू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी अनुपस्थित होते.

श्रीमती.एस.के.सीमा हया प्राद्यापक (इंग्रजी) म्हणून महिला महाविद्यालय, देवपूर, जिल्हा धुळे येथे दिनांक ०६.११.१९९५ पासून कार्यरत आहेत. त्यांच्या सेवा विषयक बाबी संबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित वेळेत दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपिलार्थी यांना मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

<u>**आदेश**</u>

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०६.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६५३/०२**

**श्री.वसंतराव जेसा चव्हाण**
**नितीन नगर, जि.नंदूरबार.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.वसंतराव चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी उपस्थित होते.

सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ देवपूर जिल्हा धुळे या संस्थेस अनामत घेण्याची परवानगी मिळविण्यासाठी धर्मादाय आयुक्ताकडे केलेला अर्ज व त्यावर धर्मादाय आयुक्तांनी दिलेल्या आदेशाची सही शिक्यानिशी नक्कल उपलब्ध करुन देणेबाबत दि.२३.०२.२००७ रोजी अपिलार्थी यांनी अर्ज केला होता. कागदपत्राचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. कागदपत्र प्राप्त होताच कार्यालयीन फी भरुन घेउन अपिलार्थी यांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविले होते. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नाही. यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचकडे दि.१०.०४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिकारी यांनी दि.२५.०६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली आदेश पारित केले नाहीत.  यामुळे व्यथीत होउन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत  माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची सदर क.ती निश्चीत योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ०६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/२६४९/०२**

**श्री. बापुसाहेब पालवे** **------ अपीलकर्ता**
**मध्यवर्ती कारागृह, न्यायालयीन बंदी क्र.५००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,** **------- उत्तरवादी**
**सामान्य प्रशासन विभाग (१८ अ) मंत्रालय मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**सामान्य प्रशासन विभाग (१८ अ) मंत्रालय मुंबई ३२**

**- विवेचन -**

अपिलार्थी श्री. बापुसाहेब पालवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २.०६.२००८ रोजी व्दीतीय अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दिनांक १.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. १८.०७.२००७ रोजी केलेल्या अर्जाबाबत काय निर्णय घेण्यात आला याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अर्जातील मुद्या क्र. ६,७,९,१० व ११ बाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना दि. २३.१२.२००८ च्या पत्रानुसार दिली यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. ३.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली. विहीत वेळेत माहिती दिली नाही अर्जातील मुद्या क्र. ३,६,७ बाबत माहिती दिली नसल्याचा अपिलार्थी यांनी व्दितीय अपीलात मुद्या उपस्थित केला आहे. मुद्या क्र.३ मध्ये विचारलेली माहिती अन्य शासकीय प्राधिकरणाच्या म्हणजे अप्पर पोलीस महासंचालक गुन्हे अन्वेशन विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कामकाजाशी निकट संबंधीत आढळून आल्याने अपिलार्थीचा अर्ज त्या

मुद्यावर गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकरी यांनी अपिलार्थी यांना दि. ७.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले मुद्या क्र. ६ मध्ये नमूद केलेल्या दि. १८.०५.२००७ ते १२.०६.२००७ या कालावधीचे मासीक वेतन त्यांच्या रजेचा निर्णय प्रलंबित असल्याने त्यावेळी त्यांना अदा करण्यात आले नव्हते. रजेच्या कालावधीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर धनादेश क्र. ३९४२३९, दि. २८.०५.२००९, रक्कम रु. १९५८९ अपिलार्थी यांना अदा केली. दि. १.०५.२००७ ते १७.०५.२००७,दि.१३.०६.२००७ ते २९.०६.२००७ व दि. ३०.०६.२००७ ते दि. १२.०७.२००७ या कालावधीचे वेतन पूर्वीचे देण्यात आले असण्याची माहिती दि.२३.१२.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना देण्यात आली. सदरबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी अहवाल आयोगास सुनावणीचेवेळी सादर करुन निदर्शनास आनली आहे. अर्जातील मुद्या क्र. ७ हा संबंधीत नसल्याचे कारण देऊन अपीलकारास याबाबत माहिती दिलेली नाही असे दिसून येते. सदर मुद्यानुसार मागितलेली माहिती कोणत्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत आहे त्या संबंधीत प्राधिकरणाकडे आवश्यक कारवाईकरिता हस्तांतरीत करुन तसे जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना कळविणे आवश्यक होते. याबाबत जन माहिती अधिका-यांची विहित वेळेत कारवाई केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती योग्य नाही. जन माहिती अधिका-यानी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत मुद्या क्रमांक ७ बाबत संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाची प्रत हस्तांतरित करावी. तसे अपिलार्थी यांना कळवावे.

**आदेश**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-६/०६/२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/२६५४/०२**

**श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल ------ अपीलकर्ता**
**रा.बोदबड मेनरोड जि.जळगांव.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय शहीद भगतसिंग मार्ग कुलाबा मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय शहीद भगतसिंग मार्ग कुलाबा मुंबई**

**- विवेचन -**

अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०५.२००७ रोजी व्दीतीय अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दिनांक १.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

लोकशाही दिनाचे कार्यपध्दतीची अचुक व पूर्ण माहिती द्यावी अशी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ३.०३.२००७ रोजी अर्ज करुन माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १४.०३.२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना कळविले की माहितीपोटी रु.४३/-एवढे शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. यामुळे समाधन झाले नसल्याने अपीलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि. ४.०४.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती दिली. यामुळे व्यथीत होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले.

अपिलार्थी यांना लोकशाही दिनाच्या कार्यपध्दतीबाबत माहिती हवी असल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येते. माहितीपोटी आवश्यक शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना कळविले होते. अपिलार्थी यांनी आवश्यक शुल्क भरले नसल्यामुळे त्यांना जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत,लोकशाही दिन व मुख्यालय दिन कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संबंधीच्या दिनांक २९.१२.१९९९ च्या परिपत्रकाच्या प्रती अपिलार्थी यांना टपालाने मोफत पुरवाव्यात.

**आदेश**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-६/०६/२००९.**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र.अपील/२००९/२६५०/०२

श्री. करीमखा सरदारखा पठाण -----अपीलार्थी
मेवाती मुसलमान पंच, कसाली मोहल्ला मोतीटेक,
अमळनेर, जिल्हा जळगांव.

विरुध्द

१. सचिव -----उत्तरवादी
मा.मुख्य माहिती आयुक्त कार्यालय
राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई ३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
मा.मुख्य माहिती आयुक्त कार्यालय
राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई ३२.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. करीमखा सरदारखा पठाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१/२/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर Video Conferncing वर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या कार्यालयात दि. १/६/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणा-या अपीलाचे प्रमाण मोठे असून प्रलंबित अपीले निकाली काढण्याच्या दृष्टीने राज्य माहिती आयोगाच्या नाशिक खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक २९/७/२००८ रोजी आयोजित करण्यात आला होता.

१. अपीलार्थी यांचे अपीलाची नियमाप्रमाणे नोटीस न काढता दि. २९/७/०८ रोजी ज्या नियमान्वये अपीलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात आले त्या नियमाची माहिती अपीलार्थीनी मागितली होती.

२. तसेच जी अपीले प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी मान्य केल्यानंतर सुध्दा आयोगाकडून फेटाळण्यात आले यावरुन प्रथम अपिलीय अधिकारी पण अकार्यक्षम ठरत नसल्यास कोणत्या नियमान्वये

३. औरंगाबाद माहिती आयुक्त एका दिवसात फक्त पाच अपीले निकाली काढतात. विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत एका दिवसात पन्नास द्वितीय अपीले निकाली काढण्यात येतात. यावरुन औरंगाबाद माहिती आयुक्त हे अकार्यक्षम ठरत नसल्यास कोणत्या नियमान्वये याबाबत अपीलार्थीनी माहिती मागितली होती. याबाबत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

राज्यात कार्यरत राज्य माहिती आयोग/ मुख्य माहिती आयोग यांचे **Stetus Independent** आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे द्वितीय अपीलाचे प्रलंबित प्रमाण मोठे आहे. राज्यातील नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने विशेष अपील निर्गत कार्यक्रम आयोजित करुन द्वितीय अपीले निकाली काढण्यात आली. राज्य माहिती आयोगाकडील प्रलंबित अपीलाचे प्रमाण मोठे असल्याचे लक्षात घेऊन जास्तीत जास्त द्वितीय अपीले निकाली काढल्याबाबत आयोगाकडून विविध उपाययोजना अमलात आणणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणून विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अधिकात अधिक द्वितीय अपीले एका दिवसात निकाली काढण्यात येत आहेत. सदर कारवाई नियमास अनुसरुनच करण्यात येते. यामध्ये कांही गैर नाही. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक ६/६/२००९

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४०६/०२**

**श्री.अब्दुल हमीद मिस्त्री**
**रा.अब्दुल हमीद मिस्त्री चाळ,**
**१ ला माळा, रूम नं.१, कुरारगांव,**
**मालाड (पू, मुंबई ४०० ०९७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमिअभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, १० वा माळा,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक**
**भूमिअभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, १० वा माळा,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अब्दूल हमीद मिस्त्री यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२३.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.११.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागीतली होती.

१) मौजे कुरारगाव मालाड येथील स.नं.२३/१ च्या मिळकती संदर्भात श्री.दिना प्रमोद बलदोटा यांचे नाव कसे दाखल झाले. त्यांनी सदर मिळकतीचा एन.ए.तयार करुन घेतला होता का? त्याची प्रत त्यांनी जमिनीचा धारा शेतसारा भरल्याबाबतचा पुरावा.

२) महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २५८ प्रमाणे जमिनीचा वहीवाटदार मालक असतांना अपिलार्थी यांच्या नावाने मिळकत कार्ड का देण्यात येत नाही. याबाबतचा खुलासा.

३) श्री.बलदोटा यांनी स.नं.२३/१ च्या मिळकती संदर्भात कोणेकोणती कागदपत्र सादर केलेली आहेत. त्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती.

४) स.नं.२३/१ मधील २५९२६ एवढया क्षेत्रफळास इमला मालक म्हणून अपिलार्थीच्या वडीलांची नोंद आहे. तर जमीन मालक म्हणून नोंद का केली नाही. तशी नोंद अपिलार्थी यांच्या नावाने करुन त्याप्रमाणे मिळकत उतारा मिळाला नाही.

जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना दिनांक २४.१२.२००८ रोजी पत्र पाठवून माहितीपोटी रु.२०६/- इतके शुल्क भरुन आवश्यकती माहिती घेउन जाणेबाबत कळविले. त्यानुसार अपिलार्थी यांनी कार्यालयात दि.१२.०१.२००९ रोजी रु.२०६/- शुल्क भरुन माहिति प्राप्त करुन घेतले. अर्जातील मुध्दा क्र.१ ते ४ ची पुर्तता झाली असल्याने काही तक्रार राहिलेली नाही असे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०१.२००९ रोजी समक्ष लिहून दिले. दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थी यांनी दि.०५.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. वर नमुद केल्यानुसार अपिलार्थी यांना माहिती पुरविली असल्याने प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडून प्रथम अपिलावर निर्णय न झाल्याबदल अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांना दिनांक १२.०१.२००९ रोजी माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतीपादन केले. परंतू अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेल्या माहितीच्या प्रती आयोगास सादर केल्या नाहीत. यावरुन अपिलार्थी यांना मागणीप्रमाणे माहिती पुरविली किंवा कस याचा बोध होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपिलार्थी यांचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ०८.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७१६/०२**

**श्री.हेमचंद्र जगन्नाथ काळे**
**३१, समर्थ कॉलनी, एम.जे.रोड,**
**जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमचंद्र काळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार अनुपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य (मुंबई प्रांतातील) सर्व जन जमिनीची नोंद दर्शविणारे सर्व विभागाचे शासन निर्णयाच्या सर्व प्रती, नंतर बदल केलेल्या फेरफाराच्या माहिती सह साक्षांकित प्रती, शा.नि.क्र.१३ एफ, दि.०१.०३.१८७९/७४३० अ व ७४३० दि.०१.१२.१८९०/३३ एफ दि.०७.०३.१८७९/१२९५ दि.११.०३.१८७९ च्या प्रती, गॅझेट, अधिसूचना, न्यायालयीन निर्णय, वन जमीन कराराने दिल्या असल्यास कराराच्या प्रती, अटी शर्तीसह, नियमभंगाबाबत गुन्हा दाखल केल्याच्या सर्व प्रती, नगरपालिका व महानगरपालिका हद्दीतील वन जमिनीची ठरावाव्दारे वाटप किंवा वीव्हेवाट लावलेल्या वन जमिनीची माहिती. राज्याची माहिती संकलीत करुन द्यावी अशी अपीलकाराने दि.१३.०३.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिका-याकडे माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलीय

प्राधिका-याकडे दि.१३.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास पुरवावयाच्या माहितीचे कागदपत्राच्या प्रती/संख्या काढून विहित दराप्रमाणे रक्कम अदा करुन माहिती घेउन जाण्याबाबत दि.२४.०३.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. अपीलकाराने मागीतलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. निश्चित संदर्भ किंवा क्षेत्राबाबत उल्लेख नाही. त्यामुळे कार्यासनातील मागणी केलेल्या विषयाशी साधर्म्य साधणा-या सर्व नस्त्याची / प्रतीची संख्या जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०३.२००८ च्या पत्रान्वये कळविली. प्रथम अपीलाच्या सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते. प्रथम अपीलावरील निर्णय दि.२६.०५.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविण्यात आला असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास दि.२४.०३.२००८ च्या पत्रान्वये माहिती मिळाली आहे. व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिताही अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७१४/०२**

**ॲड. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर**
**जितुर कॉलनी सेलू, जि.परभणी ४३१ ५०३. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**सर पोचखानवाला मार्ग, वरळ, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**सर पोचखानवाला मार्ग, वरळ, मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार ॲड. श्रीकांत वाईकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.१२.२००८ रोजी अर्ज करुन सर्व्हे क्र.३ मधील गैरवाटपाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.२३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे सर्व्हे क्र.३ मधील भूखंडाचे गैरवाटपाबाबत खालील अनुषंगीक माहिती मागीतली होती.

१. सर्व्हे क्र.३ मधील भुखंड वाटपाचा दि.१५.०४.२००५ चा ठराव क्र.१०२ हा इतर विषयातील ठराव क्र.६ व्या क्रमांकावर असूनही जिल्हाधिकारी, परभणी यांनी तो तक्रारीनंतरही रद्यबादल ठरविला नाही.

२. महाराष्ट्र नगर परिषद व औद्योगीक नगर अधिनियम १९६५ च्या कलम ९२ प्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नसतांना जिल्हाधिकारी परभणी यांनी चौकशीत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने तसेच त्यांनी अहवालात खोटी माहिती दिल्याबद्दल श्री.रघुवंशी यांनी आपल्या कार्यालयात पुराव्यासह दिलेल्या तक्रारीवर संचालनालयाने काय कार्यवाही केली.

३. सर्व्हे क्र.३ मधील भुखंड वाटप हे ९९ वर्षाच्या लिजवर वाटप केल्याचे जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवालात नमुद केले आहे. सर्व बनावट कागदपत्रे व बॉन्ड ची पुराव्यासह माहिती देउनही जिल्हाधिकारी, परभणी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही.

४. शासनाची भूखंड वाटपास कोणतीही परवानगी नाही. इतर विषयातील ठराव क्र.६ असतांना तसेच बनावट व खोटी कागदपत्रे तयार केलेली असतांना जिल्हाधिकारी, परभणी यांनी ते रद्द केले नाही इत्यादी अनुषंगीक बाबी संबंधी माहिती मागीतली होती. जिल्हाधिकारी यांनी खोटा अहवाल अशी तक्रार केली आहे. जिल्हाधिकारी यांचे नजीकचे नियंत्रण अधिकारी म्हणून सदरची तक्रार चौकशीसाठी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडे नगर परिषद प्रशासन संचालनालयाने पाठविली आहे. याबाबत अपीलकारास विहित मुदतीत कळविले आहे. तसेच विभागीय आयुक्त यांना पाठविलेल्या पत्राची प्रत अपीलकारास दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित

करावी व आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपीलकारास राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७१९/०२**
**अपील क्र.२००९/२७२०/०२**

**श्री.हेमंत माणिकलाल छाजेड**
**६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,**
**जळगांव ४२५ ००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमंत माणिकलाल छाजेड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने दिनांक ०१.०१.२००८ रोजी सादर केलेल्या संघटनेच्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती पुरविण्याची दि.२४.०३.२००८ रोजी अर्ज करून विनंती केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने दि.०१.०१.२००८ रोजी सादर केलेल्या संघटनेच्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर

दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संघटनेच्या दि.०१.०१.२००८ च्या निवेदनावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १५.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७२१/०२**

**श्री. वाकेकर रतन रावजी**
**रा.रमानगर नागसेन बौध्द विहारासमोर,**
**गल्ली क्र.(३), क्रांती चौक एरिया, औरंगाबाद ४३१ ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-५)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-५)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. वाकेकर रतन रावजी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी औरंगाबाद उप संचालक, आरोग्य सेवा मंडळातून उप संचालक, आरोग्य सेवा लातूर या मंडळात त्यांची बदली केल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२३.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदर अपीलावर दिनांक.२०.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. आदेश पारित करण्यात आले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांची बदली उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळातून उप संचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळात दि.१७.०६.२००१ च्या आदेशान्वये केली. लातूर मंडळातून औरंगाबाद मंडळात

बदली करण्याबाबत अपिलार्थी यांनी वेळोवेळी विनंती अर्ज केले आहेत. परंतू अपिलार्थी यांची बदलीची विनंती मान्य करण्यात आली नाही. यामुळे अपिलार्थीवर अन्याय केला अशी त्यांची भावना झाली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलार्थी यांची लातूर मंडळातून औरंगाबाद मंडळात बदली करण्याची विनंती विचारात घ्यावी.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१०/०२**

**श्री. अजित अर्जुन घोरपडे**
**१३९/४/१, शाहुनगर,**
**गोडोली, सातारा.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,**
**पुणे, स्वारगेट, पुणे ४०० ०३७.**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,**
**पुणे, स्वारगेट, पुणे ४०० ०३७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजित घोरपडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२२.०४.२००८ रोजी अर्ज करुन मा.उच्च व मा.सर्वाच्च न्यायालयाचे मार्गदर्शक ठरणारे व निर्णय असणारे AIR Judgement च्या साक्षांकित छायाप्रती प्रमाणित प्रती व अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी कमी असणारी साधनसामग्री या कामाकरिता प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(९) अन्वये माहिती नाकारली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.१०.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकार अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार श्री.ढाणे व श्री.कणसे या व्यक्तीच्या नस्ती शोधून अपीलकारास

त्याच्या प्रती विनामुल्य पाठविल्या. विलंबाने माहिती प्राप्त झाल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास उप विभागीय अधिकारी यांनी कुणबी जातीचा दाखला देण्यास नकार दिला. अपीलकारातील काही कागदपत्राच्या नोंदी मराठा जातीच्या आहेत. त्यामुळे त्यांचे प्रकरण पोलीस दक्षता पथकाकडे अधिक चौकशीसाठी पाठविले होते. पोलीस दक्षता पथकाने संपर्क करुनही अपीलकाराने दक्षता पथकास सहकार्य केले नाही. अपीलकाराचे सदर प्रकरण हे प्रशासकीय कामकाजाचा भाग आहे. असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास लेखी कळविले. अपीलकाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास विनामुल्य पुरविण्यात आल्या आहेत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१२/०२**

**श्री. शरद बाबुराव पाटील**
**प्लॉट नं.१०/७६अ/१, बाबू पार्क,**
**वाठार-कोडोली राज्यमार्ग क्र.१२६ लगत,**
**बहिरेवाडी, पो.वारणानगर,**
**ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर ४१६ ११३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. शरद पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.१२.२००८ रोजी अर्ज करुन विद्यमान मा.मंत्री विनय कोरे यांनी, "भारतीय सेना निधी" नावाने कोणत्याही पूर्व परवानगी शिवाय वृतपत्रात अहवाल देउन निधी गोळा करुन निधी लंपास करणेचे गैरहेतूने निधी स्वत:चे नियंत्रणातील संस्थात ठेवला. बँकात बराच कालावधीसाठी ठेउन शासनाकडे / सक्षम व्यवस्थेकडे न देणे कारणे फौजदारी दाखल होणेबाबत / बेकायदेशिर गोळा केलेले साहित्य परस्पर विल्हेवाट लावलेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहिती अधिकारात माहितीसाठी विभागाच्या माहिती अधिका-याकडे (जसे अवर सचिव तथा जन

माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग / का.२१, मंत्रालय, मुंबई) संपर्क करणे उचित ठरेल. मुख्य सचिव हे माहिती अधिकारी नाहीत. अपीलकाराचा अर्ज आवश्यक कार्यवाहीसाठी प्रधान सचिव व मुख्य राज्यशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडे पाठविण्यात येत असलयाचे जन माहिती अधिका-यांनी दि.१९.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपीलकाराच्या मुळ अर्जातील माहिती अधिका-याचे उत्तर अर्जाशी सुसंगत आहे. त्यानुषंगाने अपीलकारास विहित कालावधीत कळविण्यात आले आहे. मुख्य सचिव कार्यालयातील माहिती अधिका-यांनीच अर्जामध्ये मागीतलेली माहिती द्यावी. किंबहुना त्यांच्या तक्रारीचे निवारण करावे अपीलकाराची अपेक्षा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कार्यक्षेत्रात बसत नाही. त्यामुळे अपीलकाराचे प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांना दिलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८६/०२**

**श्री.शिवलिंग रामचंद्र बिराजदार,**
**मुक्काम पोस्ट-तिकोंडी, तालुका-जत,**
**जि.सांगली ४१६ ४१२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. शिवलिंग बिराजदार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०५.२००७ रोजी अर्ज करून सेवानिवृत्ती प्रस्ताव तयार करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०५.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.०९.२००७, २५.०९.२००७ व ०६.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतू अपीलकार सुनावणीस अनुपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी समर्थन करुन दि.२८.११.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास हव्या असलेल्या माहितीबाबतचा नेमका तपशिल अर्जात नमुद नाही. अर्ज तक्रार / निवेदन स्वरूपात आहे. त्यामुळे शासन स्तरावरून अपीलकारास नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपीलकारास हव्या असलेल्या माहितीकरिता संबंधीत कार्यालयातील माहिती अधिका-याकडे नेमका अर्ज करावा अस जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०५.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७१५/०२**

**श्री.काळे हेमचंद्र जगन्नाथ**
**३१, समर्थ कॉलनी एम.जे.कॉलेज रोड,**
**जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हेमचंद्र काळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

वन जमिनी परस्पर जिल्हाधिकारी आणि समकक्ष दर्जाचे अधिकारी यांना ना हरकत प्रमाणपत्रे देउन व आर्थिक गैरव्यवहार करुन कोटयावधी रुपये एकर दराची वन जमीन केंद्र सरकारच्या मान्यतेशिवाय विक्री केली. वन जमिनी केंद्र शासनाच्या परवानगी शिवाय परस्पर अधिकारी क्षेत्राबाहेर जावून संगनमताने व आर्थिक हेतुपुरसर विक्री खाजगी व्यक्ती, विकासक, उधोपक संस्था इत्यादिनांना केल्या आहेत त्याची संपूर्ण माहित मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.०५.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. तथापि अर्जदार उपस्थित राहीले नाहीत. प्रथम अपिलीय प्राधिका-याने सदर प्रकरणी निर्णय देउन सदरचा निर्णय

अपीलकारास दिनांक १३.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविला दरम्यानच्या कालावधीत माहितीपोटी अपीलकाराने रु.२३, २९६/- इतके शुल्क डिमांड ड्राफटने विभागात जमा केले. त्यानंतर माहिती संबंधीच्या एकूण ११, ६४८ छायाप्रती दि.२७.०९.२००८ रोजी अपीलकाराच्या प्रतिनिधीने घेउन गेल्या. अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास आवश्यक माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसते. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता हजर राहीले नाहीत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१३/०२**

**श्री.सुरेश शामराव पोवार**
**रा.५९५, ए वॉर्ड, खंडोबा तालमीशेजारी,**
**शिवाजी पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, पुणे,**
**ताडीवाल रोड, रुबी हॉस्पीटल शेजारी, पुणे.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय उपायुक्त, कोल्हापूर.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुरेश पोवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०६.०२.२००८ रोजी अर्ज करुन प्रिन्स शिवाजी मराठा बोडींग शिक्षण संस्थेबाबत खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. कार्यालयीन निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालावर झालेल्या शेरेबाजीसह नक्कल
२. सदर अहवालानुसार धर्मादाय उपआयुक्त, कोल्हापूर यांचा दि.२९.१२.२००७ च्या आदेश अस्सल नक्कल.
३. क.निरी २/नि.चौ.क्र.५३६/३४२/२००८ (दि.२२.०१.२००८) चे पत्रातील नमुद शिक्षण संस्थेने दि.३१.०३.२००७ पर्यंतची सादर केलेली हिशोब पत्रके सही शिक्यासह कार्यालयीन शेरेबाजीसह नक्कल.

४. सदर पत्रातील निष्कर्षावरुन तक्रारदाराच्या अर्जामध्ये तथ्य नसल्याचे सिध्द करणारी सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराने मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी आवश्यकती माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१५.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने प्रिन्स शिवाजी मराठा बोडींग शिक्षण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबाजवणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८८/०२**

**श्री.जयसिंग रामचंद्र शेवाळे**
**आय.टी.आय.कोल्हापूर**
**रा.विठ्ठल रखुमाईनगर, पाचगांव,**
**ता.करवीर, जि.कोल्हापूर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. जयसिंग शेवाळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२४.०७.२००७ रोजी अर्ज करुन वैद्यकीय खर्चाच्या मंजूरीस झालेल्या विलबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०७.०८.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. माहिती पुरविण्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.१३.१०.२००९ रोजी आदेश पारित केले. माहिती पुरविण्यास नकार दिल्याने जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करावी म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराच्या मुलाच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मंजूरी देण्यास सन १९९८ ते २००७ इतक्या कालावधीचा विलंब झाला. अपीलकाराचे मुलाचे वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपूर्तीचे देयकास संचालक, प्रशिक्षण यांनी क्र.३ लेखा / व्यशिप्रशि/०७/१२८६९, दि.१३.०२.२००७ च्या आदेशान्वये मंजूरी दिली. संबंधीत कर्मचा-यांनी स्वत:च्या बीलाबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. अपीलकाराने या करिता उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय पुणे, संचालक प्रशिक्षण यांचे कार्यालय तसेच शासन स्तरावर पाठपुरावा केला असल्याचे प्रथम सुनावणीचेवेळी सांगीतले. अपीलकाराच्या मुलाच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी मंजूरी देणेसाठी जवळ जवळ ९ वर्षाहून अधिक कालावधी लोटला असल्याचे दिसते. यामुळे अपीलकाराने माहितीच्या अधिकारात अनुषंगीक माहिति मागीतली असल्याचे दिसून येते. विभागातील कर्मचा-याचे वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्तीस मंजूरी देण्याकरिता असा ९-१० वर्षे कालावधी लागू नये याकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परिपत्रकाव्दारे सर्व संबंधीत कार्यालयांना सक्त सूचना द्याव्यात अशी या प्रकरणाच्या अनुषंगाने विभागास आयोगाची शिफारस आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १८.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८५/०२**

**श्री.व्यंकटेश बालाजी कुलकर्णी**
**१०, मयूर हौ.सो.**
**आरवाडे पार्कच्या मागे,**
**सांगली रेल्वे स्टेशन (पू),**
**सांगली ४१३ ४१६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. व्यंकटेश कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.१२.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे सष्टेंबर २००६ मध्ये अर्ज करुन मानीव दिनांकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने अर्जावर लावलेला रू.१०/- किंमतीचा कोर्ट फी स्टॅम्प दि.२०.१२.२००५ असा आहे. सदर स्टॅम्प हा मुंबई मुंद्राक शुल्क अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार ६ महिन्यापूर्वीच्या कालावधीचा असल्याने अवैध आहे. सबब अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन त्यांच्या स्वत:च्या मानीव दिनांकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख संवर्गातील अधिका-यांची तात्पुरती जेष्ठतासूची सुधारित करण्याचे काम प्रगतीत होते. त्यानंतर सदर तात्पुरती जेष्ठतासूची सन १९९५ मध्ये अंतीम करण्यात आली. परिणामी काही अधिका-यांच्या जेष्ठतेत बदल झाला. सदर बदलाच्या अनुषंगाने सर्वश्री जी.व्ही.कुलकर्णी, व्ही.बी.कुलकर्णी आणि एस.एस.चीत्रगार या अधिका-यांना मानीव दिनांक देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. अपीलकारासह वर नमुद अधिका-यांना गट अ मधील पदाचा मानीव दिनांक ०६.१२.१९७९ असा दिला असल्याचे व तसे अपीलकारास दि.०३.०९.२००७ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन कळविले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकारास मानीव दिनांक मिळाला आहे. त्यानुसार अपीलकारास आवश्यक माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १८.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७२४/०२**

**श्री.प्रल्हाद गोविंदराव रावले**
**रा.सातेफळ, पो.हयातनगर,**
**ता.वसमत, जि.हिंगोली. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रल्हाद रावले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१०.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलार्थी हजर होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०४.२००७ रोजी अर्ज करून अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपिलार्थी यांनी सेवाकालावधीतील जास्तीत जास्त काळ विविध शिक्षा भोगण्यात घालविलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १०१ मधील तरतुदीनुसार खास बाब म्हणून अनुकंपा निवृत्ती वेतनासाठी अपिलार्थी यांचे प्रकरणी विचार करता येणार नाही. सेवेतून कमी करणे व निर्वाह भत्ता याबाबतच्या माहितीसाठी जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.०६.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करून अपिलार्थी यांचे प्रथम

अपील फेटाळ्ले. तसे आदेश दि.११.१०.२००७ रोजी पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी शासकीय रक्कम रू.७७.८८ चा अपहार केल्यामुळे धारकास वसमत येथील दिवाणी न्यायालयाने दि.०४.०८.६७ ला निकाल दिला. कोर्टाने धारकास रू.५०/- दंड व कोर्ट उठेपर्यंत शिक्षा झाल्याने अपिलार्थी यांना उप विभागीय अधिकारी हिंगोली यांनी दि.३०.१०.१९७७ रोजी निलंबीत केले. शासनाच्या दिनांक २२.०५.१९८१ च्या पत्रानुसार अपिलार्थी यांना दि.३०.१०.१९७७ पासून सेवेतून कमी करण्यात आले. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. याबाबत जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार फक्त माहिती पुरवावयाची आहे. निवृत्तीवेतना संबंधीची बाब माहितीचा अधिकार अधिनियातंर्गत मोडत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७२३/०२**

**श्री.हरिभाउ साधुराव बनसोडे**
**सचिव, कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघ,**
**जि.उस्मानाबाद, डी. फॉर्मसी कॉलेजच्या मागे,**
**उस्मानाबाद.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला रोड,**
**मुंबई, वरळी ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**नगर परिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला रोड,**
**मुंबई, वरळी ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हरिभाउ बनसोडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

कै.काशिनाथ चव्हाण, मुख्याध्यापक, न.पा.उस्मानाबाद यांच्या मुलास श्री.कीशोर चव्हाण यांना अनुकंपा तत्तवार नोकरी देणेबाबत दिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दि.३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.कीशोर चव्हाण यांना अनुकंपा तत्तवार नोकरी देणेबाबत मागणी केली होती.  सदर अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती माहितीच्या अधिकारात अर्ज करुन मागणी केली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाही संबंधीच्या सर्व कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकार यांना पोच देय डाकेने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पाठवाव्यात.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७२२/०२**

**श्री.एल.एस.कोल्हे**
**मु.पो.ता.कोपरगांव इंदिरापथ, कोपरंगाव,**
**जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. एल.एस.कोल्हे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

श्री.बी.डी.सानप, आयुक्त, अहमदनगर महापालिका, अहमदनगर येथे कार्यरत असतांना MSCIT परीक्षेत स्वत: ऐवजी Dumy विद्यार्थी परीक्षेला बसविला होता हे खरे आहे काय? याबाबत अपिलार्थी यांनी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.०१.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्री.बी.डी.सानप हे भा.प्र.से. मधील अधिकारी असून तत्कालीन आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्याविरुध्द तक्रार आहे. MSCIT परीक्षेत स्वत: परीक्षेकरिता हजर न राहता डम्मी

विद्यार्थी परीक्षेला बसविला होता अशी अपिलार्थी यांची तक्रार आहे. श्री.सानप यांच्याऐवजी दुस-याच व्यक्तीला एम.एस.सी.आय.टी. या संगणक परिक्षेस बसविण्यात आल्याबाबच्या प्रकाराची राज्य गुन्हे अन्वेषण विभाग अथवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची सामान्य प्रशासन विभागाने उच्च व तंत्रशिक्षण विभागास विनंती केली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणाची आद्यावत माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७११/०२**

**श्री.संजय नटवरलाल लोहार**
**२५/अ, पाटकरनगर, डायव्हर्शनजवळ,**
**देवपूर, धुळे.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तंत्र शिक्षण संचालनालय,**
**३ महापालिका मार्ग, धोबी तलाव,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्र शिक्षण संचालनालय,**
**३ महापालिका मार्ग, धोबी तलाव,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. संजय लोहार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

दि.३०.०६.२००८ रोजी सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक यांचे निर्देशाने गटीत केलेली श्री.एस.व्ही.जोशी, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव यांचे अध्यक्षतेखालील त्रिसदसीय समितीने अपीलकाराची व महाविद्यालयाची चौकशी केली होती. त्या चौकशी समितीने सुपूर्द केलेला अहवाल व त्यावरील केलेल्या कार्यवाहीबाबतची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने मागीतलेली माहिती सह संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक यांच्याकडून मागविण्यात आलेली माहिती प्राप्त झाली. त्यांनतर ती माहिती दि.०३.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकार यांना पाठविली. सह संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक यांच्याकडून अहवाल उशिरा प्राप्त झाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. याबद्दल जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन दिलगीरी व्यक्त केली. तसेच माहितीच्या अधिकारात सादर केलेल्या अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल असा लेखी अहवाल सादर करुन जन माहिती अधिका-यांनी प्रतीपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जावर भविष्यात विहित वेळेत कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९१/०२**

**श्री.अशोक यशवंतराव पवार**
**अ विंग अजिंक्य गणेश अपार्टमेंट,**
**T-२, ८६४, शनिवार पेठ, सातारा,**
**ता.जि.सातारा.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी वॉर्ड,**
**जोबनपुत्रा कम्पाउंड, गॅन्ट रोड (प),**
**मुंबई ४०० ००७.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी वॉर्ड,**
**जोबनपुत्रा कम्पाउंड, गॅन्ट रोड (प),**
**मुंबई ४०० ००७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अशोक पावर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन अनुज्ञाप्ती (licence) क्र.३३२६२ आणि SB lic No.१९७३० मध्ये अपीलकाराच्या नावाचा समावेश करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.२७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विभागात उपलब्ध असलेली आवश्यकती माहिती पुरविली आहे. यामुळे अपीलकाराचे समाधान झालेले नाही. तरी जन माहिती अधिका-यांनी अनुज्ञाप्ती विभागातील संबंधीत

कागदपत्र अपीलकारास निरीक्षणाकरिता प्रथम उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर अपीलकाराच्या मागणीप्रमाणे संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यात असे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०६.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

मे.पवार केरोसीन डीलर्स २१, अ बदरबाग बाळाराम स्ट्रिट, ग्रँन्ट रोड, मुंबई ०७, यामधील केरोसीन परवाना क्र.प्राजेक्शन १९७३० व स्टोरेज लायसन नं.३२२६२ रेकॉर्डला अपीलकार यांचे नाव लावण्याबाबतचे अर्जाचे व श्री.हैबत यशवंतराव पवार यांचे एकटयाच्या नावाची नोंद कशी झाली त्या कार्यवाहीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सर्व संबंधीत कागदपत्राचे प्रथम अपीलकाराने निरीक्षण करावे. त्यांनतर आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास द्याव्यात असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना निदेश दिले आहे. केरोसीन परवाना क्र.पोजेक्शन १९७३० व स्टोरेज लायसन क्र.३२२६२ रेकॉर्डला अपीलकाराचे नाव लावण्याची बाब अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केली आहे. सदरबाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. याकरिता अपीलकाराने सक्षम प्राधिका-याकडे संपर्क साधावा. या परिस्थितीत मी सदर प्रकरणी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६५८/०२**

**श्री.श्रीपाद जनार्दनराव कुलकर्णी**
**नगरपरिषद शाळा क्र.११ समोर,**
**दत्तमंदिराजवळ, समता कॉलनी,**
**उस्मानाबाद.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. श्रीपाद कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०१.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०६.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

"अपीलकाराने मौजे उपळे दुमाला ता.बार्शी येथे सीटी सर्व्हे क्र.८१७/३ ही जागा दि.१५.०३.२००२ रोजी खरेदी खताची छायांकित प्रत जोडून अपीलकाराने दि.१३.०५.२००२ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बार्शी यांच्याकडे अर्ज देउन खरेदी घेतलेल्या जागेस अपीलकाराच्या नावाची नोंद लावण्याबाबत विनंती केली. अर्जाप्रमाणे अपीलकाराची अद्यापी नोंद लागली नाही. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती."

अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०५.०९.२००६ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१८.१०.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराच्या अर्जाच्या अनुषंगाने विभागाच्या दि.१३.०७.२००६ अन्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांचे कार्यालयाकडून कार्यवाहीचा अहवाल मागविण्यात आला आहे. त्यांचेकडून केलेल्या कार्यवाहीबाबत विभागाकडे अहवाल आद्याप प्राप्त झालेला नाही. माहिती प्राप्त होण्यासाठी विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. कार्यवाहीबाबतचा अहवाल प्राप्त होताच, अपीलकारास अवगत करण्यात येईल असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने खरेदी केलेल्या जागेस अपीलकाराच्या नावाची नोंद करण्याबाबत अपीलकाराची मागणी आहे. याबाबत जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांचेकडून सदर प्रकरणी कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने त्यांचेकडून अहवाल मागविला असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संचालक, भूमि अभिलेख, पुणे व जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास कळविण्यात यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६६१/०२**

**श्री.किशोर भबुतमल शहा**
**२०+२१/३, पार्वती नगर, जळगांव.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**नगर विकास विभाग, नवि-२३,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी**
**नगर विकास विभाग, नवि-२३,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. किशोर भबुतमल शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.०२.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र शासनाने कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी व कृषी महाविद्यालयासाठी ठरविलेल्या निकषाप्रमाणे जमीन, इमारती व सोयी सुविधा उपलब्ध नसतांना सुध्दा गोदावरी फाँडेशनला कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय व कृषी महाविद्यालय सुरु करण्यासाठी दिलेली परवानगी त्वरित रद्द करण्याची मागणी केली होती. यासाठी मा.कृषी मंत्री यांना दि.१९.०१.२००८ रोजी निवेदन दिले होते. सदर निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची मागणी केली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारातील अर्ज तसेच प्रथम अपील मा.कृषीमंत्री यांचेकडे सादर केला असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. माहितीच्या अधिकारानुसार मा.कृषीमंत्री हे जन माहिती अधिकारी अथवा प्रथम अपिलीय प्राधिकारी नाहीत. गोदावरी फौंडेशन, जळगांव संचलीत कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयास मान्याता देण्याची बाब महात्माफुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि.अहमदनगर यांचेशी संबंधीत आहे. त्यामुळे अर्जातील मागणी केलेल्या कागदपत्राच्या प्रती अपीलकारास उपलब्ध करुन देणेबाबत अर्ज कुलसचिव म.फु.कृ.वि. राहुरी यांचेकडे पाठविण्यात येत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराच्या अर्जातील १ ते ६ मुध्दे महसूल व वन विभागाशी संबंधीत आहेत. महसूल व वन विभागाने दि.०२.०६.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.१ ते ३ बाबत माहिती दिली. अर्जातील मुध्दा क्र. ४ ते ६ बाबत महसूल व वन विभागाकडे संबंधित कागदपत्र उपलब्ध नाहीत असे कृषी विभागाने दि.०४.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव कृषी व पदुम, श्री.जी.के.राउत यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतीपादन केले. कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय व कृषी महाविद्यालय सुरु करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या निकषाची गोदावरी फौंडेशन पुर्तता करत नाहीत असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती अपीलकाराने मागीतली आहे. सदर प्रकरणाची सद्यस्थितीबाबत विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरविण्यात यावी. सबब मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक १८.०६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१४/०२**

**श्री.आनंदा रामहरी शिंदे**
**रा.रेणावी, ता.खानपूर, जि.सांगली. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**खानपूर पंचायत समिती, विटा, ता.खानपूर,**
**जि.सांगली.**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, रेणावी**
**खानपूर पंचायत समिती, विटा, ता.खानपूर,**
**जि.सांगली. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आनंदा रामहरी शिंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२१.०५.२००८ रोजी अर्ज करून, पुढील माहिती मागीतली होती.

१) नळकनेक्शनची शासकीय फी २) रस्ता फोडणेची फी आकारणी ३) सन २००७-०८ या वर्षात किती लोकांना नळ कनेक्शन दिली. त्यांचेकडून सस्ता फोडणेची फी पोटी किती रक्कम जमा झाली. ४) रु.५००/- रस्ता फोडणी फी कोणाच्या आदेशानुसार व कोणत्या शासकीय आदेशानुसार जमा करून घेता. एकवेळ फोडलेल्या रस्त्यातुन दुसरे कनेक्शन द्यावयाचे झाल्यास किती फी अथवा दंड आकारता याबाबतची अपीलकाराने माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दिनांक ०५.०६.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. मागीतलेली माहिती अपूरी दिल्याबद्दल अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीकरिता हजर होते. अपीलकारास कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे अशी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विचारणा केली. याबाबत लेखी म्हणने देतो असे सांगून अपीलकार कार्यालयातून निघुन गेले. परत आलेच नाहीत. त्यांनतर सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीकरिता कोणत्या त्रुटी आहेत. याबाबत अपीलकाराने लेखी निवेदन न देता व सही न करताच अपीलकार निघुन गेले. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील निकाली काढले. तसे अपीलकारास कळविले.

अपूरी माहिती दिली असल्याच्या व दिलेली माहिती विलंबाने दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन नळ जोडणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०६.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. सदर माहिती अपूरी असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहिती मध्ये काय त्रुटी आहेत. याबाबत अपीलकाराने खुलासा केलेला नाही. व्दितीय अपीलाच्या सुनावणीवेळी अपीलकार हजर राहिले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८१/०२**

**श्री.बळीराम बापुराव पाखरे**
**माजी पोलीस निरीक्षक,**
**स.नं.४६/३, झेंडेवस्ती, कावडे रोड,**
**घोरपडी, मुंढवा, पुणे ४११ ०३६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,**
**शहिद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ०३७.**

**जन माहिती अधिकारी**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,**
**शहिद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ०३७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. बळीराम पाखरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.११.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयात सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

जन माहिती अधिका-याकडे अपीलकाराने दि.३१.०७.२००८ रोजी अर्ज करुन पोलीस निरीक्षक (आर्मरर) श.रा.पो.बल, पुणे या पदावर नियुक्ती देणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन आयुधिक पोलीस निरीक्षक पदाच्या निवड समितीच्या सभेच्या वृतांताची नक्कल आयुधिक, पोलीस निरीक्षक पदावरील नियुक्तीसाठी अपीलकारास मुलाखतीकरिता बोलावलेल्या पत्राची प्रत अपीलकाराने दाखल केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या नक्कला त्या अनुषंगाने समितीने केलेल्या अहवालाची नक्कल इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने दि.१८.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली. त्यामध्ये समितीच्या अहवालाची प्रत, लिपीकाने सादर केलेल्या टिप्पणीची प्रत, वरिष्ठांनी निर्गमित केलेल्या सूचनाची प्रत, उक्त अधिनियमातील कलम ८ अनुसार देता येत नाही असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. अपीलकारास मुलाखतीस बोलावलेल्या पत्राची प्रत अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे कारणावरुन नाकारली आहे. आयुधिक पोलीस निरीक्षक पदावरील नियुक्तीकरिता उमेदवार निवडीची कार्यवाही पूर्ण झाली असल्याचे दिसते. तेव्हा याबाबत अपीलकाराने मागीतलेली माहिती गोपनीयतेच्या कारणावरुन नाकारता येणार नाही. अपीलकारास दि.१८.१०.२००८ च्या पत्राची प्रत विनाशुल्क अपीलकारास पुन्हा पाठवावी. उर्वरित मुद्याबाबत कार्यालयातील अभिलेखावरुन जाणीवपूर्वक शोध घेउन अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७६६/०२**

**श्री.चंद्रकांत देविदास वानखेडे**
**३/९४५, दत्तनगर, खडका रोड,**
**मेहराज बिल्डींग जवळ,**
**मु.पो.ता.भुसावळ, जि.जळगांव.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. चंद्रकांत देवीदास वानखेडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१०.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१४.०७.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ८४, ८५, ८७ व १५० अंतर्गत काढण्यात आलेली संपूर्ण परिपत्रके, शासन निर्णयाची माहिती मागीतली होती. संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संकलन शाखेकडून अपेक्षीत माहिती प्राप्त करुन अपीलकारास दि.२३.०९.२००८ च्या पत्रान्वये माहिती पोटी रु.१३०/- टपाल खर्चासह शुल्क भरण्याबाबत कळविले. याच दरम्यान अपीलकाराने दि.२२.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते. माहितीपेटी रु.१३०/- शुल्क

भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. अपीलकाराने आवश्यक शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही असे दिसते. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ८४, ८५, ८७ व १५० अंतर्गत काढण्यात आलेली संपूर्ण परिपत्रके व शासन निर्णयाच्या प्रतीची मागणी केली होती. माहिती पोटी टपाल खर्चासह अपीलकारास रु.१३०/- एवढे शुल्क विभागात जमा करण्याबाबत अपीलकारास कळविले होते. परंतू अपीलकाराने शुल्काची रक्कम भरलेली नाही. यामुळे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नाही असे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच सदर बाब जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने रु.१३०/- एवढे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन द्यावी. रु.१३०/- एवढया शुल्काचा अपीलकाराने भरणा केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास आवश्यक ती माहिती सत्वर उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

सबब अपील निकाली काढयात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७६१/०२**

**श्री.हेमचंद्र जगन्नाथ काळे**
**३१, समर्थ कॉलनी, एम.जे.रोड,**
**जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पाटबंधारे विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी**
**पाटबंधारे विभाग,**
**मंत्रालय, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हेमचंद्र काळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१०.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.३१.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

१. जळगांव शहराला गिरणा धरणातून पाणीपुरठा होत आहे. सदर पाणीपुरठा तोडण्याची कारणे पुराव्यासह पुरवावीत.
२. राज्यात अन्यत्र ठिकाणी पाणीपुरवठा तोडला असल्यास त्याची माहिती

३. गिरणा काठावरील जळगाव जिल्हयातील शेतक-यांचे पाणी तोडल्यानंतर त्यांचे पुनर्वसन कसे करणार त्याबाबतची माहिती

४. जळगांव, पाचोरा, भडगांव आणि तत्सम गावांची पाण्याची कोणती सोय केली, करणार याबाबत माहिती

५. जळगांव शहरासाठी मृत साठयातून पाणी घेण्यासाठी दिलेल्या परवानगीची माहिती

६. जळगांव जिल्हयात पाटबंधारे विभागाची जागा इसम आणि कंपन्यांना दिलेल्या असल्यास त्याची माहिती अपीलकाराने मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०८.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.०१.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद दोन मध्ये नमुद माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०८.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळ लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देतो.

**आदेश**

सबब अपील निकाली काढयात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५४/०२**

**श्री.एम.यु.पाटील**
**सौ.शोभा गोपाळ पाटील,**
**प्रशाकर कॉलनी, प्रभाकर हॉलचे मागे,**
**भुसावळ. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कृषि व पशु संवर्धन,**
**दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी**
**कृषि व पशु संवर्धन,**
**दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. एम.यु.पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

कृषी व पदुम विभागाच्या दि.०९.०९.२००२ च्या ज्ञापनानुसार संबंधीत कर्मचा-यापैकी कोणकोणत्या कर्मचा-यांना उपदानाची रक्कम अदा करणेत आली. कधी आदा केली. किती केली. संबंधीत कर्मचा-यापैकी कोणकोणत्या कर्मचा-यांना उपदानाची रक्कम आदा करण्यात आली त्याचा तपशिल. सेवानिवृत्त कर्मचा-यांना उपदानाची रक्कम आदा न करणे बध्दलचे शासनाचे परिपत्रक व नियम ए.डब्ल्यू. गायकवाड तत्कालीन महाव्यवस्थापक, शा.दु.यो.बीड व इतर १२ हयांचे प्रकरणाची चौकशी करणेत व निकाल करणेत झालेल्या विलंबाची कारणे इत्यादी अनुषंगीक माहिती उपलब्ध करुन

देण्याची अपीलकाराने दि.३०.०७.२००८ च्या अर्जान्वये मागणी केली होती. प्रस्तूत प्रकरणाबाबत कार्यवाही सुरु असून याबाबत होणारा निर्णय संबंधीतास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने मागणी केलेले प्रकरण विभागीय चौकशी संदर्भात आहे. सदर प्रकरण गोपनीय स्वरुपाचे असल्याने माहिती देता येत नाही. या विभागीय चौकशीत अपीलकार अपाचारी असल्याने त्यांना उत्तर देण्यात आलेले आहे. प्रस्तूत विभागीय चौकशीचे प्रकरण दुग्ध व्यवसाय विभागातील अपचा-याने केलेल्या कमी गुणप्रतीचे दुग्ध भेसळीचे प्रकरणा संदर्भातील आहे. अशा विभागीय चौकशी प्रकरणी शासनाने नुकसान किती झाले किंवा कसे या दृष्टीने आयुक्त दुग्ध यांजकडून सर्व प्रकरणाची माहिती मागविण्यात आली आहे. प्रस्तूत प्रकरणाची माहिती आता प्राप्त झाली आहे. विभागीय चौकशीचे कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येत असून याबाबत अपीलकारास लवकरच कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपीलकाराने मागणी केलेली माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५२/०२**

**श्री.हेमचंद्र जगन्नाथ काळे**
**३१, समर्थ कॉलनी, एम.जे.रोड,**
**जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमातर, १० वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसिलदार (डेस्क-७अ)**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमातर, १० वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमचंद्र जगन्नाथ काळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०५.०४.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

"रिटपिटीशन क्र.१९५७/०६, २१९६/०६, २९३०/०६, २०९३/०६, २१११/०६, २९८५/०६, २७५२/०६, २०६०/०६, २३१५/०६, २९७१/०६, २४१८/०६, १५७८/०६, १७२२/०६, २०३२/०६, २०३३/०६, २०३४/०६, ९६/०६, १९५७/०६ या सर्व रिटपिटीशन मधील सर्व वन जमिनींना ज्या अधिका-यांनी बिनशेती परवानगी दिल्या आहेत त्या सर्व अधिका-यांची पदनामे, नावे व त्याबद्दल तयार केलेल्या कार्यालयीन टिप्पण्या व आदेशाच्या प्रतीची मागणी केली होती."

दि.२४.०३.२००८ च्या निकालाची प्रत कार्यालयात प्राप्त झाली नाही. कार्यालयाकडील आदेशांचा क्रमांक व दिनांक द्यावा. जेणेकरुन अपीलकारास मागीतलेली माहिती पुरविणे कार्यालयास शक्य होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०३.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०५.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२३.०६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०३.०५.२००८ रोजी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील निकालात काढले असल्याचे अपीलकारास दि.२७.०६.२००८ रोजी आदेश पाठवून कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने वन जमिनींना बिनशेती परवानगी दिलेल्या अधिका-याबाबत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती देणे सोयीचे व्हावे म्हणून आदेशांचा क्रमांक व दिनांक उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-याकडे विनंती केली होती. अपीलकाराने जन माहिती अधिका-यांना संबंधीत आदेशाचा क्रमांक व दिनांक उपलब्ध करुन दिला नसल्याने अपीलकारास माहिती पुरविता आली नाही असे दिसते. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दि.०९.०६.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५६/०२**

**श्री.हेमचंद्र जगन्नाथ काळे**
**३१, समर्थ कॉलनी, एम.जे.रोड,**
**जळगांव.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमचंद्र जगन्नाथ काळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये दि.०९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

१. महाराष्ट्र राज्यातील वन विभागातील अधिकारी, उप अधिकारी उदा.अ.भा.से. वर्ग १, वर्ग २. अशा ज्या अधिका-यांना पाचा वर्षाचेवर एकाच जिल्हयात कार्यसेवा आली आहे अशा सर्व अधिका-यांची यादि मला उपलब्ध करुन द्यावी.
२. सदर अधिकारी यांना पाच वर्षापेक्षा जास्त एकाच जिल्हयात ठेवण्यासाठी विभाग प्रमुखांनी शासनाला सादर केलेल्या बदलीच्या प्रस्तावाच्या प्रती मला उपलब्ध करुन द्याव्यात.
३. माननिय मुख्यमंत्री, सर्व मंत्री, आमदार खासदार तथा राजकिय पक्षाचे पदाधिकारी यांनी बदलीसाठी शिफारशी केलेल्या पत्रांच्या साक्षांकित प्रती (सर्व) मला उपलब्ध करुन द्याव्यात.

४. महाराष्ट्रातील सर्व वन अधिका-यांची विभागीय चौकशीची प्रकरणे मंजुरीसाठी शासनाकडे सादर केलेल्या पत्रांच्या, प्रकरणांच्या प्रती मला उपलब्ध करुन द्याव्यात.

५. वन आणि महसूल विभागाकडे असलेल्या वन जमिनीचे वाटपाबाबत, आदेश, शिफारस यांच्या महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रती साक्षांकित करुन माला पुरवाव्यात हि नम्र विनंती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहितीपोटी रु.९१०/- टपाल खर्च रु.१००/- एकूण १०१०/- इतके शुल्क भरण्याबाबत दि.२१.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने यास प्रतिसादर दिला नाही. मंत्रालयीन व वन विभागाची माहिती www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने अर्जदारास दिलेल्या उत्तराने समर्थन करुन प्रथम अपील फेटाळले.

अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहिती राज्यातील सर्व वन विभागाशी संबंधीत आहे. विभागीय चौकशीची तशीच जमीन मंजूरी प्रकरणे राज्याच्या विविध वन अधिका-याकडे चालविली जातात. अर्जदाराने एखादया विशिष्ट प्रकरणाशी संबंधीत कागदपत्राच्या / अभिलेखाच्या प्रतीची मागणी केली नाही. माहितीचा आवाका खुप आहे. राज्यातील माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. अशाप्रकारे माहिती संकलीत करुन अपीलकारास उपलब्ध करुन देणे माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०२.०६.२००९ रोजी आदेश पारित केले आहेत. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी समर्पक उत्तर दिले. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या दि.०२.०६.२००९ च्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६९०/०२**

**श्री.हिरासिंह गुलाबसिंह चंदेल**
**निशांत, वैभव नगर, जिंतूर रोड,**
**परभणी ४३१ ४०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,**
**जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत,**
**रूम नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,**
**जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत,**
**रूम नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हिरासिंह चंदेल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.३१.०३.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अनुपस्थित होते.

अपीलकाराने, महाराष्ट्र राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे १९९९ पासून वेळोवेळी अपील अर्ज पाठविला आहेत. त्यापैकी किती नोंदले, मंजूर केले, फेटाळले, रीमांड केले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१९.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती पोटी शुल्क जमा करण्याबाबत अपीलकारास कळविले. शुल्क भरुनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०३.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल

केले. राज्य आयोगाकडे साधारणत: २०, ००० वर अपीले व तक्रार प्रकरणे प्रलंबित आहेत. कागदपत्राची व्यवस्थितरित्या पूर्तता होणे गरजेचे आहे. पूर्तता ही केवळ टपालाव्दारे पूर्ण करणे योग्य वाटत नाही. त्याकरिता न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून संबंधीत आक्षेपांची पूर्तता करणे अपेक्षीत आहे. कोर्टाच्या प्रकरणातील प्रत्येक तारखा हया पक्षकारांना स्वत: जातीने हजर राहून प्रकरणाची स्थिती जाणून घेणे गरजेचे आहे. त्याकरिता कोर्टास पत्रव्यवहार करणे उचित वाटत नाही. किंबहूना कोणत्याही कोर्टात तशी प्रथा नाही. सबब अपीलकाराने प्रकरणाची स्थिती जाणून घेतल्यानंतर प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहून प्रकरणातील आक्षेपांची पूर्तता जातीने करून घ्यावी. आयोगाच्या कामकाजात सहकार्य करावे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२८.११.२००६ रोजी आदेश पारित करून कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, महाराष्ट्र राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे वेळोवेळी दाखल केलेल्या अपील अर्जातील केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. आयोगाकडे प्रलंबित अपीलावर आक्षेप काढण्यात आले आहेत. त्याची प्रत जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१०.२००६ च्या पत्रासोबत अपीलकारास पुरविली. अपीलकाराने स्वत: किंवा त्यांच्या वकील अथवा प्रतिनिधी कार्यालयात पाठवून आक्षेपाची पूर्तता करावी. त्याशिवाय अपीलकाराची अपील आयोगासमोर ठेवता येणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार अपीलकाराने आक्षेपाची पूर्तता प्रथम करावी. अपीलकाराने आक्षेपाची पूर्तता केल्यानंतर अपीलकाराची अपील आयोगासमोर ठेवावीत. त्यानंतर अपीलासंबंधी राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने दिलेल्या निर्णयाची माहिती विनामुल्य अपीलकारास पुरवावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १८.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५०/०२**

**श्री.हेमंत माणिकलाल छाजेड**
**६, महावीर सोसायटी, मोहाडी रोड,**
**जळगांव ४२५ ००१. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हेमंत माणिकलाल छाजेड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०३.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना, नागपूर यांनी दि.०१.०१.२००८ रोजी पाठविलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची खालील मुद्याची माहिती मागीतली होती.

१. सदर निवेदन आपल्या कार्यालयाला प्राप्त झाल्यावर त्यावर लिहिण्यात आलेल्या कार्यालयीन टिप्पणी व इतर सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

२. शासनाचा महसूल वसूल न करुन शासनाची अर्थव्यवस्था उनघाईस आणून शासणाचा विश्वासंघात करणा-या संबंधित भारतीय वनसेवेच्या अधिकका-याविरुध्द ज्या नियमान्वये

तात्काळ कार्यवाही करणे शक्य आहे अशा सर्व कायद्यांचे कलमांची व नियमांची माहिती मला तात्काळ पुरविण्यात यावी.

३. सदर वसुल न झालेल्या महसूल वसूल करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनाची समग्र माहिती द्यावी.

अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी मुध्दा क्र.१ बाबत दि.१५.०४.२००८ च्या पत्रानुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली. अर्जातील मुध्दा क्र.२ व ३ अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर या कार्यालयाच्या अखत्यारितील असल्याकारणास्तव अपीलकाराच्या अर्जाची प्रत उक्त अधिनियमातील कलम ६पोटकलम (३) (दोन) च्या परंतूकातील तरतुदीनसुार हस्तांतरित केली. तसेच माहितीच्या अधिकारातील अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास देणेबाबत सूचना दिल्या तसेच सदरबाब अपीलकारास अवगत करण्यात आली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२ मे, २००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने मुध्दा क्र.ब व क मध्ये कोणत्या कागदपत्राची मागणी केली आहे हे स्पष्ट होत नसल्याने कागदपत्रे पुरविणे शक्य नाही असे प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दि.०५ मे, २००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जातील मुध्दा क्र.२ व ३ बाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६०९/०२**

**श्री.हरिष त्र्यंबक तायडे**
**श्री.के.एन.कोलते,**
**राजेश निवास, महाविर नगर,**
**वॉर्ड नं.२२, बुलढाणा ४४३ ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**अर्थ व सांख्यिकी संचालनालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत मुंबई**
**उपनगर जिल्हा, ८ वा मजला,**
**शासकीय वासहत, वांद्रे (पु), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**अर्थ व सांख्यिकी संचालनालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत मुंबई**
**उपनगर जिल्हा, ८ वा मजला,**
**शासकीय वासहत, वांद्रे (पु), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हरीष तायडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferencing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२००८ रोजी अर्ज करून खालील माहिती मागीतली होती.

दिनांक ०९.१२.२००७ रोजी झालेल्या सांख्यीकी सहाय्यक पदाच्या लेखी परिक्षेबाबत.

१. खुलासा आणि अ.जा.प्रवर्गातून निवड केलेल्या उमेदवारांचे व अपीलकाराची क्र.१ ते १२० क्रमांकाची उत्तर पत्रिकांच्या साक्षांकित छायाप्रती.

२. अपीलकाराची स्वत:ची क्र.१ ते १२० पर्यंत प्रश्नपत्रिक छायाप्रती.

३. सांख्यीकी सहाय्यक या पदाच्या भरतीबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनाबाबत सर्वशासन निर्णयाच्या व परिपत्रकाच्या छायाप्रती.

४. दि.०९ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या सांख्यीकी सहाय्यक या पदाच्या प्रश्नपत्रिकेची क्र.१ ते १२० ची मॉडेल Answar key.

५. सांख्यीकी सहाय्यक या पदाच्या परिक्षेची अनुक्रमे खुला व अ.जा.प्रवर्गाची माहिती (Cut off Line).

६. शा.नि.दि.१९.०३.१९९८ अनुसार स्पर्धा परीक्षेत ५% गुणांच्या सवलती बाबत सविस्तर माहिती, कार्यालयीन टिप्पणीची साक्षांकित प्रत.

सांख्यीकी सहाय्यक या पदाच्या निवडीबाबतची कार्यवाही अद्यापही पूर्ण झालेली नसल्याने सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार माहिती उपलब्ध करून देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०९.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर अपीलकारास पुढीलप्रमाणे माहिती पुरविण्यात आली.

अपीलकाराची स्वत:ची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका याच्या साक्षांकित प्रती सांख्यीकी सहाय्यक पदाच्या प्रश्नपत्रिकेची मॉडेल Asswer key, सांख्यीकी सहाय्यक पदाच्या परीक्षेची खुलाव व अनुसूचित जमाती प्रवर्गाची Cut off Line याबाबतची माहिती आय.बी.पी.एस संस्थेकडून मागविण्यात आली असून ती प्राप्त झाल्यावर पुरविण्यात येईल असे अपीलकारास कळविले. प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका उपलब्ध झाल्यावर त्यासाठी स्वतंत्र शुल्क अदा करावे. खुला व अनुसूचित जाती प्रवर्गातून निवड केलेल्या इतर उमेदवारांच्या उत्तरपत्रिकेच्या साक्षांकित प्रती उक्त अधिनियमातील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने माहिती देता येत नाही असे अपीलकारास कळविले. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.दि.१८.०३.१९९८ नुसार गट क मधील पदासाठी संबंधीत उमेदरांना ५% गुणांची सवलत दिली

आहे. सांख्यीकी सहाय्यक पदासाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना नाहीत. तथापि निवड प्रक्रियेबाबत मार्गदर्शक असणारे शासन निर्णय / परिपत्रकाच्या पृष्ठांची संख्या १०८ असून छायाप्रतीसाठी रु.२१६/- इतक्या रक्कमेचा भरणा केल्यावर उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२६ जून, २००८ च्या पत्रान्वये कळविले. आय.बी.पी.एस.मुंबई या संस्थेकडे उमेदवारांच्या लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका आन्सर की याबाबत मागणी केली असता त्यांनी त्यांच्या धोरणानुसार सदर बाबी पुरविता येत नसल्याचे संस्थेने अर्थ व सांख्यीकी संचालनालयास कळविले. Cut off Merit ची माहिती पूरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व आन्सर की वगळता अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी द्यावयाची शिल्लक माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती मोफत द्यावी.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८९/०२**

**श्री.तुषार देविदास झेंडे**
**उपाध्यक्ष, पुणे जिल्हा,**
**मु.पो.म्हसोबाची वाडी, इंटापूर,**
**जि.पुणे.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. तुषार झेंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०२.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागीतली होती.

१. राज्य ग्राहक संरक्षक परिषदेची रचना व कार्यपध्दतीची माहिती
२. ग्राहक संरक्षक परिषद स्थापन करणे व कार्यपध्दतीबाबत शासनाचे राजपत्र
३. परिषदेवर नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांची नावे व पत्ते
४. परिषदेवर नियुक्त करण्यात येणा-या सदस्याची पात्रता व निकष, आचारसंहितेबाबत माहिती
५. दिनांक ०६.०६.२००५ रोजी सुनावणी होउन अंतीम आदेश पारित झाले आहेत त्या आदेशाची प्रत मिळाल्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.२२ मे, २००७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मुध्देनिहाय माहिती दिली.

१. ग्राहक संरक्षण अधिनियम, २००० कलम पोटकलम (४) नुसार ६० सदस्यांचा समावेश असलेली राज्य ग्राहक संरक्षण परिषद गठीत करण्यात येईल.

<u>कार्यपध्दती</u>: -

२. ग्राहक संरक्षक परिषद स्थापन करण्याबाबतचे शासनाचे दि.२२ मार्च, २००५ च्या अधिनियमाचे प्रत.

३. परिषदेवर आद्याप सदस्यांची नेमणूक करण्यांत आली नाही

४. परिषदेवर नियुक्त करण्यात येणा-या सदस्याने ग्राहक जागृती व ग्राहक भिमुख असे सामाजिक स्तरावर काम केले असले पाहिजे. त्याचप्रमाणे ग्राहक संघटना अथवा ग्राहक पंचायत याव्दारे ग्राहकांना ग्राहक संरक्षण नियमानुसार दिलेल्या अधिकाराचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. या कायद्यांतर्गत कोणतीही आचारसंहिता अवलंबिली जात नाही. राज्यस्तरिय ग्राहक संरक्षण परिषदेकरिता नियुक्तीचा प्रस्ताव दि.२२.०३.२००५ च्या अधिनियमानुसार विहित प्रवर्गातील सदस्य असल्यास त्यानुसार व्यक्तीगत माहितीचा अर्ज शासनास प्राप्त झाल्यावर त्या त्या प्रवर्गातील नेमून दिलेल्या सदस्य संस्थेनुसार सदस्य निवडण्यात येतील. सदस्य निवडीच्या प्रस्तावास प्रधान सचिव, मा.मंत्री (अ.ना.पु.व.ग्रा.सं.वि), मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे कळविले.

जन माहिती अधिका-यांनी हेतुपुरस्सर चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली. विलंबाने माहिती दिली असल्याने माहितीपोटी आकारलेले शुल्क रू.४०/- परत मिळावेत म्हणून अपीलकाराने दि.०६.०७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०७.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने दि.१७.०२.२००७ च्या अर्जान्वये राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची रचना व कार्यपध्दतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. वर नमुद केल्यानुसार जन माहिती अधिका-यांनी

विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसात अपीलकारास माहिती दिली नाही. अपीलकारास विलंबाने दि.२२.०५.२००७ च्या पत्रानुसार विलंबाने माहिती दिली नाही. विलंबाने माहिती देउनही माहितीपोटी रू.४०/- एवढे शुल्क वसूल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकाराकडून माहिती पोटी घेतलेली रक्कम रू.४०/- अपीलकारास परत करावी. उक्त अधिनियमातील कलम ७ पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पालन करण्यात कसूर केली असेल तर, कलम ७ पोटकलक ६ अनुसार माहिती मिळाण्याची विनंती करण्या-या व्यक्तीस माहिती देण्याची अधिनियमात तरतुद आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विलंबाने महिती दिली आहे. त्यामुळे माहितीपोटी आकारलेले शुल्क रू.४०/- अपीलकारास नियमानुसार परत करणेत यावेत. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १८.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६९२/०२**

**श्री.रामचंद्र दिनकर रत्नपारखी**
**रत्नकुंज निवास, जवाहन कॉलनी,**
**नगर रोड, बीड ४३१ १२२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामचंद्र रत्नपारखी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०१.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयात Video Confencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०१.२००६ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ ची प्रस्तावना व उद्योग मिळणेबाबत व अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करून परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती.  व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता अपीलकार हजर होते.  अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असल्याचे अपीलकाराने सुनावणीचेवेळी सांगीतले.  यावरून सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २२.०६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२२/०२**

**श्री.दिनकर सदाशिव कांबळे**
**४०, वानवाडी, पुणे ४११ ०४०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिनकर सदाशिव कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

१. श्री.खरवडकर विवेक, यांची नगर उप अभियंता पदवरील नियुक्ती करताना दिलेल्या जाहिरातील शैशणिक पात्रता, अटी, शर्थी व वय इ. अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

२. श्री.वाघमारे प्रशांत, यांची नगर उप अभियंता पदावरील नियुक्ती करताना दिलेल्या जाहिरातील शैशणिक पात्रता, अटी, शर्थी व वय (वर्ष ४०) इ. अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने

दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

३. श्री.वाघमारे प्रशांत, यांची नगर उप अभियंता पदावरील नियुक्ती मे.उच्च न्यायालयाने रद्द केल्या नंतर त्यांना पुन्हा त्यांची नगर उप अभियंता पदावर नियुक्ती करताना ज्या अटी व शर्थी निश्चीत करण्यात आलेल्या होत्या त्या अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व त्यास व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

४. उप आयुक्त (समाज कल्याण) या पदाकरील नियुक्ती ज्या अटी व शर्थीवर करण्यात आल्या त्या अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व त्यास व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिति आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडून वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, कलम ४५४ अंतर्गत नियम प्रसिध्द करण्यात आलेले नाहीत. तरी जन माहिती अधिका-यांनी तसे अपीलकारास कळवावे.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१५/०२**

**श्री.दिनकर सदाशिव कांबळे**
**४०, वानवाडी, पुणे ४११ ०४०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिनकर सदाशिव कांबेळ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.१०.२००८ रोजी अर्ज करुन, भा.प्र.से मधील अधिका-यांनी पुणे महानगरपालिकेत कार्यरत असतांना पदाचा व अधिकाराचा विशिष्ट हेतुने भ्रष्टाचार करुन बेकायदेशिर, नियमबाहय केलेल्या नियुक्त्या ठराव. महापालिका कायदा कलम ४५१ नुसार राज्य शासनास असलेल्या अधिकारात विखंडीत करुन निर्णय घेणा-या भ्रष्ट अधिका-यानवर कारवाई करण्याबाबत अनुषंगीक माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.०२.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. सद्या विषयाधीन प्रकरणावर कार्यवाही चालू असेल त्याबाबतची कार्यवाही पूर्ण

झाल्यावर त्यासंबंधीची माहिती जन माहिती अधिका-यांनी पुरवावी असे निर्देश दिले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिलेले आदेश मान्य नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सविस्तर माहिती अपीलकारास पुरविल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरविण्यात यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २२.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९०/०२**

**श्री. प्रभाकर मारुती कोंढालकर**
**बी १ मुक्तानंद हौसिंग सोसा,**
**चव्हाणनगर धनकवडी,**
**पुणे ४१० ०४३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग ल-६ व ल-४,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग ल-६ व ल-४,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रभाकर मारुती कोंढाळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०६.२००७ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कायदा चालू झालेपासून ते आजपर्यंत आपणांकडे जे अर्ज दाखल झालेले आहेत त्या सर्व अर्जांची सही व शिक्क्यासह नक्कल मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने व्यथीत होउन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.१३.०९.२००७ रोजी प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली संबंधीत नस्ती सापडत नसल्याने माहिती देता आली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती यांनी सर्व संबंधीत नस्ती / कागदपत्राचा जाणीवपूर्णक शोध घ्यावा. संबंधीत नस्ती / कागदपत्र सापडल्यानंतर त्याच्या छायाप्रती अपीलकारास पुरवाव्यात.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६७४/०२**

**श्री. के.आर.गांगुर्डे**
**तरूण नवयुवक विकास मंडळ,**
**रायतेल. पो.देवजी पाडा, ता.साक्री,**
**जि.धुळे. महाराष्ट्र राज्य. संविधान भारत ४२४ ३०४.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मदत व पुनर्वसन, महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मदत व पुनर्वसन, महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. के.आर.गांगुर्डे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१०.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०२.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०७.२००७ रोजी अर्ज करुन, त्यांच्या दि.१२.०९.२००६ च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्याने अपीलकाराचा अर्ज त्या विभागाकडे दि.१८.०७.२००७ च्या पत्रानुसार हस्तांतरीत केला. अपीलकारास माहिती देणेबाबत सुचित करण्यात आले तसेच अपीलकारास अवगत करण्यात आले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती महसूल व वन विभागाशी संबंधित आहे. म्हणून त्यांचा अर्ज महसूल व वन विभागाकडे

जन माहिती अधिका-यांनी हस्तांतरित केला आहे.  तेव्हा अपीलकाराने महसूल व वन विभागातील प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०९.२००७ च्या पत्रान्वये कळविले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

तलाठी मौ.रायतेल ता.साक्री, जि.धुळे यांच्या हस्ते केलेल्या घर नुकसान भरपाई रक्कम वाटप करतांना झालेल्या अनियमीततेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  महसूल व वन विभागाच्या (मदत व पुनर्वसन) जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही.  जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४२/०२**

**श्री. बापुसाहेब उत्तमराव पालवे**
**गुरूकुल सोसायटी, प्लॉट नं.५८,**
**पाईप लाईन रोड, रतवेडी,**
**अहमदनगर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग व गृह विभाग (विशा-६)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग व गृह विभाग (विशा-६)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. बापुसाहेब पालवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

१. क्रांती चौक पो.से.औरंगाबाद शहर येथे दि.२२.०४.२००७ रोजी दाखल असलेल्या अप नंबर १६०/०७ क्र.३७६, ३५४, ३४२, ३४ भा.र.वि.या गुन्हयांतून घेतले. विधानसभेत सन २००७ मधील पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न विचारणा आला होता. त्या तारांकित प्रश्नाची सत्यप्रत व त्या अनुषंगाने सदर गुन्हयाचे तपासी अमंलदार यांनी शासनाला पाठविलेल्या सर्व

कागदपत्रांच्या सत्यप्रती व तपासी अंमलदार यांनी पाठविलेल्या अहवालाची सत्यप्रत व त्यावर शासनाने विधानसभेत दिलेल्या उत्तराची सत्यप्रत.

२. सदर गुन्हयाच्या तपासी अंमलदाराच्या चौकशी करण्याबाबत शासनाने काढलेल्या आदेशाची सत्यप्रत सदरची चौकशी मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी केली असून चौकशी दरम्यान त्यांनी केलेल्या जबाबांच्या सर्व प्रती व चौकशी अहवालाची सत्यप्रत जी त्यांनी शासनास सादर केला आहे.

जन माहिती अधिका-यांनी दि.२६.०७.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. दरम्यान जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत कोणताही आदेश दिला नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०३.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर माहिती पोटी रु.३६ (टपाल खर्चासह) एवढे शुल्क भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०९.०७.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपूर्ण माहिती देउन जाणूनबुजून माहिती देण्यास अडथळा करीत असल्यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

क्रांतीचौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे दि.२२.०४.२००७ रोजी दाखल असलेल्या क्र.१६०/०७, क्र.३७६, ३७४, ३४२, ३४ भा.द.वि. या गुन्हयाबाबत विधानसभेत सन २००७ मधील पावसाळी अधिवेशनात तांराकित प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकारास अर्जातील मुद्यानुसार मुद्येनिहाय माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## <u>आदेश</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९२/०२**

**सचिव, सोनामाता समाज सेवा संघ,**
**१५, मेडिकल को.ऑप.हौ.सो. टिळक नगर,**
**विजापूर रोड, सोलापूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिम न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिम न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार सचिव, सोनामाता समाज सेवा संघ, सोलापूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Confercning रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०९.२००८ रोजी अर्ज करुन, संस्थेचे रोखलेले अनुदान त्वरित सुरु होउन मिळणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी दि.०८.११.२००६ रोजी सुनावणी झाली आहे. संस्थेने प्र.सचिव, सामाजिक न्याय विभाग यांना दि.२०.०८.२००८ रोजी पत्र पाठविले होते. सदर पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे ब्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन संस्थेने रोखलेले अनुदान सुरु करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.  भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी दोन्ही अधिका-यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २२.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९४/०२**

**श्री.नवगिरे दिलीप दिगंबर**
**१३/३, एल.आय.जी. नीगडी,**
**पुणे ४११ ०४४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग (नवि-१३),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग (नवि-१३),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.नवगिरे दिलीप दिगंबर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०४.२००८ रोजी अर्ज करुन, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी येथील यमुनानगर सेक्टर-२१ मधील वाढीव बांधकामे नियमित करण्याच्या अनुषंगाने १५ दिवसाचे आत तोडगा काढला जाईल असे तात्काली मा.मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०९.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी येथील यमुनानगर सेक्टर-२१ मधील वाढीव बांधकामे नियमित करण्याबाबत तोडगा काढला जाईल असे तात्कालीन मा.मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते.  याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती.  पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी येथील यमुनानगर सेक्टर-२१ मधील वाढीव बांधकामे नियमित करणेचे अनुषंगाने कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.  सदर प्रकरणाची कार्यवाही आद्याप पूर्ण झालेली नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१३.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले.  यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे ती विलंबाने पुरविली आहे.  भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे.  सबब या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** (रामानंद तिवारी)
**दिनांक २२.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१६/०२**

**श्री.हजी एम.डी.शेख**
**६, सहयाद्री शॉपिंग सेंटर,**
**जुना एम्प्लॉयमेंट चौक,**
**सोलापूर ४१३ ००१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालय (माहिती वृत्त व जनसंपर्क)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हजी एम.डी.शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०४.२००८ रोजी अर्ज करुन, अधिस्वीकृती (Accredition) बाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागीतलेली माहिती माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाशी निगडीत होती. म्हणून सामान्य प्रशासन विभागातील जन माहिती अधिका-यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेले नियमावली व निर्णयाच्या प्रती अपीलकारास दिल्या. अपीलकाराचा अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता दि.२५.०४.२००८ च्या पत्रानुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे हस्तांतरित केला. यामुळे समाधान झाले नसल्याने माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकारास त्यांची बाजू मांडण्यास संधी दिली नाही. महाराष्ट्र राज्य अधिस्विकृती समितीची यादीची छायाप्रत अपीलकारास पुविण्यात आली. अपीलकाराने मागणी केलेली सविस्तर माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन अधिस्विकृतीबाबत (Accredition) अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा मुध्दा व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत मागणीप्रमाणे सविस्तर माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २२.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१८/०२**

**श्री.शामराव दादा हिंगणे**
**रा.मुजावर प्लॉट, स.नं.४६६/२,**
**प्लॉट नं.९, एस.टी.स्टँड चे पुर्वेस,**
**सांगली ४१६ ४१६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग (नाजकथा-३),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग (नाजकथा-३),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शामराव हिंगणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

नागरी जमिन कमाल धारणा कायदा (ULCACT) रद्द झाल्यामुळे सांगली येथील सर्वे क्र.४६६/२ जमिनीच्या खेरदीपत्राची नोंद होण्याबाबत शासनाकडे दि.०७०८.२००८ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जाची पोच दिली नाही. सदर अर्जाबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांना काय आदेश देण्यात आले आहेत. नागरी जमिन धारणा कायदा लागू होण्यापूर्वीच सदर जमिनीवर अर्जदार व इतर लोकांनी घरे बांधून निवासी वापर सुरु आहे. अशा परिस्थितीत कायद्याप्रमाणे कार्यवाही का सुरु करण्यात आली. संपादीत क्षेत्र असा इतर हक्कात दाखला का ठेवण्यात आला याची चौकशी समक्ष पाहणी करून व नगरपालिकाकडून संबंधीत कर वसूलीचे रेकॉड पाहून खात्री करण्यात यावी. संपादित केलेले क्षेत्राची

कार्यवाही योग्य असल्यास त्या क्षेत्राची व त्यावरील बांधकामाचा खर्च शासनाने त्वरित देउन त्याचा ताबा घ्यावा. अथवा आता कायदा रद्द झाल्यामुळे संपादित क्षेत्राची नोंद ७ x १२ वरुन कमी करण्यात यावी. अधिकाराचा गैरवापर करुन केवळ अर्जदार यांना त्रास देण्याच्या उध्देशाने ज्या अधिका-यांनी संपादनाची कार्यवाही प्रत्यक्ष जागेची वस्तुस्थिती न पाहता केली त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी अपीलकाराणे मागणी केली होती.

अपीलकाराच्या अर्जावर उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, सांगली नागरी समुह यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अर्जातील मुध्दा क्र.२ ते ५ प्रश्नोत्तर स्वरुपात असून माहिती या सदरात येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.०३.११.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, सांगली नागरी समुह यांचेकडून तात्काळ अहवाल मागवून प्रकरणाचा निपटारा होणे आवश्यक वाटते. तरी उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, सांगली नागरी समुह यांचेकडून तात्काळ अहवाल प्राप्त करुन घ्यावा व अहवालावर नियमानुसार आवश्यकती कार्यवाही करुन त्यासंबंधीची / माहिती कागदपत्र अपीलकारास विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावीत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास सर्व्हे क्र.४६६/२ सांगली वर नाजकधा कायद्यानुसारची कार्यवाही अपेक्षीत आहे. जन माहिती अधिका-यांनी उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, सांगली नागरी समुह यांचेकडून तात्काळ अहवाल प्राप्त करुन घ्यावा व अपीलकारास आवश्यकती माहिती निर्णय हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावा.

**<u>आदेश</u>**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २२.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८१९/०२**

**श्री.राजीव प्यारेलाल नंदा**
**६९२, टाबूल स्ट्रिट, पुणे ४११ ००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**मुंबई पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस महानिरीक्षक (गोपनीय)**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**मुंबई पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.राजीव न्यारेलाल नंदा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१२.२००८ रोजी अर्ज करुन मा.उप मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या आणि उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालयांनी त्यांचे क्र.जन/उमुस/२९४२२, दि.२१.०७.२००८ च्या पृष्ठांकनान्वये गृह विभागास पाठविलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती मागीतली होती.

अपीलकाराने दाखल केलेल्या अर्जातील तक्रारी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील होत्या. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी दि.२२.०८.२००८ च्या ज्ञापनान्वये चौकशीसाठी व चौकशीचा अहवाल महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयाकडे सादर करण्याच्या निर्देशासह माहितीच्या अधिकारातील

अर्ज पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना पाठविण्यात आला होता. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.१५.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली व दि.०५.०३.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्रीमती.कैलास नंदा यांच्या पतीने पुणे कॅन्टॉन्मेंट बोर्डाच्या अखत्यारितील खरेदी केलेली प्रापर्टी, श्री.याकुब शेख व इतर यांनी खोटी कागदपत्र तयार करुन फसवणूकीने बलकावलेबाबत त्यांच्याविरुध्द दि.१७.०३.२००८, दि.०७.०४.२००८ रोजी तक्रार नोंदवूनही पुणे पोलीसांनी दखलपात्र गुन्हा दाखल केला नाही याबाबत अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहिती मागीतली होती. अपीलकार यांचा दि.०७.०७.२००८ चा तक्रार अर्ज व पोलीस महासंचालनालयाचे दि.२२.०८.२००८ ला अनुसरुन दि.३०.०१.२००९ अन्वये अहवाल सादर केला. पोलीस आयुक्त, पुणे यांनी त्यांचे प्रत क्र.अर्जशाखा/अ/शासन/८/०८ दि.३०.०१.२००९ अन्वये सादर केलेल्या अहवालाची प्रत अपीलकारास पोच देय डाकेने उपलब्ध करुन द्यावे. सदर अर्जाच्या चौकशी अंता अपीलकाराच्या

<u>**आदेश**</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २२.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८६/०२**

**श्री. दत्तात्रेय मोहन पेठकर**
**आर/०११५२ ए, विष्णू गल्ली,**
**मु.पो.ता.तासगांव, जि.सांगली ४१६ ३१२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (रस्ते)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (रस्ते)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दत्तात्रेय पेठकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१२.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१०.२००८ रोजी अर्ज करुन अपीलकाराच्या मालकीच्या वडिलोपार्जीत जमिन सर्व्हे क्र.११२ (०)/सर्व्हे क्र.५४ या क्षेत्राची नुकसान भरपाईची रक्कम जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून मिळण्याबाबत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज नुकसान भरपाईची रक्कम व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होती. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच आत सदर प्रकरणी सुनावणी ओयाजित करावी. आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२९/०२**

**श्री. किर्ती बी.सोनी**
**२०, निळकंठ परब चाळ,**
**पोद्दारवाडी, शहाजी राजे मार्ग,**
**कोलडोंगरी, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किर्ती सोनी दत्तात्रेय पेठकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन पोद्दारवाडी सहकारी गृहनिर्माण संस्था पोद्दारवाडी, विलेपार्ले (पू), मुंबई या संस्थेच्या इमारतीत गाळे खरेदी केलेल्या गाळे धारकाची आद्यावत यादी व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

विक्रीघटकाच्या गाळेधारकांची यादी कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच बांधकाम साहित्याचे मोजमाप आणि त्याची तपासणी याचा तपशील कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही. संक्रमण शिबीराबाबतच्या तपशीलासाठी नेमक्या देय माहितीदाखल उपलब्ध स्वरुपातील कोणत्याही

साहित्याबाबत अथवा मुग्रीबाबत कळवावे. जेणेकरुन योग्यती माहिती देता येईल. किंवा संबंधीत बाबतचे उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख यांचे निरीक्षण करण्याबाबत अपीलकारास दि.०८.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन पोद्दारवाडी सहकारी गृहनिर्माण संस्था पोद्दारवाडी विलेपार्ले (पू) मुंबई या संस्थेच्या इमारतीतल गाळे खरेदी केलेल्या गाळेधारकांची यादी व इतर माहिती मागीतली होती. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी अभिलेख, दस्तऐवज साधनसामग्रीचे निरीक्षण परवानगी दिली. अपीलकारास मागणीनुसार माहिती पुरविली. विशिष्ट गाळा मिळण्याची अपीलकाराची मागणी असल्याचे सुनावणीचेवेळी आयोगाच्या निदर्शनास आले. अपीलकारास विशिष्ट गाळा प्राप्त करुन देण्याची बाब राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. याकरिता आयोग अपीलकारास काही मदत करुन शकत नाही. इतर उर्वरित माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२३/०२**

**श्री.दिनकर सदाशिव कांबळे**
**४०, वानवाडी, पुणे ४११ ०४०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिनकर सदाशिव कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

१. श्री.खरवडकर विवेक, यांची नगर उप अभियंता पदवरील नियुक्ती करताना दिलेल्या जाहिरातील शैशणिक पात्रता, अटी, शर्थी व वय इ. अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

२. श्री.वाघमारे प्रशांत, यांची नगर उप अभियंता पदावरील नियुक्ती करताना दिलेल्या जाहिरातील शैशणिक पात्रता, अटी, शर्थी व वय (वर्ष ४०) इ. अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने

दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

३. श्री.वाघमारे प्रशांत, यांची नगर उप अभियंता पदावरील नियुक्ती मे.उच्च न्यायालयाने रद्द केल्या नंतर त्यांना पुन्हा त्यांची नगर उप अभियंता पदावर नियुक्ती करताना ज्या अटी व शर्थी निश्चीत करण्यात आलेल्या होत्या त्या अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व त्यास व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

४. उप आयुक्त (समाज कल्याण) या पदाकरील नियुक्ती ज्या अटी व शर्थीवर करण्यात आल्या त्या अटी व शर्थीस कलम ४५४ नुसार शासनाने दिलेल्या मान्यतेच्या कागद पत्रांच्या प्रती व त्यास व कलम ४५५ (२) नुसार ऑफीशल गॅझेट मध्ये दिलेल्या प्रसिध्दी प्रत मिळणेस विनंती.

जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडून वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, कलम ४५४ अंतर्गत नियम प्रसिध्द करण्यात आलेले नाहीत. तरी जन माहिती अधिका-यांनी तसे अपीलकारास कळवावे.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २९.०६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०७५/०२**

**श्री. संजय पी.कोटी**
**रूम नं.बी-६४७ बेथलेगम चाळ,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,**
**शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला,**
**४९, खेरवाडी, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र तंत्र शिक्षण संचालनालय,**
**३ महानगरपालिका मार्ग, धोबी तलाव,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संजय पी.कोटी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०७.२००८ रोजी अर्ज करून विनाअनुदानीत एस.एच.जोंधळे पॉलीटेक्नीकल कॉलेज, डोंबीवली बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन जोंधळे पॉलीटेक्नीकल कॉलेज, डोंबीवली बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकारास संचालक तंत्रशिक्षण यांच्या बांद्रा येथील विभागीय कार्यालयाने माहिती पुरविली असल्याची बाब सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी निदर्शनास आणून दिली.  यावरुन अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली असावी.  व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलकार अनुपस्थित होते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८३८/०२**

**ॲड. सुनील व्ही.भागुतरे**
**दुसरा मजला, बांद्रा बार,**
**असोसिएशन बांद्रा कोर्ट,**
**मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**म्हाडा, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप संचालक**
**म्हाडा, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार ॲड. सुनील व्ही.भागुतरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.दयाराम बीजबालम मौर्या यांना न्यु.म्हाडा कॉलनी दींडोशी, मालाड (पू) मुंबई येथे इमारत क्र.१-डी मध्ये सदनिका क्र.३०१ वाटप करण्यात आली. सदनिका वाटप व ताबा घेण्याबाबतच्या पत्राच्या साक्षांकित छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम

अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत सदनिका वाटप व ताबा पत्राच्या साक्षांकित प्रती पुरवाव्यात. माहिती पुरविण्याकरिता विलंब झाल्याबाबत जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई का करण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे अता आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०६८/०२**

**श्री.हरिष चंदू बडेकर**
**३०४/७ तेजोमय को.ऑ.हौ.सोसा,**
**चाटकोप सेक्टर क्र.३, कांदिवली (प)**
**मुंबई ४०० ०६७.** .... अपीलकार

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक**
**लोक आयुक्त, महाराष्ट्र यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**लोक आयुक्त, महाराष्ट्र यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला,**
**मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.** .... उत्तरवादी

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.हरीष चंदू बडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती. शासन निर्णय दि.१८.११.२००६ प्रमाणे कार्यालयीन आदेश दि.०८.१२.२००६ अन्वये इतर जिल्हयातील कार्यालयातील पदा मधील पदोन्नतीसारखी मुंबई शहर जिल्हास लागू केली. वेतन निश्चिती केली. दि.०१.१०.१९९४ ते ३१.१२.२००६ या कालावधीची फरकाची रक्कम मिळाली नाही. वेतन फरकाची रक्कम व्याजासहीत मिळावी याबाबत आदेश व्हावेत अशी मागणी केली होती. अर्जावर जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यवाही करित नाहीत अशी धारणा असल्यास विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचेकडे दाद मागावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. असा सल्ला महाराष्ट्र लोक आयुक्त

आणि उप लोकआयुक्त १९७१ च्या कोणत्या नियमानुसार दिला त्या नियमाच्या छायाप्रती व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२४.११.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलातील कागदपत्राची तपासणी केली. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी केलेले प्रतिपादन लक्षात घेता अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४४/०२**

**श्री.खान इनापुर रहमान शब्बीर अहमद**
**सर्व्हे नं.२२४, गुरूवाड वार्ड, इस्लाम नगर,**
**मालेगांव (नाशिक).** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई विभाग, चर्नी रोड, जवाहरलाल भवन,**
**मुंबई ४०० ००४.**

**जन माहिती अधिकारी,**
**नुरूल इस्लाम उर्दु हायस्कूल ॲन्ड जुनिअर कॉलेज,**
**प्लॉट नं.२५८, मदिना मस्जिद जवळ, गोवंडी,**
**मुंबई.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.खान इनापुर रहमान शब्बीर अहमद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये दि.०९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०३.२००८ रोजी अर्ज करून खालील माहिती मागीतली होती.

"कनिष्ठ महाविद्यालयात उपशिक्षक अन्सारी मो.रमजान मो.मक्की यांना कनिष्ठ महाविद्यालयात नेमणूकीकरिता दिलेले नेमणूक आदेश, रूजू अहवाल, संस्थेत लागल्यापासून ते आजपावेतो वेतनश्रेणी इत्यादी संदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती."

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सदर प्रकरणी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलकाराने व्दितीय अपील मागे घेण्याची मागणी केली. अपीलकाराची व्दितीय अपील मागे घेण्याची विनंती आयोगाने मान्य केली.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६७१/०२**

**श्री. लव शंकरराव शिंदे**
**मु.अशोकनगर, पो.कारेगाव फॅक्टरी**
**ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.लव शंकरराव शिंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.०२.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

अहमदनगर पाटबंधारे विभागांतर्गत वडाळा उपविभाग, श्रीरामपूर येथे झालेल्या सिमेंट व अन्य भ्रष्टाचाराचे अनुषंगोन दक्षता पथक मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, कोपरी, ठाणे यांनी चौकशी करुन प्राथमिक अन्वेषण अहवाल दि.२९.१०.२००५ रोजी शासनास सादर केला त्याबाबत.

वडाळा पाटबंधारे उपविभांतर्गत झालेला भ्रष्टाचार व हजारो पोती सिमेंट घोटाळयाबाबत माहिती मागीतली आहे. सदर प्रकरण शासनाकडून गोपनीय पत्र तक्रार क्र.१३०१/१७२३/८१९३/०४/द-१, दि.०६.०९.२००४ रोजी कार्यालयास प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने दक्षता पथकाने चौकशी करुन

प्राथमिक अन्वेषण अहवाल गोपनीय पत्र क्र.३४० दि.२९.१०.२००५ अन्वये शासनास सादर केला आहे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२३.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(ज) मधील तरतुदीनुसार सदर चौकशी अहवालाची प्रत सद्यस्थितीत अपीलकारास उपलब्ध करुन देता येत नाही. ही बाब जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०१.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविली आहे. सदरचा निर्णय कायम असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१३.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली आहे. चौकशी अहवाल व इतर संबंधीत कागदपत्र गोपनीयतेच्या कारणावरुन अपीलकारास पुरविण्यात आला नाही. सदर बाब योग्य नाही. भ्रष्टाचारासंबंधीच्या बाबी संबंधी चौकशी पूर्ण झाली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास चौकशी अहवालाची प्रत व इतर संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०७९/०२**

**श्री. संजय गंगाराम पवार**
**हनुमान मित्र मंडळ,**
**अंबा मित्र चाळ वाडी, जहाँगीर मेरवानजी पथ,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संजय गंगाराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.०९.२००८ रोजी अर्ज करुन मा.मुख्यमंत्री व सचिव गृहनिर्माण विभाग यांच्याकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बांद्रे यांचेबाबत दि.१३.०५.२००८ रोजी सादर केलेल्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी रद्द करणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली आहे. संस्थेची नोंदणी रद्द करण्याचे अधिकार कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नाहीत. त्यामुळे अपीलकाराच्या अर्जावरती कार्यवाही करण्याचा

प्रश्न उद्‌भवत नाही.  याकरिता अपीलकार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग मुंबई यांचेकडे दाद मागू शकतात असे दि.१५.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविण्यात आले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०८.१२.२००८ रोजी तसे आदेश पारित केले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्री.महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था व मेसर्स पोथफूल डेव्हलपर्स यांच्या वतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या माध्यमाने ३३(१०) अंतर्गत पुनर्वसन योजना राबवित आहे.  बृहन्मुंबई महानगरपालिकेची ना हरकत प्रमाणपत्र व परिशिष्ट-२ ही प्राप्त झाले आहे.  झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने एल.ओ.आय.व आय.ओ.ए.दिले आहे.  अर्ध्याअधिक लोकांनी प्रतिक्षानग येथे संक्रमण शिबीरात स्थलांतर केले आहे.  परंतू काही लोकांनी अंबाचाळ वाडी रहिवाशी सेवा संघ चॅरीटेबल ट्रस्ट अंतर्गत नोंदणी करुन न्यायालयीन प्रक्रीयेव्दारे योजनेला विरोध केला.  दि.१४ मार्च, २००७ रोजी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागला परंतू अद्याप योजना कार्यान्वीत झाली नाही.  विलंब होत आहे.  म्हणून संस्थाचालकांनी High Power Committee कडे दाद मागीतली आहे.  सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी केलेले प्रतिपादन लक्षात घेता तसेच अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०६.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०४३/०२**

**श्री. मदनलाल ठाकूरप्रसाद त्रिवेदी**
**बि.क्र.१७, खो.क्र.१६, बी.एम.सी. कॉलनी,**
**शिवाजी नगर, खेरवाडी रोड, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग, पोल-५ अ,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी / अवर सचिव**
**गृह विभाग, पोल-५ अ,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मदनलाल त्रिवेदी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०९.२००८ रोजी अर्ज करुन बॅंन्ड मास्टर गट "ब" बृहन्मुंबई पोलीस दल एक जागेवर श्री.सौदान भवानी सिंग यांच्या निवड झाली याबाबत अनुषंगीक एकूण ८ मुद्यावर माहिती मागीतली होती. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयेजित करण्यात आली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

बृहन्मुंबई पोलीस दलात बॅंन्ड मास्टर (पोलीस निरीक्षक) म्हणून श्री.सौदान भवानी सिंग यांची नियुक्ती दि.२९.०३.२००६ च्या शासन निर्णयानुसार केली आहे. या नियुक्तीबाबत संशय व्यक्त केला

आहे. बँन्ड मास्टर गट ब हे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील आहे. त्यामुळे सदर पद भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविले होते. त्यानुषंगाने आयोगाने दि.२१.११.२००३ रोजी जाहिरात देउन अर्ज मागविले होते. प्राप्त अर्जदारामधून श्री.सौदान भवानी सिंग यांची आयोगाने शासनाकडे शिफारस केली. त्यानुसार श्री.सिंग यांची बँन्ड मास्टर पदावर नेमणूक केली. आयोगाने केलेल्या श्री.सिंग यांच्या निवडीस एक अर्जदार श्री.करंजावणे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे मुळ अर्ज क्र.१०४८/२००५ दाखल केला होता. सदर अर्ज महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने प्रकरण सुनावणीनंतर दि.०५.०१.२००७ रोजीच्या निकालपत्रान्वये फेटाळून लावले. अपीलकाराने सदर प्रकरणी मागणी केलेली माहिती दि.२३.१२.२००८ च्या पत्रान्वये दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७७९/०२**

**श्री.के.वी.खाडे**
**१२१६/६, पाटील बंगला, फर्ग्युसन कॉलेज रोड,**
**स्टेप इन हॉटेल मागे, पुणे ४११ ०४४. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक,**
**व्यवयाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**३, महानगरपालिका मार्ग, टपाल पेटी क्र.१००६३६,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**व्यवयाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**३, महानगरपालिका मार्ग, टपाल पेटी क्र.१००६३६,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.के.वी.खाडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये दि.११.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०९.२००८ रोजी अर्ज करून पुरवठा आदेश आणि मालतपासणी अहवाल १) २००७-०८ २) २००६-०७ ३) २००५-०६ या तीन वर्षाची पुरवठा आदेश, तपासणी अहवाल इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या पुरवठा आदेश, तपासणी अहवाल, एकूण नग व त्याची एकूण किंमत याबाबतची माहिती छापील स्वरूपात कळविण्यात येईल. सदर पूर्ण माहिती संगणकात उपलब्ध नसल्याने अपीलकारास सीडी,फलॉपी, पेन ड्राइव्ह अश्या स्वरूपात देता येणार नाही. सदर माहिती संकलीत असून त्यासाठी छायाप्रती करण्याचा

एकूण खर्च रु.१०००/- डी.डी.च्या स्वरुपात संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे कार्यालयात जमा करावा व त्याची पावती सादर केल्यानंतर अपीलकारास माहिती देण्यात येईल असे दि.१८.१०.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले.

संपूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकारान प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.११.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. १) पुरवठा आदेशांचा (A.T.) तीन वर्षाचा तपशील (२००५-२००६ ते २००७-२००८) अपीलकारास जंत्रीच्या स्वरुपात देण्यात आला २) पुरवठा आदेशातील आयटम (नग) चा तपासणी अहवाल संबंधीत संस्थेला त्याचवेळी पाठविण्यात येतो. त्यामुळे संस्थेकडे उपलब्ध होईल ३) जागतीक बँकेच्या खरेदी संबंधी पुरवठा आदेशाची (A.T.) मागणी अपीलकाराने दि.२०.०९.२००८ च्या अर्जात केलेली नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१३.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. माहिती संपूर्ण व तपशिलाप्रमाणे मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन पुरवठा आदेश, तपासणी अहवाल, एकूण नग त्याची एकूण किंमत इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. पुरविलेली माहिती संपूर्ण व तपशिलाप्रमाणे मिळाली नसल्याचा मुध्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. यावरुन अपीलकारास पुरविण्यात आलेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सर्व संबंधीत फाईल, कागदपत्र प्रथम निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपीलकाराने संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण करावे व आवश्यक कागदपत्राची निवड करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी निवडक कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरवाव्यात.

## <u>आदेश</u>

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८३२/०२**

**श्री. किशोर काशिनाथ घोगरे**
**३८, तृफी सदर को.औ.हो.सोसा,**
**काजुपाडा, साकिनाका, मुंबई ४०० ७२०. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता (मिठी नदी प्रकल्प)**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किशोर काशिनाथ घोगरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.१०.२००७ रोजी अर्ज करून मिठी नदी जवळचे जरीमरी, संदेशनगर, सहयोगनगर, क्रांतीनगर, मोरारजी नगर, जयभिम नगर आणि इतर जागेवर मिठी नदी पुरर्वसन योजनेबाबत अनुषंगीक ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत एकूण ६ अनुषंगीक मुद्याबाबत माहिती मागीतली होती. प्लॉट वाटपासाठी नोटीस प्राधिकरणामार्फत दिली जात नाही. कागदपत्राच्या छायाप्रती देणे, पात्र अपात्र नावाची यादी करणे, एकदा अपात्र केल्यानंतर झोपडीधारकांना पात्र कसे केले. बोगस कागदपत्र दाखवून शासनाची फसवणूक करणा-या लोकावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता. अशा व्यक्तींना दिलेल्या सदनिका परत न घेण्यामागची कारणे काय इत्यादी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधीत माहिती मागीतली होती. याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अवगत केले. अपीलकार व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता अनुपस्थित राहीले. जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन केलेले प्रतीपादन लक्षात घेता सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१३५०/०२**

**श्रीमती.विजया रविंद्र महाडदळकर**
**व श्री.प्रकाश रविंद्र महाडदळकर**
**राममंदिर कपाउंड मंडपेश्वर रोड,**
**विठ्ठठ अपार्टमेंट व सुधीर फडके उड्डाव पुलापुढे,**
**बोरिवली (प), मुंबई ४०० १०३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (प),**
**मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (प),**
**मुंबई ४०० ०६४.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.विजय रविंद्र महाडदळकर व श्री.प्रकाश रविंद्र महाडदळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.०१.२००८ रोजी अर्ज करून खालील माहिती मागीतली होती.

श्री.रविंद्र पुरशोत्तम महाडदळकर हे पी/उत्तर विभाग. मुंबई महानगरपालिका, आरोग्य खाते, लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई ४०० ०६४ येथे कार्यरत असतांना दि.०१.०६.२००५ रोजी मृत्यू पावलेले आहेत. कै.महाडदळकर यांची मुंबई महानगरपालिकेत २५ वर्षाहून अधिक सेवा झालेली आहे.

श्री.रविंद्र पुरशोत्तम महाडदळकर यांच्या निधनानंतर त्यांचे कु.नि.वे., भ.नि.नि. व इतर देय रकमा मिळण्यासाठी तसेच श्री.प्रकाश रविंद्र महाडदळकर यांना अनुकंपा तत्तवार नियुक्ती मिळण्याबाबत संबंधित मा.वैद्यकीय अधिकारी, पी/उत्तर विभाग. मुंबई महानगरपालिका, आरोग्य खाते, लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई ६४ यांना दि.२८.११.२००५ रोजी (प्रती सोबत वरीलप्रमाणे आहेत) सादर करण्यात आलेल्या अर्जावर गेल्या दोन वर्षाहुन अधिक कालावधीत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, याबाबतची माहिती मिळणे.

जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०४.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.१६.०५.२००८ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत हेउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्री.रविंद्र पुरशोत्तम महाडदळकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचे भविष्य निर्वाह निधी दावा, निवृत्तीवेतन दावा, मुलाचे अनुकंपा तत्वावरील नोकरीबाबतचे कागदपत्र वैद्यकीय अधिक्षक भगवती रूग्णालय येथे सेवा अभिलेख परिरक्षीत केलेला असल्याने तपासणीकरिता पाठविलेले होते. परंतू त्रुटी पूर्तता करण्याकरिता सदर दावे दि.२९.०५.२००९ रोजी परत पाठविण्यात आले. कार्यालयाने त्रुटीची पूर्तता केली आणि दावे

१) क्र.एसीपीएन/१०४३२/आस्था अनुसार अग्रहक नोकरी मिळणेबाबतचा दावा (पी.टी.केस) २) भनिनि दावा क्र.एसीपीएन/१०४३१/आस्था ३) निवृत्तीवेतन दावाक्र.एसीपीएन/३३९३२/आस्था दि.१९.०६.२००९ अन्वये कार्यालय अधिक्षक, भगवती रूग्णालय येथे पाठविलेले आहेत. तपासणी झाल्यावर सदर दावे मंजूरीकरिता पुढे पाठविली जातील असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास प्रलंबित दाव्यासबंधीची सद्यस्थिती अपीलकारास कळवावी.

**आदेश**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २५.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८३०/०२**

**श्री. कलीम खान ता.मोहम्मद खान**
**जमानादास वासनजी चाळ, नं.९१/९३ शॉप नं.२०/२१,**
**७ वी क्रॉस गल्ली, एस.पी.मार्ग, कामाठीपुरा, मुंबई ८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (निवडणूक)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, ६ वा मजला,**
**विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, ६ वा मजला,**
**विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.कलीम खान ताज मोहम्मद खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

विना नोटीस जागा तोडल्याबाबत, फोटोपासबाबत कमर्शियल दोन फोटोपास, कमर्शियल रेसीडेन्सी मध्ये झाल्याबाबत अपीलकाराने दि.०३.०१.२००८ रोजी व दि.१४.०१.२००८ रोजी पत्र दिले आहे. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. डी.एम.सी झोन क्रमांक-१ ने काय उत्तर दिले. त्याची छायाप्रत व त्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराची छायाप्रत मागीतली होती. अर्जाबाबत म्हणने मांडण्यासाठी कार्यालयात दि.२९.०२.२००८ रोजी उप आयुक्त (निवडणूक) यांच्या दालनात उपस्थित राहण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०२.२००८ च्या पत्रान्वये तसेच दूरध्वनीव्दारे अपीलकारास कळविण्यात आले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०३.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.

अपीलकाराच्या दि.०३.०१.२००८, दि.३१.०१.२००८ व दि.१२.०२.२००८ च्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकारास जमानादास वसनजी चाळ, म्युनिसिपल घर क्र.५५ अे ते १०५ शंकर पुपाला मार्ग, मुंबई ८ आणि चंद्रमणी बुध्दविहार मार्ग १० वी गल्ली, कामाठीपुरा, मुंबई ८ येथील झोपड़डयाबाबत सविस्तररित्या दि.२८.०३.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरचे प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आले. यापुढे कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती व्यवस्थित दिली नाही सुनावणी घेतली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराची फोटोपास रद्द झाल्याबाबत त्यांची तक्रार आहे. फोटोपास रद्द झाल्याबाबतचे ग्रा-हाने दूर करण्याचीबाब माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाही. उप आयुक्त महानगरपालिक यांनी सदर प्रकरणी अपीलकारास दि.२८.०३.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८७/०२**

**श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी**
**कलादालन मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ४१६ १०३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**स्वा सौक-१, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**स्वा सौक-१, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन कै.गणपतराव चिंतामणी धर्माधिकारी (फौजदार) व त्यांच्या पत्नी रुक्मीनबाई यांच्या वारसदारांना सन्मानपत्र देणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जास अनुसरुन वस्तुस्थिती दि.१६.०७.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.०७.२००७ रोजी अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपील अमान्य केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने आई वडील स्वातंत्र्य सैनिक (भुमिगत) होते. म्हणून रितसर अपीलकाराने दि.०४.०७.१९९५ च्या निकषानुसार आवश्यकती कागदपत्र पुराव्यासह स्वातंत्र्य सैनिक सन्मान पत्र व

सवलत मिळण्याबाबत शासनाकडे विनंती केली. सदर प्रकरणी उपलोक आयुक्त यांचेकडे सुनावणी होउन आदेश निर्गमित केले. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडून अहवाल पाठविला का? असल्यास या प्रकरणावर पुढील कोणती व काय कार्यवाही होणार आहे. अपीलकारास माहिती व मार्गदर्शन करण्याची अपीलकाराने दि.१९.०६.२००७ च्या पत्रान्वये विनंती केली होती. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाची वस्तुस्थिती अपीलकारास दि.१६.०७.२००७ च्या पत्रान्वये कळविली आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत कार्यवाही केली आहे. प्रकरणाची वस्तुस्थिती अपीलकारास कळविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२०/०२**

**श्री. दशरथ नानासाहेब राउत**
**मु.पो.खांडज, ता.बारामती,**
**जि.पुणे ४१३ ११६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दशरथ नानासाहेब राउत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२१.०६.२००८ रोजी अर्ज करुन, चौकशी समिती अधिकारी प्रा.सौ.एम.ए.चिगटेरी, प्रा.के.एम.काकडे आणि प्रा.जी.बी.जोशी यांनी मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केलेला चौकशी अहवालाची प्रमाणित छायाप्रत मिळणेबाबत विनंती केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१०.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

शिवनगर विद्याप्रसारक मंडळ, मालेगांव बु.ता.बारामती, जि.पुणे या संस्थेच्या तंत्रनिकेतनच्या विविध बेकायदेशीर कामकाजाबाबत चौकशी करण्याबाबत अपीलकाराने तक्रार केली होती. अपीलकाराच्या तक्रारीस अनुसरुन सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले. शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथील प्रा.सो.एम.ए.चिगटेरी, प्रा.के.एम.काकडे आणि प्रा.जी.बी.जोशी यांनी सादर तंत्रनिकेतनला दि.२१ मे, २००८ रोजी प्रत्यक्ष भेट देउन चौकशी केली. सदर चौकशी समितीने चौकशी अहवाल संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केला. सदर अहवालाची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी अहवालाची प्रत दि.११.१२.२००८ च्या पत्रासोबत अपीलकारास पाठविली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी माहितीच्या अर्जावर विलंबाने कार्यवाही केली असल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थित मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२१/०२**

**श्रीमती.शकुंतला संभाजी कांबळे**
**मु.पो.पोखर्णी, ता.वाळवा,**
**जि.सांगली. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (एम/पूर्व)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, चेंबूर (एम/पूर्व)**
**२ रा मजला, कै.शरदभाउ आचार्य मार्ग,**
**मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,**
**(मुख्य लिपीक आस्था) (एम/पूर्व),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, चेंबूर (एम/पूर्व)**
**२ रा मजला, कै.शरदभाउ आचार्य मार्ग,**
**मुंबई ४०० ०७१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.शकुंतला संभाजी कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०१.२००८ रोजी अर्ज करुन, श्रीमती.वदंना बाबू जंगले यांनी मुंबई महानगरपालिका कार्यालयात कामावर हजर होतांना सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. १) नोकरी मिळणेबाबत केलेला अर्ज २) शैक्षणिक पात्रता (शाळेचा दाखला) ३) जातीचा दाखला ४) जात पडताळणी दाखला ५) राहण्याचा पुरावा (रेशन कार्ड) महाराष्ट्रातील वास्तव्याचा पुरावा ६) शिफारस (ओळखपत्र) ७) उत्पन्नाचा दाखला नोकरी मिळवण्याच्या संदर्भात सादर केलेले कागदपत्राच्या सत्य छायाप्रती मिळण्याबाबत मागणी केली होती.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्ष श्रीमती.वंदना बाबू जंगले यांच्या वैयक्तिक माहिती देण्याकरिता संम्मती मागीतली तेव्हा श्रीमती.जंगले यांनी त्यांची वैयक्तिक माहिती कोणालाही देउ नये असे कार्यालयास लेखी कळविले. यामुळे अपीलकारास माहिती देण्याचे नाकारले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. वैयक्तिक माहिती कोणालाही देउ नये असे श्रीमती.वंदना जंगले यांनी कार्यालयास कळविले असल्यामुळे माहिती देता येणार नाही असे अपीलकारास प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी कळविले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्रीमती.वंदना जंगले यांनी मुंबई महानगरपालिका कार्यालयात कामावर हजर होतांना सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेली कागदपत्र त्रयस्थ पक्षाची आहेत. अपीलकारास सदर माहिती देउ नये असे त्रयस्थ पक्ष श्रीमती.वंदना जंगले यांनी कार्यालयास कळविले असल्याच्या कारणावरुन अपीलकारास माहिती नाकारण्यात आली आहे. श्रीमती.वंदना जंगले यांनी नोकरीकरिता खोटी कागदपत्र सादर केली असल्याचा अपीलकाराचा दावा आहे. म्हणून त्यांनी कागदपत्रच्या छायाप्रतीची मागणी केली आहे. उक्त अधिनियमातील कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्षाच्या संम्मतीने त्रयस्थ पक्षाची माहिती पुरवावयाची आहे. सदर प्रकरणी त्रयस्थ पक्षाने अपीलकारास माहिती पुरविण्यास संम्मती दिलेली नाही. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्थक उत्तर दिले असल्याने सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी घेतलेल्या निर्णयात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८२३/०२**

**श्री.दिनकर सदाशिव कांबळे**
**४०, वानवडीगांव, पुणे ४११ ०४०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दिनकर सदाशिव कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

भारतीय प्रशासन सेवेतील माजी व आजी अधिका-यांनी पुणे महानगरपालिका आयुक्त पदावर कार्यरत असतांना महापालिका कायदे, नियम व त्यातील तरतुदी यांचेकडे जाणिवपूर्वक काना डोळा करुन आयुक्त पदाचा व त्यास असलेल्या अधिकाराचा भ्रष्ट हेतुने वापर करुन केलेल्या अनेक बेकायदेशिर नियुक्त्या, पदोन्नत्याबाबत अपीलकाराने दि.१३.१२.२००७ रोजी निवेदन देउन तक्रार केली होती. त्यावर नगर विकास विभागाकडून / महापालिका आयुक्त यांच्याकडून निर्णय घेतला नाही. म्हणून सदर प्रकरणी मा.मुख्य सचिवांनी निवेदनावर दिलेल्या आदेशाच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकाराची दि.०७.०९.२००८, १०.१०.२००८, १८.११.२००८ ची पत्र सचिव (२) नगर विकास विभाग यांच्याकडे पाठविण्यात आली आहेत त्यांचकडे संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास

दि.०३.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. तसेच माहितीच्या अधिकारातील दि.३०.१२.२००८ चा अर्जही नगर विकास विभागाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित केल्याचे अपीलकारास अवगत केले.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दि.१३.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली होती. अपीलकाराने मा.मुख्य सचिव कार्यालयाकडे या प्रकरणी केलेले अर्ज नगर विकास विभागाशी संबंधीत असल्याने सदर अर्ज त्याविभागाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली असल्याचे अपीलकारास कळविण्यात आले. ज्या नागरिकांना माहिती प्राप्त करुन घ्यावयाची आहे. त्यांनी माहितीसाठी योग्य माहिती अधिका-याकडे अर्ज केला पाहिजे. सदर प्रकरणी नगर विकास विभागाशी संबंधी विषय असल्याने त्या कार्यालयाकडे अपीलकाराने संपर्क करणे आवश्यक आहे. मुख्य सचिव कार्यालयातील माहिती अधिका-याकडून माहिती उपलब्ध झाली पाहिजे ही अपीलकाराची मागणी कायदेशिर तरतुदीशी सुसंगत नाही. मुख्य सचिवांच्या कार्यालयाने सर्वच शासकीय विभागांची माहिती देणे माहितीच्या कायद्यानुसार बंधनकारक आहे हा अपीलकाराचा गैरसमज असून तो माहितीच्या अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. असे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०२.२००९ रोजी आदेश पारित केले आहेत. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

सबब अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२५४/०२**

**श्री.म.सलीम नबीलाल नदाफ**
**१७१, गुरूवार पेठ, सोलापूर. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वसंतराव नाईक वि.जा.भ.ज.वि.भ.मर्या,**
**जिल्हा कार्यालय, सोलापूर.**

**जन माहिती अधिकारी,**
**वसंतराव नाईक वि.जा.भ.ज.वि.भ.मर्या,**
**जिल्हा कार्यालय, सोलापूर. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.म.सलीम नबीलाल नदाफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर अपीलावर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदार यांचेकडे जीप व ट्रॅक्टर वाहनाची ता.दक्षिण सोलापूर मध्ये लाभधारकांना वाटप केलेबाबत यादी मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती दिली नव्हती. मा.माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी तक्रारदारास आवश्यकती माहिती देणेबाबत दि.०७.०२.२००८ रोजी आदेश दिले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने दि.०८.०२.२००८ च्या पत्रानुसार जीप व ट्रॅक्टर वाहन वाटपाची सन १९९५ ते २००७ पर्यंत अखेरची माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन दिली. गैरतक्रारदाराने दिलेली माहिती अपूर्ण असल्याचा मुध्दा तक्रारदाराने वरील तक्रारअर्जात उपस्थित केला आहे. तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री.सुशिलकुमार शिंदे यांच्या हस्ते दक्षिण सोलापूर तालुक्यात एकूण ४० जिप व ट्रॅक्टर वाटप केले आहे. सन १९९५ ते २००७ पर्यंत फक्त १६ लाभार्थ्यांना

जिप व ट्रॅक्टर वाटप केल्याची गैरतक्रारदाराने दिलेली पूर्णपणे खोटी असून अपूर्ण आहे. वस्तुस्थिती प्रमाणे नाही. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सत्य माहिती दडपून ठेवली आहे. पूर्णपणे माहिती देणेबाबत जन माहिती अधिका-यांनी आदेश द्यावेत. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांना दंडीत करावे अशी तक्रारदाराने दि.१२.०२.२००८ च्या तक्रार अर्जानुसार आयोगाकडे तक्रार केली आहे. यावरुन गैरतक्रारदाराने पुरविलेल्या माहितीने तक्रारदाराचे समाधान झालेले नाही असे दिसते. गैरतक्रारदाराने माहिती दडपूर ठेवली असल्याची तक्रारदारास शंका आहे. तक्रारदार यांची शंका दूर व्हावी. संपूर्ण माहिती तक्रारदारास प्राप्त व्हावी. म्हणून मी असे आदेश देतो की, सन १९९५ ते २००७ या कालावधीत दक्षिण सोलापूर मध्ये जिप व ट्रॅक्टर वाटपाची सर्व फाईल, कागदपत्र तक्रादारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यांनतर गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे निवडक कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

सबब तक्रार निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२८२४/०२**

**श्री.म.फारुक नि.अहमद शेख**
**५९६, साखर पेठ, सोलापूर ४१३ ००५. .... तक्रारदार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.म.फारुख नि.अहमद शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे. माहितीच्या अधिकारातील अपीलाचा फेरविचार करण्याची विनंती केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये व्दितीय अपीलावरील आयोगाचे आदेश Review करण्याची तरतुद नाही. अपीलकाराने दि.१३.०२.२००८ रोजी आयोगाकडे दाखल केलेला अर्ज, तक्रार अर्ज Treat करुन सदर तक्रारीवर दि.१८.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार अनुपस्थित होते.

सोलापूर शहरातील सिध्देश्वर पेठ येथील सर्व्हे क्र.६१६७ या मिळकत पत्रिकेतील लिजरोल सत्ता प्रकार कमी करुन, बिनशेती सत्ता प्रकार दाखल करणे, जिल्हाधिकारी सोलापूर यांनी दिलेल्या आदेशावर, मंत्रालयीन विभागाने दिलेल्या स्थगिती संबंधी माहिती, सदर प्रकरणावर शासन स्तरावर काय कार्यवाही चालू आहे? सदर प्रकरणावरील शेरे, टिप्पणी इत्यादि माहिती तक्रारदाराने मागीतली होती. संबंधीत प्रकरण मा.मंत्री महोदयाकडे (शासनाकडे) सादर करण्यात आलेले असल्याने गैरतक्रारदाराने माहिती नाकारली. तक्रारदाराने मा.महसूल मंत्री कार्यालयातील प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील

दाखल केले होते. सदर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. मा.मंत्री, महसूल यांचेकडे सादर केलेली फाईल दि.२१.०१.२००८ रोजी विभागात प्राप्त झाली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी सांगीतले. तेव्हा तक्रारदारास दि.२४.०१.२००८ रोजी माहिती देण्याचे आयोगाने जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानुसार विहित शुल्क आकारुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली.

व्दितीय अपीलाच्यावेळी आयोगाने लेखी म्हणने स्विकारले नाही. म्हणने मांडण्याची संधी दिली नाही. म्हणने ऐकून घेतले असते तर निकाल वेगळा दिला असता. अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती विलंबाने दिल्यामुळे ती मोफत देणे आवश्यक होते. तरी माहितीपोटी घेतलेले शुल्क परत मिळावे. विलंबाबाबत जन माहिती अधिका-यांना दंडित करावे. मुंबईला येण्याजाण्याचा तिकीट खर्च, मानसिक प्रचंड त्रास झाला म्हणून रु.२०००/- नुकसान भरपाई अशी तक्रारदाराची मागणी आहे. तक्रारदाराने माहिती मागीतलेली होती त्यासंबंधीची फाईल शासनाकडे सादर करण्यात आली होती. शासनाकडून फाईल प्राप्त झाल्यानंतर त्वरित तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली आहे. यामुळे तक्रारदाराने दि.१३.०२.२००८ च्या तक्रार अर्जान्वये केलेली मागणी मान्य करता येत नाही. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रार निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २९.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५५३/०२**

**श्री.बबन दुर्गाजी अडेकर**
**हिन्दनगर राष्ट्रभाषा प्रचार समिती मागेवर्धा**
**ता.जि.वर्धा. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.बबन दुर्गाजी अंडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०५.२००८ रोजी अपील दाखल केली आहे. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

१) हंगामी क्षेत्र कार्यकर्ता हया पदाचे आरोग्य सेवक (पुरुष) या पदात मा.ना.से.नि (वेतन) १९८१ चे नियम ४४ अन्वये समायोजन करणे बद्दल माहिती.

२) आरोग्य सेवक (पुरुष) या पदाचे नियुक्ती बद्दल सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई हयांचे मार्गदर्शक तत्वे बद्दल माहिती.

३) महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मुंबई हयांचे पदे भर्ति बद्दल दि.१९.०३.२००३ चे अधिकसुचने नुसार इतर पदे ४० टक्के भर्ति बद्दल दर्शविलेल्या मार्गदर्शक तत्वाबद्दल माहिती.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती सह संचालक, आरोग्य सेवा (हि.ह.व.ज.रो) पुणे यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकाराचा अर्ज जन माहिती अधिका-यांनी सह संचालक, आ.से.पुणे यांचे कार्यालयाकडे उक्त अधिनियमातील कलम ६ (३) (दोन) अनुसार हस्तांतरित केला. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. शासन स्तरावर सादर केलेला अपीलकाराच्या अर्जातील मुध्दे सह संचालक, आरोग्य सेवा, पुणे कार्यालयाशी संबंधीत होते. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार अपीलकाराचा अर्ज सह संचालक, आ.से.पुणे कार्यालयातील जन माहिती अधिका-याकडे हस्तांतरित केला. सह संचालक, आ.से.पुणे कार्यालयातील जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. व्दितीय अपीलाच्या सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबबत अपील निकली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४९३/०२**

**श्री.शरद कुलकर्णी**
**४, आर्या टावर्स, एडीसीए स्टेडीयम जवळ,**
**एन-२ सिडको, औरंगाबाद. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शरद कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी अपील दाखल केली आहे. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.१३.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.०३.२००८ रोजी अर्ज करुन दि.२१.०१.२००८ च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१९.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१३ मे, २००९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

पत्रकारांनी अधिस्वीकृती पत्रिकेसाठी केलेल्या अर्जाची व त्यासमवेतच्या कागदपत्रांची प्रथमत: विभागीय अधिस्वीकृती समिती नंतर राज्य अधिस्वीकृती समिती पडताळणी करते. तद्‌नंतर अधिस्वीकृत पत्रिकांसाठी शिफारस केलेल्या व्यक्तींचे पोलीस पडताळणी अहवाल मागविण्यात येतात. हे अहवाल

अनुकूल असल्यास त्यानंतर अधिस्वीकृत पत्रिका देण्यात येते.  आतापर्यंत देण्यात आलेल्या अधिस्वीकृती पत्रिका उपरोक्त कार्यपध्दतीचा अवलंब करुन देण्यात आलेल्या आहेत.  शिवाय विद्यमान राज्य अधिस्वीकृती समितीने राज्यातील सर्व अधिस्वीकृती पत्रिकांची छाननी करण्यासाठी विभागवार उपसमित्या नेमल्या आहेत.  या उपसमित्यांचे कामकाज चालू आहे.  अर्जदाराने केलेल्या सूचना शासनाने अधिस्वीकृती नियमावली सुधारणा समिती गठीत केल्यावर विचारार्थ ठेवण्यात येतील.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२१.०१.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती.  अपीलातील कागदपत्राची पडताळणी केली असता अपीलकाराच्या दि.२१.०१.२००८ च्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास दि.२१.०१.२००८ च्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

सबबत अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३१६/०२**

**श्री.बापुसाहेब उत्तमराव पालवे**
**(यु.टी.नं.२३) औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,**
**औरंगाबाद. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**परिमंडळ-६, आर.सी.मार्ग,**
**चेंबूर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीय आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.बापुसाहेब उत्तमराव पालवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०५.२००८ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०८.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करून खालील माहिती मागीतली होती.

१) भावूबिजेचे अगोदर अंदाजे ७/८ दिवसांपूर्वी देवनार येथील शासकीय महिला सुधारगृहातून कु.पुजा साहेबराव म्हस्क हि मुलगी इतर २ मुली सोबत पळून गेली होती. त्याबाबत ट्रॉम्बे पोलीस स्टेशनला मिसिंगचा रिपोर्ट दाखल करण्यांत आला होता त्याची सत्य प्रत.

२) सदर तीन्ही मुली केव्हा व कोठे सापडल्या त्याबाबतची माहिती.

३) सदर तीन्ही मुली पळून गेल्यांनतर सापडेपर्यंत त्या कोठे कोठे राहिल्या होत्या याबाबतची माहिती.

४) सदर तीन्ही मुली सापंडल्यानंतर, त्यांच्या घेतलेल्या जबाबाच्या सत्यप्रती.

५) सदर तीन्मी मुली सापडल्यानंतर ट्रॉम्बे पोलीसांनी संबधीतांना अंतिम अहवाल पाठविला असल्यास त्यांची सत्यप्रत.

६) सदर तीन्ही मुली शासकीय (देवनाय येथील) सुधारगृहातून पळून गेल्याबद्दल त्यांचेवर काय कायदेशिर कार्यवाही करण्यांत आली? कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही अपीलकार यांच्याशी संबंधीत नसल्याचे दिसून आले. माहितीपोटी टपालखर्चासह शुल्क भरण्याबाबत अपीलकारास दि.०१.०२.२००८ रोजी पत्र पाठविले. अपीलकाराने मनिऑर्डरने रु.१५०/- शुल्कापोटी पाठविले. दरम्यान अपीलकाराने माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन दि.२२.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.३१.०५.२००८ अन्वये आदेश दिले. त्यांनतर जन माहिती अधिका-यांनी दि.२३.०६.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास, गुरुकुल सोसायटी प्लॉट ५८, बाईजाबाई सोसायटी जवळ, पाईपलाईन रोड, अहमदनगर या पत्यावर माहिती पाठविली. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली आहे असे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/१४१/०२**

**श्री.चंद्रकांत कोयंडे**
**१४, भगवती निवास, समर्थ नगर,**
**क्वारी रोड, भांडुप (प),**
**मुंबई ४०० ०७८.** **.... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
**देवगड, जि.सिंधुदुर्ग.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.चंद्रकांत बाळू कोयंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०८.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.३०.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

१) मौजे कालवी AIT/E/कालवी ५०९ ता.१/१०/१९९१ या केस मधील सर्व जाबजवाब व शेवटच्या आदेशाची सहीशुध्दनक्कल.

२) टेनन्सी केस नं.६०/५४ या केसमधील मुळ अर्ज, सर्व जाबजवाब व शेवटच्या आदेशाची, निकालाची सहीशुध्द नक्कल.

३) सर्व्हे नं.५४-१३ मौजे कालवी वडीलोपार्जित मिळकत चुकीची दुरुस्ती फेरफार दप्तरनोंद प्रत.

गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००८/७४/०२ दाखल केले होते. अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती द्यावी असे अपील

क्र.२००८/७४/०२ मध्ये आदेश देण्यात आले. त्यांनतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. अर्जातील मुध्दा क्र.३ बाबत गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी अपीलकारास माहिती दिली. उर्वरित मुद्याबाबत अपीलकाराचा अर्ज तहसिलदार देवगड यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांने हस्तांतरित केला. अर्जातील उर्वरित मुद्याबाबतची माहिती तहसीलदार, देवगड यांनी देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, देवगड यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उर्वरित मुद्याबाबतची माहिती तक्रारदारास द्यावी.

**आदेश**

सबब तक्रार अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२६८/०२**

**श्री.वालजीभाई विक्रमभाई गोहिल**
**४०४, ४ था मजला, अनमोल अपार्टमेन्ट,**
**दत्त मंदिर अपार्टमेन्ट समोर,**
**मालाड (पू), मुंबई.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, झोपडपट्‌टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.वालजीभाई गोहिल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.२९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदार यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वडारपाडा, रामजीवन सहकारी गृहनिर्माण संस्था, नवदुर्ग वेल्फेअर सोसायटी, जय अंबे सहकारी गृहनिर्माण संस्था, सहयाद्रीनगर सहकारी गृहनिर्माण संस्था धनाजीवाडी, मालाड (पू) बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.१२३३/०२ व्दितीय अपील दाखल केले होते. गैरतक्रारदारास १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. आदेशास अनुसरुन गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याची तक्रार आयोगाकडे दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदारास दि.०५.०१.२००८ रोजी माहिती दिली असल्याचे गैरतक्रारदारानी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. गैरतक्रारदारानी तक्रारदारास एम-२० बँान्डच्या प्रती दिल्या नसल्याचे सुनावणीचेवेळी तक्रारदाराने आयोगाच्या निदर्शनास आणले. या परिस्थितीत मी असे आदेश

देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यानंतर तक्रारदारास संस्थेच्या पदाधिका-यांनी सादर केलेल्या एम-२० बॉन्डच्या प्रती तक्रारदारास उपलब्ध करून द्याव्यात.

**आदेश**

सबब तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२७१/०२**

**श्री.किशोर का.घोंगरे**
**३८, तृप्ती सदर को.ऑप.हौ.सो.लि,**
**काजुपाडा, साकीनाका, मुंबई ४०० ०७२.** **.... तक्रारदार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एल वॉर्ड, लक्ष्मणराव यादव मार्केट,**
**१ ला मजला, कुला (प), मुंबई ४०० ०७०.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.किशोर घोगरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.२९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदार दि.०२.०२.२००८ रोजी अर्ज करून बृहन्मुंबई महानगरपालिका, कुर्ला (प) एल विभागातील प्रभाग क्र.१५० ते १५७ येथील इमारती व कारखाने खात्यांतर्गत दैनंदिन कामकाजामध्ये व कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी नोटीस रजीस्टर, कोर्ट रजिस्टर, डिबेक्शन रजीस्टर, डिमॉलीशन रजीस्टर, घर दुरुस्ती परवानगी दिलेल्या प्रकरणांची नोंदवही इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नव्हती. त्यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.१३८७/०२ व्दितीय अपील दाखल केले होते. या व्दितीय अपीलावर दि.०८.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे कार्यालयातील उपलब्ध माहिती १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी असे आदेश पारित करण्यात आले होते.

गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली नसल्याने गैरतक्रारदारास शास्ती करावी म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर सुनावणी आयोजित करण्यात आली.

गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर केला तक्रारदाराने दि.१४.०१.२००९ रोजी कार्यालयात हजर राहून संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण केले. त्यानंतर तक्रारदाराने निवड केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास दि.०३.०२.२००९ रोजी विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात आल्या. माहिती प्राप्त झाल्याची पोच तक्रारदाराकडून घेतली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन केलेले प्रतिपादन लक्षात घेता तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने दिसून येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२७०/०२**

**श्री.विलास रामदास भोगे**
**रुम नं.३०६, बिल्डींग नं.१०१,**
**न्यु म्हाडा कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,**
**मानखुर्द, मुंबई ४०० ०४३.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.विशाल भोगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.२९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदार दि.१३.१२.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी सॅबेस्टिन यांनी रोड क्र.१२ चेंबूर, मुंबई ४०० ०७१ येथील म्हाडाच्या जागेत दुरुस्ती किंवा बांधकामासाठी ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे काय याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपूरी दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.११८५/०२ व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास निरीक्षणाकरिता संबंधीत कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर तक्रारदाराने निवड केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास १५ दिवसात पुरविण्यात याव्यात असे आदेश पारित केले होते. मागणीप्रमाणे कागदपत्र मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर दि.२९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

तक्रारदाराने मागणी केलेली कागदपत्र मिळाली असून (अपील क्र.११८५/०२) याबाबत कुठलीही तक्रार नाही. तक्रार निकाली काढण्यात यावी असा लेखी अर्ज करुन सादर करुन तक्रारदाराने विनंती

केली आहे.  यावरुन तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली असल्याने सदर तक्रारीसंबंधी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४६/०२**

**श्री.किशोर भबुतमल शहा**
**प्लॉट नं.२०+२१/३, पार्वती नगर,**
**जळगांव ४२५ ००१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग (नवि-२३),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग (नवि-२३),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किशोर शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०२.२००७ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०८.२००६ रोजी करून पुढील प्रमाणे माहिती मागितली होती. जळगांव शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्येक वार्ड प्रमाणे, विभागाप्रमाणे पर्यावरणाच्या दिशेने खुली ठेवण्यात आलेल्या मोकळ्या जागा हया नगरपालिका, महानगरपालिका आस्तीत्वात आल्यावर कोणकोणत्या संस्थेस वाटप करण्यात आल्या. त्या संस्थेचे नाव दिनांक, ठराव क्रमांक. जागा कोणत्या कारणास्तव वाटप करण्यात आली. किती वर्षाचे करारावर. सद्या हया जागेत काय काय बांधकाम आहे का? रिकामी जागा ताब्यात घेण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय यांचे कोणते आदेश प्राप्त झाले आहेत का? त्या आदेशाची प्रत. सदर जागा हया जळगांव शहर

महानगरपालिका हद्दीतील आहेत. रिकाम्या जागेवर अनधीकृत बेकायदेशिर बांधकाम करता येते का? याबाबतची अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने उक्त नियमातील तरतुदीनुसार अर्जावर विहित केलेल्या रक्कमेचा कोर्ट फी स्टॅंप चिकटवीलेला नाही. विहित अन्य मार्गाने देखील शुल्क आदा केले नाही. यामुळे अपीलकाराचा अर्ज जन माहिती अधिका-यांनी महानगरपालिका आयुक्ताकडे पाठविला. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकारास आवश्यक ती माहिती हवी असल्यास विहित केलेले शुल्क भरुन तसा अर्ज प्राप्त झाल्यावर जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरवावी असे दि.१९.०१.२००७ रोजी आदेश पारित केली. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी योग्यती कार्यवाही केली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४९/०२**

**श्री.संजय नटवरलाल लोहार**
**२५/अ, पाटकरनगर, डायव्हर्शजवळ,**
**देवपूर, धुळे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समिती,**
**खोली क्र.३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्र निकेतन इमारत,**
**खेरवाडी, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समिती,**
**खोली क्र.३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्र निकेतन इमारत,**
**खेरवाडी, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संजय नटवरलाल लोहर व इतर दोन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००८ रोजी अपील व्दितीय दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०४.२००८ रोजी करुन खालील माहिती मागीतली होती.

१) मागील वर्षात म्हणजेच २००७ मध्ये गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालय, नगाव, ता.धूळे यांचे शैक्षणीक शुल्कात वाढ कोणत्या प्रस्तावाच्या/अहवालाच्या आधारावर करण्यात आली?

२) त्या प्रस्तावात/अहवालात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारींना पाचव्या वेतन श्रेणीनुसार पगार देत असल्याबाबत नमूद केले आहे का? त्यात डी.ए.किती टक्के मर्ज करुन किती टक्के देण्यात आला आहे? एच.आर.ए किती टक्के आहे?

३) गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालय, नगाव, ता.जि.धूळे यांनी शैक्षणिक शूल्क वाढीसाठी जे कागदोपत्री पूरावे दिले त्याची पडताळणी आपण केली का? केली असेल तर ती कोणत्या स्वरुपाची होती? त्यात अहवालाप्रमाणे सर्व आढळले का?

४) फक्त कागदोपत्री प्रस्तावर / अहवालावर शैक्षणिक शूल्क वाढवून देणे कितपत योग्य आहे?

गंगामाई अभियांत्रीकी महाविद्यालय, नगाव ता.जि.धुळे या महाविद्यालयाकरिता शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेले शिक्षण शुल्क निश्चितीच्या आदेशाची प्रत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.०५.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. आवश्यक असलेली परिपूर्ण माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता संबंधीत संस्थेकडे अर्ज करुन प्राप्त करुन घेण्यात यावा असेही जन माहिती अधिका-यांना अपीलकारास दि.३१.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर अपीलावर दि.१६.०६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

१२ ते १७ वर्षापासून अपीलकार नोकरीवर असून पाचव्या वेतनश्रेणीनुसार त्यांना वेतन व इतर फायदे त्यांना मिळत नाहीत. त्यासाठी त्यांना न्यायालयात दाद मागावयाची आहे. त्यासाठी सन २००७ मध्ये महाविद्यलयाकडून शैक्षणिक शुल्क वाढीसाठी प्रस्ताव/अहवाल सादर करण्यात आला त्याची प्रत अपीलकाराने मागीतली आहे. शैक्षणिक शुल्क वाढवून आल्यावर शासनाच्या नियमाप्रमाणे वेतन देण्यात येईल असे संस्थेच्या अध्यक्षांनी अपीलकारास तोंडी सांगीतले. शैक्षणिक शुल्क वाढवून देण्यात आले तरी संस्थेने पाचव्या आयोगाच्या शिफारशीनुसार अपीलकारांना वेतनश्रेणी लागू केली नाही असा अपीलकाराचा मुध्दा आहे. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीकरिता संस्थेकडे संपर्क साधन्याबाबत शिक्षण शुल्क समितीने अपीलकारास कळविले आहे हे योग्य नाही. अपीलकाराने मागणी केलेली माहिती

समितीने देणे आवश्यक आहे.  निश्चित अशी फी आकारणीचा संस्थेचा प्रस्ताव विचारात घ्यावा व निश्चित अशी फी आकारण्यात संस्थेस अनुमती द्यावी.  याबाबतची माहिती जाणून घेण्याचा अपीलकारांचा हक्क आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७५३/०२**

**श्री.हेमंत माणिकलाल छाजेड**
**९ महावीर सोसायटी,**
**मोहाडी रोड, जळगांव ४२५ ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुख्य सचिव यांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुख्य सचिव यांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.हेमंत छाजेड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०८.०४.२००८ रोजी अर्ज करून खालील माहिती मागीतली होती.

श्री.ज्वालाप्रसाद श्री.निगम व श्री.भामरे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना गुन्हेगारी मनोवृत्तीच्या श्री.विसपुते यांना सहकार्य करण्यासाठी खोटे अभिलेखे तयार करुन माझे भविष्य नष्ट करण्याच्या दृष्टिने धमकी देणारा पत्रव्यवहार करीत आहेत असे दिनांक ३१.१०.२००७ रोजी व दि.१७.११.२००७ रोजी मा.सचिव (वने) यांना तसे कळवून प्रतिलिपी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिली त्यांचेकडून गेल्या साडे सहा महिन्यात झालेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद W.P.No-७३२८/२००७ मध्ये सादर करण्यासाठी तात्काळ पुरविण्यात

यावी. सदर कामी तयार करण्यात आलेल्या सर्व कार्यालयीन टिपण्या व पत्रव्यवहाराच्या साक्षांकित प्रती तात्काळ पुरवाव्यात.

अपीलकाराच्या अर्जातील विषय अप्पर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्याने उक्त अधिनियमातील कलम ६(३) (दोन) येथील तरतुदीनुसार अपीलकाराचा अर्ज महसूल व वन विभागातील जन माहिती अधिका-याकडे हस्तांतरित करुन तसे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१९.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दिनांक ३०.०५.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचा विषय महसूल व वन विभागाशी संबंधीत असल्याने नियमानुसार त्यांचा अर्ज त्या विभागाकडे जन माहिती अधिका-यांनी हस्तांतरित केला आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले आहे. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी या प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४६०/०२**

**श्री.अर्जुन लक्ष्मण चव्हाण**
**ब.१३४/१, शासकीय कर्मचारी वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**२ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**२ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अर्जुन चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२३.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वाद्रें (पू) मुंबई येथील शासकीय वसाहतीचा पुर्नविकास करण्याचा मुद्येसुद माहितीसह प्रारुप आराखडयासह त्याबाबतची ब्लू प्रिटही "मुंबई मीरर" या दि.१३.१०.२००८ च्या इंग्रजी दैनिकात प्रकाशीत केली आहे. तरी सद्यस्थितीत तयार करण्यात आलेला आराखडा व त्याबाबत तयार करण्यात आलेली ब्लू प्रिंटची छायांकित प्रत मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२४.१२.२००८ रोजी सुनावणी घेतली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास द्यावी असे जन माहिती अधिका-यास आदेश दिले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

मधील कलम ८(झ) चा आधार घेउन जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्यास नकार दिला. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास शासकीय वसाहतीचा पुर्नविकास करण्यासंबंधीची अनुषंगीक माहिती पुरविण्यास नकार दिला आहे. अपीलकारास मागीतलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. तरीही जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ८(झ) चा आधार घेउन माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५७५/०२**

**श्री.रामसागर पुंडलिक पिल्लेवान**
**८३, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड नागपूर १५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**जन माहिती अधिकारी,**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.रामसागर पुंडलिक पिल्लेवान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Confenrcing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.११.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

मौजा पवनी जिल्हा भंडारा येथील न.भू.क्र.२३८२ क्षेत्र २८५.१ चौ.मि.प्रकरणी १) गैरअर्जदारानी अर्जदाराच्या मिळकतीची घरफोडी करुन सामानाची चोरी करुन बोगस दस्तावेज सादर करुन खोटे बयान व खोटया सहीचे अर्जदाराच्या विरोधात खोटी तक्रार देणे अर्जदाराला जिवे मारण्याची धमकी देणे इत्यादि केलेल्या गंभिर गुन्हयाप्रकरणी मा.पोलीस महासंचालक, पोलीस मुख्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे पुराव्यादाखल दस्तावेजासहित वेळोवेळी सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदारावर अदखलपात्र गुन्हा दाखल करुन पोलीसातर्फे फौजदारी कार्यवाही करण्याबाबत २) गैरअर्जदारांनी गंभिर

स्वरुपाचा गुन्हा करुन सुध्दा गैरअर्जदारावर कार्यवाही न करता उलट त्यांनाच संरक्षण दिल्याबद्दल दोषी पोलीस कर्मचारी व अधिकारी यांचेवर कार्यवाही करणेबाबत.

जन माहिती अधिका-यांनी दि.२६.११.२००८ च्या पत्रानुसार अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०८.१२.२००८ रोजी अपील दाखल केले. कार्यालयात जी माहिती आहे ती माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. ज्या प्रकारे व जशी माहिती अभिलेखात उपलब्ध असेल ती कागदपत्रे उक्त अधिनियमानुसार पुरवावयाची आहेत. कार्यालयात काही माहिती नाही. उलटपक्षी जी माहिती कार्यालयात आहे ती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे नमुद करुन दि.१५.०१.२००९ रोजी सविस्तर आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील परि.२ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचा अर्ज तक्रार अर्ज म्हणून पोलीस अधिक्षक, भंडारा यांचेकडे योग्यत्या कार्यवाहीकरिता पाठविला तसे अपीलकारास कळविले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या प्रकरणी मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७९३/०२**

**श्री. खोत अमर विलास**
**भागिरथी निवास,**
**महादेवनगर, ता.वाळवा,**
**जि.सांगली ४१५ ४०९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी,**
**(कर्मचारी वर्ग खाते)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.खोत अमर विलास यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Confenrcing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०८.०९.२००८ रोजी अर्ज करुन सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक, तांत्रिक भरतीबाबत पुढीलप्रमाणे माहिती मागीतली होती. १. मुलाखतीसाठी बोलविलेल्या उमेदवारांचे नाव, पत्ता, संपर्क नंबर, शिक्षण, जात, लेखीपरिक्षेत मिळालेले गुण/पैकी, मुलाखतीत मिळालेले गुण/पैकी, उमेदवाराचे अंतीम निवडीचे कारण इत्यादी. २. सर्वश्री निखिल भिमराव पाटील, अमर विलास खोत, श्रीकृष्ण दशरथ सारोळे या उमेदवारांना मुलाखतीत विचारलेले प्रश्न व त्यांनी

दिलेले उत्तर याचा तपशील घ्यावा. ३. सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ) व तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ) या पदासाठी प्रतिक्षा यादी कॅटेगरीवाईज देण्यात यावी तसेच सदरची प्रतिक्षा यादी कोण्त्या तारखे पर्यंत ग्राहय राहील. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास खाली नमुद केल्यानुसार दि.१९.०९.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील खंड -२ (च) नुसार जी माहिती मागता येते त्याची व्याख्या दिलेली आहे. त्यानुसार माहितीची मागणी करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे, इतर व्यक्तींची माहिती त्रयस्थ व्यक्तीस देण्यावर कायद्याच्या कलम ८ (ञ) नुसार बंधन आहे.

तथापि, आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०३.११.२००७ रोजीच्या सहा.कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ)/तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ) या पदासाठीच्या जाहिरातीनुसार लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दिनाक ०१.०५.२००८ रोजीच्या लोकमत या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर पदाच्या भरतीसाठी परिक्षेत गुणवत्तेवर उत्तीर्ण झालेल्या व गुणवत्तेनुसार १:३ या प्रमाणात मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ०५.०८.२००८ ते ०८.०८.२००८ या कालावधीत घेण्यात आलेल्या असुन लेखी परिक्षेत व मुलाखतीत गुणवत्तेवर निवड झालेल्या उमेदवारांची यादी. (http\www.msrtc.maharashtra.gov.in) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.०४.११.२००८ रोजी आदेश पारित केले व प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१९.०९.२००८ च्या

पत्रानुसार अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदरची माहिती महामंडळाच्या संकेत स्थळावर आजही असल्याची लेखी अहवाल आयोगास सादर केला. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यता वाटत नाही.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८००/०२**

**श्री. दत्तात्रेय मणेप्पा मुणगे**
**उप विभागीय अभियंता,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,**
**विकास उप विभाग क्र.४,**
**(पुणे लष्कर पाणी पुरवठा केंद्राच्या आवारात),**
**पुणे ४११ ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य प्राशासकीय अधिकारी,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला,**
**नरिमन पॉंईट, मुंबई ४०० ०२१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (आ-५)**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन (दक्षिण कक्ष),**
**बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दत्तात्रेय मणेप्पा मुणगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Confenrcing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.०९.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सांगली मंडळातील विविध पाणी पुरवठा योजनेतील कामात आणि टायर खरेदी, विद्युत टयुब खरेदी संदर्भात झालेल्या गैरव्यवहाराबाबत अनुषंगीक खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली अंतर्गत अंकली पाणी पुरवठा योजना, टायर खरेदी नांगोळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना वेळबी पाणी पुरवठा योजना आणि मिरज शहर, म्हसवड, मुदाळ,

गंगापूर, तासगांव करलहटी नेर्ली व नेवरी तसेच घोडेवाडी, नरसेवाडी, मणेराजुरी, बनेवाडी नळ पाणी पुरवठा योजनांत झालेले भ्रष्टाचार प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील श्री.मेश्राम, श्री.एन.सत्यनारायण, श्री.देशमाने, श्री.कार्ले, श्री.वेदांत, श्री.गवळी इत्यादी ११ अधिका-याविरूध्द करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने मुख्यतत्वे खालील कागदपत्रांची मागणी केली आहे.

अ) विभागीय चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांचे आदेशाच्या प्रती.

ब) उपरोक्त ११ अधिका-याविरूध्द बजावण्यात आलेल्या ज्ञापनाच्या प्रती.

क) पुराव्या संबंधी ज्ञापनासोबत जोडण्यात आलेल्या दस्तऐवजाच्या प्रती.

वरी नमुद केलेली माहिती मिळावी म्हणून अर्ज करून ३७ दिवस झाले तरी माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.११.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास क्र.माअ६/२००६/मका/आ-१, दि.१६.१०.२००८ च्या पत्रानुसार रजिस्टर पोस्टाने एकूण १७४ पृष्ठ माहिती विहित कालावधीत पुरविण्यात आली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४८/०२**

**श्री. बाजीराव जागो पाटील**
**५, प्रमोदनगर, सेक्टर-२, देवपूर,**
**धुळे (शाहू नगर जवळचे) देवपूर, धुळे. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-९, बांद्रा (प), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, क्वॉटर रोड, बांद्रा (प), मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.बाजीराव पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Confenrcing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.०३.२००८ रोजी अर्ज करून, वाहन क्र.एम.एच.१२ अे डब्ल्यू हिरोहोंडा हे वाहन चोरी झालेबद्दल एफ.आय.आर. क्र.२७५ दि.२६.१०.२००७ अन्वये जुहू पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविली. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या प्रतीची मागणी व अनुषंगीक माहितीची मागणी केली होती. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे. अर्जदार हे सदर गुन्हयातील फिर्यादी नसून त्रयस्त व्यक्ती असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(ज) प्रमाणे माहिती नाकारण्यात आली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२१.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन केले. तसेच सदर प्रकरणी गुन्हा तपासाधीन असून अपीलकार यांना माहिती दिल्यास गुन्हेगारांचे अन्वेषण

करण्यास व त्यांना अटकाव करण्यास अडथळा निर्माण होणार असल्याने उक्त अधिनियमातील कलम ८ (ज) अनुसार अपीलकाराचे अपील फेटाळण्यात आले असे दि.१७.०६.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे ब्दितीय अपील दाखल केले.

एम.एच.१२ अे.डब्ल्यू ५४२० हीरोहोंडा ही मोटार सायकल चोरीबाबत तात्काळ ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घेउन नियंत्रण कक्षास माहिती दिली. तसेच सदर गुन्हयात चोरी गेलेल्या गाडीबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या सहाय्याने शोध घेतला. आर.टी.ओ. त्यांना पत्राव्दारे कळविले. बिनतारी संदेश सर्व राज्यात बिनतारीवर माहिती देण्यात आली. सदर मोटार सायकलचा अद्याप शोध लागला नाही. सदर गुन्हयातील मो.सायकलचा व पाहिजे असलेल्या आरोपी मिळून न आल्याने सदर गुन्हयाचा तपास बंद करुन शोध न लागलेला अ वर्गीकरण मंजूरीकरिता मा.महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई येथे दि.०४.०७.२००८ रोजी सदर गुन्हयाचे मुळ कागदपत्र सादर केली. अपीलकारांचा सदर गुन्हयाचा काहीही संबंध नाही. अपीलकार त्रयस्थ व्यक्ती असल्याने तसेच गुन्हयात तपास त्यावेळी चालू असल्याने तपासावर परिणाम होउ नये, आरोपीस अटक करण्यात अडथळा येवू नये म्हणून उक्त अधिनियमातील कलम ८(ज) प्रमाणे अपीलकारास माहिती नाकारण्यात आली असल्याने जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन चोरी गेलेल्या वाहनाचा तपास घेण्याचे काम केली आहेत. सदर वस्तुस्थिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९११/०२**

**श्री. किशोर सरपोतदार**
**शिवाजी आखाडयाजवळ, वणी,**
**जि.यवतमाळ ४४५ ३०४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (माशि-६)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (माशि-६)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

<u>विवेचन</u>

अपीलकार श्री.किशोर सरपोतदार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Confenrcing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सौ.पद्‌मा सरपोतदार, मुख्याद्यापीका, विवेकानंद विद्यालय, वणी यांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१२.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०९.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१३.०२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली व अपीलाबाबत अपीलकारास उत्तर दिले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सौ.पद्मा सरपोतदार यांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रचलीत नियमानुसार तपासणी करुन कार्यवाही करावी आणि त्याप्रमाणे अपीलकारास उत्तर देणेबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांना दि.२१.०९.२००७ रोजी कळविण्यात आले. अपीलकाराच्या सेवानिवृत्ती वेतनासंबंधी कार्यवाही विभागीय शिक्षण उप संचालकाच्या स्तरावर आपेक्षीत आहे. अपीलकारास उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी/ जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सौ.पद्मा सरपोतदार हया सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांना सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्याची अपीलकाराची मागणी आहे. सौ.पद्मा सरपोतदार यांच्या सेवानिवृत्ती वेतन मंजूरीचा प्रस्ताव शासनाकडे तात्काळ पाठवावा असे शिक्षण उप संचालक, अमरावती यांना प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी निर्देश दिले आहेत. सदर निर्देश देउन १ वर्षाहून अधिककाळ उलटून गेला आहे. तरी सौ.पद्मा सरपोतदार यांना सेवानिवृत्तीवेतन मंजूर झालेले नाही असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सौ.पद्मा सरपोतदार यांना सेवानिवृत्तीवेतन मंजूर करण्याची कार्यवाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत करावी. केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकार तसेच आयोगास अवगत करावे.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३८७/०२**

**श्री.शरद कुलकर्णी**
**४, आर्या टॉवर्स, एडीसीए, स्टेडीयम जवळ,**
**एन-२, सिडको, औरंगाबाद.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने यांचे कार्यालय,**
**जुने जकात गृह, फोर्ट,**
**मुंबई ४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी,**
**अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने यांचे कार्यालय,**
**जुने जकात गृह, फोर्ट,**
**मुंबई ४०० ०२३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शरद कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.११.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.०३.२००८ रोजी अर्ज करुन, दि.१७.०१.२००८ रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती.

१) चौकशी प्रसंगी झालेला पत्रव्यवहार प्राप्त अहवाल कार्यवाही, दखल सुचना दर्शक अभिप्राय.

२) चौकशी प्रसंगी झालेला पत्रव्यवहार, प्राप्त अहवाल त्याची घेतलेली दखल.

३) प्रलंबीत असल्यास त्याची सबळ व सक्षम कारणे अभिप्रायासह.

जन माहिती अधिका-यांनी वरील मुद्याबाबत विहित कालावधीत अपीलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१९.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन दि.१७.०१.२००८ रोजी सादर केलेल्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने दि.३०.०४.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास खालील प्रमाणे माहिती दिली होती.

"शासन मान्य यादीत वृतपत्राचा समावेश करणे, निकष पूर्ण न करणा-या वृत्तपत्राचे नाव यादीवरुन कमी करणे, संबंधीत जिल्हा माहिती अधिका-यांनी दर दोन वर्षानी शासन मान्य यादीतील वृत्तपत्रांची सर्व निकषाच्या संबंधात फेर पडताळणी केल्यानंतर प्राप्त अहवालानुसार शासन मान्य यादीचे नुतनीकरण करण्याचा निर्णय घेण्यासाठी तसेच दरवाढ / श्रेणीवाढीच्या अर्जावर विचार करण्यासाठी शासनाने समिती नियुक्त केली आहे.

वृत्तपत्राच्या प्रकाशनातील अधिनियमितपणा, दर्जा किंवा इतर आवश्यक निकषांची पूर्तता न करणा-या जाहिरात प्रसिध्दिमध्ये शासनाची दिशाभूल करणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य यादीवरुन कायमचे किंवा काही कालावधीसाठी वगळण्याचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांना आहेत. तथापि अशी कार्यवाही करण्यापूर्वी महासंचालक संबंधीत वृत्तपत्राच्या व्यवस्थापकाला आपली बाजू मांडण्याची संधी देतात.

वृत्तपत्राच्या व नियतकालीकांच्या जाहिरात विषयक धोरणात तसेच जाहिरातीच्या दरात सुधारणा करण्यासाठी श्री.अनिल देशमुख समितीच्या अहवालानुसार निकषपूर्ण करणा-या वृत्तपत्राचा शासन मान्य यादीवर येण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या जाहिरात स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय घेतला जातो."

जन माहिती अधिका-यांनी दि.३०.०४.२००८ च्या पत्रान्वये वर नमुद केलेली माहिती अपीलकारास दिली आहे. परंतू यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास दि.१७.०१.२००८ च्या तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपलब्ध करून द्यावी.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५९३/०२**

**श्री.देवराव बारसुजी नांदकर**
**बी-३, कांचनकिर्ती, धरमपेठ, नागपूर १०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विधी व न्याय विभाग (अ-शाखा)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**विधी व न्याय विभाग (अ-शाखा)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.देवराव नांदकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.११.२००० ला दिलेल्या याचिकेमधील निर्देशानुसार कर्मचा-यांना / अधिका-यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५.०६.१९९५ च्या शासन निर्णयाप्रमाणे दि.२८.११.२००० पर्यंत संरक्षण देता येईल काय? याबाबतचा सखोल अभ्यास करुन प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांना सादर करावे असो मा.मुख्यमंत्री महोदयांनी शिष्टमंडळा समक्ष सचिव विधी व न्याय विभागाला आदेश दिले होते. त्याचे पालन झाले किंवा नाही. दि.१५.०६.१९९५ मध्ये नमुद केलेले संरक्षण ज्या शासन निर्णय / परिपत्रकाव्दारे नोव्हेंबर, २००० पर्यंत वाढविण्यात आले त्या शासन निर्णय / परिपत्रकाची प्रत अपीलकाराने मागीतली होती.

जन माहिती अधिकारी-यांनी विधी व न्याय विभागाचे दि.१९.१२.२००५ च्य अभिमतची प्रत अपीलकारास पाठविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अर्जातील मुध्दा क्र.२ हा सामान्य प्रशासन विभाग व आदिवासी विकास विभाग यांचेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संबंधीत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत अपीलकर्ता यांनी त्या विभागाकडे पत्रव्यवहार करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे दि.२०.०२.२००८ रोजी आदेश पारित केले. शासन निर्णय / परिपत्रकाची प्रत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

दिनांक १५.०६.१९९५ च्या शासन निर्णयान्वये कर्मचारी / अधिका-यांना संरक्षण देण्यात आले होते. सदर संरक्षण नोव्हेंबर, २००० पर्यंत वाढविण्यात आले त्या शासन निर्णय / परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन देणेबाबत अपीलकाराने मागणी केली होती. सदर बाब सामान्य प्रशासन विभाग/आदिवासी विभागाशी संबंधीत असल्याने त्या विभागाकडे पत्रव्यवहार करावा असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. दि.१५.०६.१९९५ च्या शासन निर्णयाव्दारे दिलेले संरक्षण पुढे वाढविण्यात आलेले नाही. सदर प्रकरणी नोव्हेंबर, २००० मध्ये सामान्य प्रशासन विभागाने कोणताही शासन निर्णय काढलेला नाही असा सन २००२ मधील सामान्य प्रशासन विभागाने दि.२०.०३.२००२ च्या शासन निर्णयान्वये खुलासा केला आहे. सदर शासन निर्णयाची प्रत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी द्यावी.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६४८/०२**

**श्री.शेख निसार अहमद शेर मोहम्मद तांबोळी**
**३५ अनम पॅलेस चाळीसगाव रोड,**
**धुळे.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग,**
**जे.जे.स्कूल ऑफ आर्टसच्या मागे,**
**सी.एस.टी.जवळ, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग,**
**जे.जे.स्कूल ऑफ आर्टसच्या मागे,**
**सी.एस.टी.जवळ, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शेख निसार अहमद शेरमोहम्मद तांबोळी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०१.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferencing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

Minority Welfare organization, Dhule यांनी दि.१३.०३.२००७ रोजी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगास पाठविलेल्या निवेदनावर आयोगाने केलेल्या कारवाई संबधीच्या दस्तऐवजाची माहिती अपिलार्थी यांनी दि.२९.०३.२००७ च्या अर्जान्वये माहिती मागीतली होती. माहितीपोटी एकूण रु.४०/- इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना दि.२३.०४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर दि.०३.०५.२००७ रोजी अपिलार्थी यांना माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.१४.०५.२००७ रोजी प्रथम अपील

दाखल केले. सदर अपीलावर दि.११.०६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगास दि.१३.०३.२००७ रोजी सादर केलेल्या निवेदनावर आयोगाने केलेल्या कारवाईची माहिती अपिलार्थी यांना त्वरित द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचना देउन दि.११.०६.२००७ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. त्यांनतरही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी राज्य अल्पसंख्यांक आयोगाकडे दि.१३.०३.२००७ रोजी सादर केलेल्या निवेदनावर राज्य अल्पसंख्यांक आयोगाने केलेल्या कारवाईची माहिती मागीतली आहे. अपीलकाराने केलेल्या तक्रारीचा विषय हा शालेया शिक्षण विभागाशी निगडीत आहे. त्यामुळे सदर तक्रार अल्पसंख्याक आयोगाने शालेय शिक्षण विभागाकडे पाठविली. आयोगाकडून याबाबत वारंवार पत्रव्यवहार ही केला आहे. पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलकारास देण्यात आल्या आहेत. अपीलकाराच्या अर्जावर शालेय शिक्षण विभागाकडून उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे. आयोगाकडून सदर प्रकरणी शिफारस करण्यात आली आहे. अपीलकाराने शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे केलेल्या अर्जाची दि.१३.०३.२००७ रोजी प्रत आयोगास अग्रेषित केली आहे. आयोगाच्या कार्यपध्दतीनुसार आयोगाचे नावे नसलेले, परंतू आयोगास प्रत म्हणून पाठविलेले निवेदन / तक्रारीवर आयोगाकडून कार्यवाही केली जात नाही असे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जावर आयोगाने आवश्यकती कार्यवाही केली आहे. अपीलकाराच्या तक्रारीसंबधी अधिक माहिती करिता अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे संपर्क साधावा.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२७३/०२**

**श्री.भालचंद्र चांदोरकर**
**१/२२, नाताळवाला टेरेस,**
**गोखले रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.भालचंद्र चांदोरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन हाफकीन महामंडळातील कर्मचा-याच्या अर्धपगारी रजेबाबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती दिली नाही. माहिती नाकारली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे तक्रारदाराने आयोगाकडे क्र.१४५०/०२ अपील दाखल केले होते. हाफकीन महामंडळातील कर्मचा-यांच्या मागण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसाचे आत तक्रारदारास द्यावी असे आयोगाने दि.३१.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती दिली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२७३ तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

गैरतक्रादाराने आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर क्र.ममाअ-२००९/प्र.क्र.३८/०९/औषधे-१, दि.३०.०१.२००९ च्या पत्रान्वये आवश्यकती माहिती तक्रारदारास दिली असल्याचा लेखी अहवाल सुनावणीचेवेळी आयोगास सादर केला. यावरुन गैरतक्रारदारानी तक्रारदारास माहिती पुरविली आहे. या

परिस्थितीत सदर तक्रारीसंबंधी मी असे आदेश देतो की, मा.न्यायालयातील अपील क्र.६६५/१९८९ तसेच एमआयएससी पीटोशन क्र.६५६/१९७६ च्या छायाप्रती तक्रारदारास गैरतक्रारदारांनी सत्वर उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

सबब तक्रार मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२७२/०२**

**श्री.भालचंद्र चांदोरकर**
**१/२२, नाताळवाला टेरेस,**
**गोखले रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.** **.... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.भालचंद्र चांदोरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ लि. व हाफकीन संस्था प्रशिक्षण, संशोधन व तपासणी या संस्था / महामंडळातील कर्मचा-यांना दि.०१.०९.१९७५ पासून सर्व आर्थिक फायदे लागू करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००८/१४५१/०२ हे अपील दाखल केले होते. सदर अपीलावर सुनावणी आयोजित करुन दि.३१.१२.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत. सदर आदेशानुसार हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ लि. तसेच हाफकीन संस्था प्रशिक्षण, संशोधन व तपासणी या दोन्ही संस्था / महामंडळातील कर्मचा-यांच्या मागण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसाचे आत तक्रारदारास उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश पारित केले होते. परंतू माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली.

हाफकीन संस्था / महामंडळातील कर्मचा-याच्या मागण्याबाबत तक्रारदाराने अर्ज करुन एकूण ८ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने क्र.ममाअ-२००९/प्र.क्र.३८/०९/औषधे-१, दि.२९.०६.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन दिली. याबाबत गैरतक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३८/०२**

**श्रीमती.कलावती ऐलानी**
**पुष्पा चतर सेंगटानी, १२ बुटेले आउट,**
**राजनगर, छावणी, नागपूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २ रा मजला,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्केट,**
**फलटन रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २ रा मजला,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्केट,**
**फलटन रोड, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती.कलावती ऐलानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१९.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२३.०६.२००८ रोजी अर्ज करुन अपीलकाराने भाडेपट्टयाच्या मंजूरीबाबत (lease deed) तसेच कार्यालयातील अभिलेख्यातील नावात दुरुस्ती करण्यासाठी दि.१३.०६.२००७, दि.१२.०२.२००८ व दि.२८.०५.२००८ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्लॉट क्र.४४ योजना क्र.५७, शिवडी, वडाळा (दक्षिण) या मालमत्तेसंबंधीची फाईल फार जुनी असल्याने सापडत नाही. त्यामुळे अपीलकाराने मागणी केलेली माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.०७.२००८ रोजी कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.११.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्र फार जुनी असल्याने सापडत

नाहीत. यामुळे माहिती देता येत नाही. भाडेपटेदाराने (lessee) दि.३०.०६.२००८ पर्यंत भाडयाचा भरणा केला असल्याचे अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कार्यालयातील अभिलेखावरील नावात दुरुस्ती करणे व लीज डीड मंजूरी बाबत अर्ज करुन विनंती केली होती. यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराने मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची धारीका फार जुनी असल्याने संबंधीत कागदपत्र / फाईल सापडत नाहीत. त्यामुळे अपीलकारास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल सापडत नसल्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम जाणीवपूर्णक निर्णय घ्यावा. त्यानंतर तसे अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४०/०२**

**श्री.पँथर प्रकाश बनसोड**
**सिव्हील-हयुमन राईटस् प्रोटेक्शन असो.**
**१८०, उंटरखाना, मेडीकल कॉलेज रोड,**
**नागपूर १.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय,**
**१३ वा मजला, नविन प्रशासन भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय,**
**१३ वा मजला, नविन प्रशासन भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.पँथर बनसोड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०३.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१९.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.३०.११.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

१) दि.१५.०९.२००६ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांनी सादर केलेला पत्रव्यवहार, खुलासा या सर्व दस्तऐवजाची साक्षांकित प्रत.

२) दि.२०.०७.२००६ च्या पत्रावर घेतलेला निर्णय, केलेली कार्यवाही, तसेच पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी सादर केलेला खुलासा याविषयी साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन

अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते. पंरतू अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थित मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी व आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६११/०२**

**श्री.अनिल उर्फ शनि भिकूजी इलमे**
**संघटक-शोषीत कर्जदार सभासद संघटना,**
**पृथ्वीराज नगर, परसोडी रोड, ता.धामणगांव रेल्वे,**
**जि.अमरावती ४४४ ७०९.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अनिल उर्फ शनि भिकुजी इलमे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजुचे म्हणने ऐकून घेण्यात आले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२०.०६.२००७ रोजी अर्ज करुन अमरावती विभागातील राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक केव्हा करण्यात येईल. तसेच उर्वरित विभागाकरिता राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक केव्हा करण्यात येईल. मुख्य सचिवांना दिलेल्या दि.११.०६.२००७ च्या नोटीस नुसार काय कारवाई केली याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.१०.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास

माहिती दिली. संगणमताने चुकीची माहिती व निर्णय दिल्याच्या कारणावरुन व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे ब्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन अमरावती महसूल विभागाकरिता राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक केव्हा करण्यात येईल याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विलंबाने अपीलकारास दि.११.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे. शासनाकडून मा.राज्यपालांच्या मान्यतेने राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक करण्यात येते. त्यानुसार अमरावती महसूल विभागाकरिता श्री.भास्कर त्रिंबक पाटील यांची दि.२४.१२.२००८ पासून राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ अमरावती म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६११/०२**

**श्री.अनिल उर्फ शनि भिकूजी इलमे**
**संघटक-शोषीत कर्जदार सभासद संघटना,**
**पृथ्वीराज नगर, परसोडी रोड, ता.धामणगांव रेल्वे,**
**जि.अमरावती ४४४ ७०९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अनिल उर्फ शनि भिकुजी इलमे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Confercing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजुचे म्हणने ऐकून घेण्यात आले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२०.०६.२००७ रोजी अर्ज करुन अमरावती विभागातील राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक केव्हा करण्यात येईल. तसेच उर्वरित विभागाकरिता राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक केव्हा करण्यात येईल. मुख्य सचिवांना दिलेल्या दि.११.०६.२००७ च्या नोटीस नुसार काय कारवाई केली याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.१०.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास

माहिती दिली.  संगणमताने चुकीची माहिती व निर्णय दिल्याच्या कारणावरुन व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन अमरावती महसूल विभागाकरिता राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक केव्हा करण्यात येईल याबाबत माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विलंबाने अपीलकारास दि.११.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे.  शासनाकडून मा.राज्यपालांच्या मान्यतेने राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक करण्यात येते.  त्यानुसार अमरावती महसूल विभागाकरिता श्री.भास्कर त्रिंबक पाटील यांची दि.२४.१२.२००८ पासून राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ अमरावती म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६१४/०२**

**श्री.पितांबर तोताराम चौधरी**
**रा.शिवनेरी चौक, विष्णुवाडी,**
**बुलढाणा ४४३ ००१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,**
**अन्टी करप्शन ब्युरो, मधु इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**१ ला मजला, पांडूरंग बुधकर मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक,**
**अन्टी करप्शन ब्युरो, मधु इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**१ ला मजला, पांडूरंग बुधकर मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई ४०० ०१३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.पितांबर चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२०.०८.२००८ रोजी अर्ज करुन अपीलकाराने दि.२५.०३.२००८, दि.१३.०५.२००८ आणि दि.०१.०७.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत दि.०४.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलात अपीलकारास नेमके काय अभिप्रेत आहे हे समजून येत नसल्याने म्हणने मांडण्याकरिता कार्यालयात बोलविले. पंरतू अपीलकार कार्यालयात आले नाहीत त्यामुळे प्रथम अपीलावर

कार्यवाही करता आली नाही. दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन त्यांनी दिलेल्या ३ अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अर्जदारांना दिशाभूल माहिती देण्यात आली हया म्हणण्यात तथ्य नाही. अपीलकार हे ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा येथील एका प्रकरणात आरोपी आहेत. त्यांच्याविरुध्द दि.०७.०१.२००९ रोजी दोषारोपत्र विशेष खटला क्र.२/२००९ अन्वये दाखल करण्यात आला आहे. अपीलकार यांनी त्यांना नक्की काय माहिती अपेक्षित आहे याबाबत खुलासा केल्यास त्यांना आवश्यक माहिती पुरविणे सुलभ होईल असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास दि.२६.०५.२००९ रोजी लेखी अहवाल सादर करुन खुलासा केला आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले. असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६०२/०२**

**श्री. किशोर सरपोतदार**
**शिवाजी आखाडयाजवळ, वणी,**
**जि.यवतमाळ ४४५ ३०४. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**उर्जाग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उर्जाग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किशोर सरपोतदार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०७.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Confenrcing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२१.१२.२००६ रोजी अर्ज करून, १) अपीलकारास १९८३ पासून वेतन व्याजासह देणे तसेच योग्य त्या पदोन्नत्या व सेवानिवृत्ती लाभ देणे २) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९७८ अमलात आल्यापासून शासनाने खनिकर्म अधिकारी या पदाबध्दल वेळोवेळी दिलेल्या निर्देशाच्या प्रती मिळण्याची दि.१९.०९.२००५ च्या अर्जान्वये विनंती केली होती. सदर विनंती अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलकार यांच्या सेवा मे, १९८३ ते १९९१ या कालावधीचा सेवाकाळ कसा नियमित करण्यात आला आहे. सदर कालावधीत त्यांना कोणते लाभ अनुज्ञेय होते. ते त्यांना अदा केले किंवा कसे याविषयीची माहिती अपीलकारास संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय नागपूर यांनी १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०२.०४.२००७ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश देउनही माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती १५ दिवसाचे आत अपीलकारास द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना दि.०२.०४.२००७ रोजी आदेश दिले होते. परंतू आवश्यकती माहिती संचालकांनी अपीलकारास पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६१२/०२**

**श्री.अनिल उर्फ शनि भिकूजी इलमे**
**संघटक-शोषीत कर्जदार सभासद संघटना,**
**पृथ्वीराज नगर, परसोडी रोड, ता.धामणगांव रेल्वे,**
**जि.अमरावती ४४४ ७०९.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अनिल उर्फ शनि भिकुजी इलमे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Confercing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेतले व अपीलातील कागदपत्राची पडताळणी केली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१६.०७.२००७ रोजी अर्ज करुन प्राथमिक सहकारी संस्थांच्या सभासदाकडून प्राप्त परत फेडीतून ८०% पेक्षा जास्त रक्कम व्याजात दि.म.स्टे.को.ऑप.फा.का.लि.मुंबई या शिखर संस्थेला महाराष्ट्र शासनाने कोणत्या अधिसूचनेनुसार परवानगी दिलेली आहे. याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालील प्रमाणे माहिती दिली.

सहकारी कायद्यानुसार नोंदणी झालेली व फायनान्स कार्पोरेशनच्या सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण / गृहता संस्थांना त्यांच्या सभासदांच्या कर्ज अटी व नियम तसेच उपविधीतील तरतुदींनुसार कर्ज वाटप होत असल्याने तसेच संस्था व सभासदाने कार्पोरेशनच्या प्रती करुन दिलेल्या महाणखत / पडगहाणखत यांतील तरतुदींनुसार कर्ज वसुली होत असल्यामुळे नॅशनल हौसिंग बँक ही रिझर्व्ह बँकेच्या पूर्ण मालकीची असून या बँकेने कार्पोरेशनला पुर्नवित्तसहायय वेताना महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रकारची हमी दिलेली नाही. वरील माहिति आपणांस दि.महाराष्ट्र स्टेट.को.ऑप.हौ.फायनान्स कार्पो.लि.मुंबई यांनी त्यांचे दि.०६.०७.२००७ च्या पत्रान्वये यापूर्वीच कळविलेली आहे.

जन माहिती अधिका-याने खोटी दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०५.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले की अपील अर्जातील मुद्याबाबतची माहिती दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑप.हौसिंग फायनान्स कार्पोरेशन लि.मुंबई यांनी देणे आवश्यता होते. म्हणून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०७.२००७ च्या पत्रान्वये तसे कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने वरील २ मध्ये नमूद केलेल्या मुद्याबाबत जन माहिती अधिका-याकडे माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२७.०८.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०९.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपीलकाराच्या वडिलांनी दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑप.हौसिंग फायनान्स कार्पोरेशन लि.मुंबई कडून घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजाची वसूली यामुळे त्यांना मानसीक त्रास झाला असा अपीलकारांचा महत्वाचा मुध्दा आहे. या कर्जाची वसूल योग्य टक्केवारीने झाली किंव कसे याबाबतची माहिती दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑप.हौसिंग फायनान्स कार्पोरेशन लि.मुंबई देउ शकेल म्हणून अपीलकाराचे दि.१६.०७.२००७, दि.२०.०४.२००७ व दि.०५.०९.२००७ चे अर्ज महामंडळाकडे पाठविण्यात आले होते. महामंडळाने अपीलकारास वेळोवेळी माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन

प्रतिपादन केले.  यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्यान त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४२/०२**

**श्रीमती.मंदा विलासराव लोहोटे**
**श्री.विलास वामनराव लोहोटे**
**बी-३/११२, बजरंग कॉम्प्लेक्स,**
**सिरस पेठ, नागपूर ४४० ००९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह परिवहन आयुक्त,**
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ४ था मजला, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा परिवहन आयुक्त (प्रशासन),**
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ४ था मजला, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती मंदा विलास लोहोटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय यवतमाळ तर्फे अपीलकाराविरुध्द सखोल चौकशी करण्यात आली होती. यासंदर्भात जन माहिती अधिका-यांनी १) लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय यवतमाळ यांना पाठविलेल्या पत्रात प्रत २) सन १९९० ते १९९५ या कालावधीत लाचलुचपत प्रतीबंध कार्यालय, यवतमाळ, अमरावती, नागपूर व मुंबई या कार्यालयाने जन माहिती अधिकारी कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या संपूर्ण प्रती ३) लाचलुचपत प्रतिबंध कायद्यातंर्गत अपीलकाराविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्याकरिता परिवहन आयुक्तांच्या परवानगीसाठी पाठविलेल्या पत्राची प्रत ४) न्यायालयात खटला

दाखल करण्याकरिता मंजूरी देतांना श्री.सुभाष पानसे, पोलीस निरीक्षक यांनी पाठविलेला अहवाल विचारात घेतला होता अथवा नाही ५) परिवहन आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या छायाप्रती इत्यादी अनुषंगीक माहिती अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मागीतली होती.

अपीलकाराने मागीतलेल्या माहितीसंबंधीची नस्ती क्र.विभाचौ-४५९९/का.८/(१)/जा.क्र.३१०, दि.१६.११.१९९९ अन्वये शासनाकडे म्हणजे अवर सचिव, गृह विभाग (परिवहन ४) मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविली आहे. तरी या संदर्भात अपीलकारास आवश्यकती माहिती पुरवावी असे जन माहिती अधिका-यांनी गृह विभागास कळविले. सदरबाब अपीलकारास दि.०६.०९.२००८ च्या पत्रान्वये अवगत केली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.३०.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२२.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) (दोन) येथील परंतूकानुसार जन माहिती अधिका-यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांचा अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता हस्तांतरित केला आहे. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग (परिवहन-४) यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती देणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची नस्ती जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग (परिवहन-४) यांचेकडे आहे. तरी जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास आवश्यकती माहिती पुरविण्यात यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२५०/०२**

**डॉ.दिलीप मल्हारराव पाटील**
**४०८, मंगळवार पेठ, सातारा,**
**ता.जि.सातारा ४१५ ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ.दिलीप मल्हारराव पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०५.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१३.०२.२००७ रोजी अर्ज करुन, मा.राष्ट्रपतीकडून दि.०२.०९.२००० रोजी पाठविलेल्या पत्रास दिलेल्या उत्तराची प्रत जर मा.राष्ट्रपतींना उत्तर पाठविले नसेल तर त्याची कारणे द्यावीत. जन मा.राष्ट्रपतींना उत्तर पाठविले नसेल तर त्यासाठी तर त्यासाठी कोण जबाबदार आहे. जबाबदार अधिका-याविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिका-याने अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची अपीलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे.

सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी. आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३७१/०२**

**श्री.गोविंद लक्ष्मणराव बनसोडे**
**विभागीय सचिव, कास्ट्राईब रा.प.कर्मचारी संघटना,**
**रा.प.विभागीय कार्यालय, लातूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप महाव्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,**
**डॉ.आनंदाराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,**
**डॉ.आनंदाराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गोंविद लक्ष्मणराव बनसोडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०७.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०७.०५.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.एम.जी.बीराजदार, यंत्र अभियंता (चा) राज्य परिवहन, उस्मानाबाद यांचे जातीचे प्रमाणपत्र २) शैक्षणिक प्रमाणपत्र ३) रा.प.सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाचा उतारा (ज्या मध्ये नाव, शिक्षण, जात, धर्म) इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती मध्यवर्ती कार्यालयाच्या कक्षेतील आहे. म्हणून अपीलकाराचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीवर्ग अधिकारी राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्याकडे, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.०७.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे

व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१२.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांने अपीलकाराचा अर्ज उक्त अधिनियमातील कलम ६(३) मधील परंतूकानुसार अपीलकाराचा अर्ज रा.प.महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथील जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी यांचेकडे हस्तांतरित केला आहे. यावरुन सदर प्रकरणी रा.प.महामंडळाच्या मद्यवर्ती कार्यालयातील जन माहिती अधिका-याने माहिती देणे आवश्यक आहे. सदर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२४२/०२**

**डॉ.शैलेश लक्ष्मण हळमनियार**
**सी-३०३, अनुराग, महात्मा सोसा,**
**कोथरुड, पुणे ४११ ०३८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (वैद्यकीय), संचालक (प्रशासन)**
**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**पंचदीप भवन, ६ वा मजला,**
**ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (प्रशासन)**
**आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे कार्यालय,**
**पंचदीप भवन, ६ वा मजला,**
**ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई ४०० ०१३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार डॉ.शैलेश लक्ष्मण हळमनियार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

अपीलकाराच्या गटविमायोजना, १९८२ मधील एकूण शिल्लक व देय रक्कम आयुक्त रा.का.वि.यो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आज तागायत मंजूरी आदेश न दिल्यामुळे अपीलकाराने सदर प्रकरणी एकूण १२ मुद्याबाबत दि.२४.०३.२००८ च्या अर्जान्वये अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.०४.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या वतीने अपीलकारास दि.२५.०६.२००८ च्या पत्रान्वये

उपसंचालक (प्रशासन) यांनी माहिती दिली. माहिती अधिका-यांनी काही माहिती पुरविलीच नाही. इतर काही उत्तरे अपुरी, असत्य व असमाधानकारक होती या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

गट विमा योजना १९८२ मधील शिल्लक व देय रक्कम आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचेकडून विलंबाने मंजूर केली. पहिल्या अपीलाच्या दि.०६.०६.२००८ च्या निकाल पत्रासोबत माहिती अधिका-यांनी कार्यालयीन पत्राची प्रत पुरविली ती समाधानकारक नसूल संशयास्पद वाटते. माहिती अधिका-यावर कारवाई व्हावी. गट विमा योजनेची रक्कम १४ ते १५ महिन्याचा अतिविलंब केल्याबाबत व्याजापोटी अंदाजे रु.१०, ०००/- नुकसान झाल्याबाबत अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. अपीलकाराची गट विमा योजनेची रक्कम उशिराने अदा केली. अपीलकाराने सदर प्रकरणी मागणी केलेली माहिती अपुरी, असत्य व असामाधानकारक व संशयास्पद वाटते असा अपीलकाराचा मुध्दा आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधी नस्ती / कागदपत्र प्रथम अपिलीय निरीक्षणासाठी द्यावीत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधी नस्ती / कागदपत्राचे निरीक्षण करावी. त्यानंतर मागणीनुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबधीत कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात.

<u>आदेश</u>

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६८१/०२**

**श्री.मुरलीधर रामचंद्र झोपे**
**सांख्यिकी अधिकारी,**
**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,**
**जळगांव.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक**
**आरोग्य सेवा संचालनालय,**
**सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार,**
**सी.एस.टी.जवळ, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
**आरोग्य सेवा संचालनालय,**
**सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार,**
**सी.एस.टी.जवळ, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मुरलीधर रामचंद्र झोपे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेतले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.०८.२००८ रोजी अर्ज करून खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

"अपीलकाराच्या दि.१०.१०.२००७ च्या व्दितीय अपीलावर मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे निर्णय क्र.रामाआ-२००७/२७२३७/अपील क्र.७२००७/१६३०/०२ दि.११.०१.२००८ नुसार आरोग्य

सेवा संचालनालयानी केलेल्या कार्यवाहीबाबत सर्व कागदपत्राच्या प्रती. सदर कार्यवाही करतांनाच्या कार्यालयीन टिप्पणीची साक्षांकित प्रत" इत्यादी माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नी. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून वरील परिच्छेद २ मध्ये नमुद केल्यानुसार मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे निर्णयावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थित मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करावी. आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७४३/०२**

**श्री. उल्हास दत्तायेत्र भारंबे**
**१०१, इंद्रलोक, श्रीवेणी पार्क, जेल रोड,**
**नाशिक रोड, जि.नाशिक. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**महाविरतण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**प्रकाशगड, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक**
**महाविरतण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**प्रकाशगड, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.उल्हास दत्तात्रय भारंबे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०९.०६.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१४.०२.२००८ रोजी अर्ज करुन उप कार्यकारी अभियंता (सीव्हील) पदावरील पदोन्नतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याने अपीलकारास दि.०२.०५.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने म्हणजे दि.२८.०४.२००८ रोजी पत्र पाठवून माहिती पुरविण्यास अमर्थता दाखविली. कारण दि.२६ व २७.०७.२००५ या दिवशी झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळ (सा.प्र.वि.कक्ष-४) चे दप्तर भिजून खडून गेल्यामुळे अपीलकाराने मागणी केलेल्या पी.आर.क्र.२८०, २९७ व ३४७ हे सुध्दा नष्ट झाले आहेत. यामुळे अपीलकारास ती उपलब्ध करुन देता येत नाहीत. गोपनीय अहवाल पाहणी करण्यास केलेली विनंती उक्त अधिनियमातील कलम (८) (१) (त्र) अनुसार नाकारली व तसे दि.२८.०४.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३०५/०२**

**श्री. हेमंत माणिकलाल छाजेड**
**६, महावीर सोसा,**
**मोहाडी रोड,**
**जळगांव ४२५ ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वन विभाग (फ-६),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वन विभाग (फ-६),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.हेमंत माणिकलाल छाजेड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०८.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.०१.२००८ रोजी अर्ज करुन, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणा-या उपवनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक दर्जाचे अधिका-याविरुध्द शासनस्तरावरुन कोणती कार्यप्रणाली अवलंबीली जाणार आहे याची माहिती / कार्यालयीन टिप्पणी / नस्ती / कागदपत्रे सर्व माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्जातील परिच्छेद (ii) हा महसूल व वन विभाग का.फ-६ संबंधीत आहे. परंतू संबंधीत माहिती शासन स्तरावर उपलब्ध नसते. म्हणून सदरहू परिच्छेद (ii) संबंधीत माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देण्यासाठी अपीलकाराचा अर्ज मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. तरी अपीलकाराने मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.०१.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले.

अपीलकाराने दि.२५.०१.२००८ च्या पत्रान्वये दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२८.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

१. वन संवर्धन अधिनियत, १९८० कलम ३ चा भंग करणा-या उपसंचालक, वनीकरण यांचे विरुध्द संबंधीत उपवनसंरक्षक हे वन गुन्हे जारी करण्यास टाळाटाळ करित आहेत.

२. महसूल विभागाचे ताब्यातील राखीव / संरक्षित वन लक्षात न घेता आरागिण्या स्थलांतरित करुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करित आहे. या दोन अपीलकाराने माहिती मागीतली होती.

वरील मुध्दा क्र.२ बाबतची माहिती शासन स्तरावर उपलब्ध नसते म्हणून याबाबतची माहिती मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे अपीलकारास कळवून अपीलकाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे हस्तांतरित केला. मुध्दा क्र.१ बाबतची माहिती केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अनुक्रमे दि.२५.०१.२००८ व दि.११.०२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. वन संरक्षक संयुक्त वन व्यवस्थापन २ यांनी अपीलकारास कळविले की, अपीलकाराने मागीतलेली माहिती प्रधान मुख्य वन संरक्षक कार्यालयाकडे उपलब्ध नाही. अपीलकाराचा अर्ज सर्व उप वनसंरक्षक / उप विभागीय वन अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आला आहे. त्यांच्याशी संपर्क साधावा असे दि.१७.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. तसेच सर्व माहिती अधिका-याची सूची अपीलकारास उपलब्ध करुन दिली. तसेच सर्वसंबधीताशी संपर्क साधण्याबाबत कळविले.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** (रामानंद तिवारी)
**दिनांक २९.०६.२००९.** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४५६/०२**

**श्री. कृष्णा बाबल कवठाणकर**
**अे/५०१, सुभाषनगर, सह.गृह.संस्था,**
**संत गोरा कुंभार मार्ग, धारावी,**
**मुंबई ४०० ०१७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (अभियांत्रिकी विभाग)**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.कृष्णा कवठणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२१.०७.२००८ रोजी अर्ज करुन, सी.टी.एस.क्र.४० (पार्ट) धारावी डिव्हीजन येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकाणांतर्गत बांधण्यात आलेल्या सुभाषनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निकृष्ट, अपूर्ण आवस्थेतील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन अपीलकाराने दि.१५.०३.२००८, दि.२२.०५.२००८ रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती परिशिष्ट-२ मध्ये एकाच व्यक्तीच्या नावावर २ सदनिका असलेल्यावर कोणती कारवाई केली. सुभाषनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निवासी संकुळात अे तळमजला येथील १००० चौ.फुटाची जागा विकासकाने मे.शाह इंजिनिअरिंग या वातानुकूलीत भाग बनविणा-या अनधिकृत कारखानदारास विकण्यास कशी परवानगी दिली. प्रकल्प बाधीताकरिता असलेल्या राखीव २० सदनिकांचा ताबा कोणाकडे आहे. २० सदनिका वितरित कोणास केल्या त्याबाबतची माहिती सदर सदनिका कोणत्या प्रकल्पग्रस्तास हस्तांतरित केल्या. इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही तर आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी. आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क आबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५५०/०२**

**श्री. अशोक मोहनलाल मेश्राम**
**विनोबा नगर तुमसर,**
**जि.भंडारा. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**महसुल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अशोक मोहनलाल मेश्राम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन, अपीलकारास अन्नपूर्ती किंवा खनीज निरीक्षक पदावर पदोन्नती मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. कार्यालयाच्या आस्थापनेवर खनिज निरीक्षकाचे पद मंजून नसूल अन्नपूर्वी निरीक्षक हे पद अव्वल कारकूण संवर्गातील आहे. पदोन्नतीची संधी उपलब्ध होत नसल्याने ज्या कनिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचा-यांची नियमीत सेवा १२ वर्षे पूर्ण झालेली आहे अशा कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिला जातो.

श्री.ए.एम.मेश्राम यांना ०१.१०१९९४ पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ मंजूर करण्यात आला असून त्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्याने त्यांना महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली आहे तथापी अव्वल कारकुणांची रिक्त झालेली पदे पदोन्नतीने भरण्यासाठी कनिष्ट लिपीक संवर्गातून सेवा जेष्ठता व पदोन्नतीसाठी आवश्यक आर्हता इत्यादीचा विचार करुन अव्वल कारकून संवर्गात पदोन्नती देण्यात येते. सबब अव्वल कारकुनांची रिक्त झालेली पदे पदोन्नतीने भरते वेळी वरील प्रमाणे श्री.ए.एम.मेश्राम कनिष्ट लिपीक यांचे नाव विचार क्षेत्रात येत असल्यास त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल. असे जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दि.१३.०१.२००५ च्या पत्रान्वये कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळवून त्याची प्रत अपीलकारास पाठविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. महसूल व वन विभागाने, सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या व त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने विभागास दिलेल्या अभिप्रायाच्या टिप्पणीच्या छायाप्रत अपीलकारास आवश्यक शुल्क घेउन १० दिवसात उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे दि.२४.११.२००६ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०५.२००७ च्या पत्रान्वये आवश्यकती माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकारास पदोन्नती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकार यांनी त्यांना अव्वल कारकून पदावर पदोन्नती देण्यासाठी अनुषंगीक माहिती मागीतली होती. दि.२४.०२.२००८ रोजी ५ व दि.१९.०३.२००८ रोजी ३४ पृष्ठे रू.७८/- शुल्क आकारुन अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी, माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकाराने प्रत्यक्ष मंत्रालयात येउन शुल्क भरुन स्वत: माहिती प्राप्त करुन घेतली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. महसूल विभागांतर्गत लिपीक संवर्गातून अव्वल कारकून संवर्गात पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम १९९९ दि.०७.०७.१९९९ रोजी प्रसिध्द केले आहेत. यानुसार सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयामध्ये कनिष्ठ लिपीकांची जेष्ठता यादी तयार करणे अपेक्षीत आहे. अपीलकार यांना पदोन्नती न मिळाल्याने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मूळ अर्ज दाखल केला असल्याचे व याबाबत आद्याप निर्णय नसून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचीबाब जन माहिती अधिका-यांनी

आयोगाच्या निदर्शनास आनली.  सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली कागदपत्र जन माहिती अधिका-यांनी पुरविली आहेत.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४५/०२**

**श्री. विकास गणपतराव शेंडे**
**विकास शेंडे नागरी बँक कॉलनी,**
**राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,**
**हिंदनगर, वर्धा. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृहनिर्माण विभाग.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.विकास शेंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.११.२००७ रोजी अर्ज करुन, विक्री-पत्र करुन दिल्यानंतर तसेच कॉलनी गृहनिर्माण संस्थेला हस्तांतरण केल्यानंतर गाळयातील पैशाबद्दल मागणी म्हाडा कोणत्या नियमाने करते, व्याज १६% कोण्त्या आदेशान्वये आकारण्यात आलेले आहे. याबद्दल गृहनिर्माण मंडळाचे कोणते धोरण आहे. म्हाडा प्रोजेक्ट खर्च त्यावर्षीच करते तर मागील खर्चाबद्दल कोणत्या नियमाने मागणी करते इत्यादी अनुषंगीक एकूण ९ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय

प्राधिका-याकडे दि.२५.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन व्याज व इतर आकारणीबाबत एकूण ९ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती मागीतली दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मुध्देनिहाय सविस्तर माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३३८/०२**

**श्री. महेंद्र आनंदा आहिरे**
**३३५/ए, त्रिशरण चाळ, लुंबिनी बाग,**
**गोवंडी, मुंबई ४०० ०४३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय,**
**राज्य माहिती आयोग,**
**१३ वा मजला नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय,**
**राज्य माहिती आयोग,**
**१३ वा मजला नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.महेंद्र आहिरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.११.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

"मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या दालनातील राष्ट्रपुरुषाच्या प्रतिमा १. छत्रपती शिवाजी महाराज २. क्रांतीबा जोतीराव फुले ३. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ४. राजर्षी शाहू महाराज ५. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या राष्ट्रपुरुषाच्या प्रतिमा दालनाचे नुतणीकरु करण्यापूर्वी आस्तीत्वात

होत्या त्या प्रतिमा दालनाचे नुतणीकरणानंतर लावण्यात आल्या आहेत काय? नसल्यास या प्रतिमा लावण्याबाबत मुख्य माहिती आयुक्तांचे काय आदेश आहेत याबाबत माहिती मागितली होती."

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१४.०१.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबाजवणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६२७/०२**

**श्री. श्रीकांत अंबादास जोशी**
**मातोश्री, केला प्लॉटस, जठार पेठ,**
**अकोला ४४४ ००५. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय,**
**शासकीय दंत महाविद्यालय, सेंट जार्ज हॉस्पीटल कंपाउंड,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय,**
**शासकीय दंत महाविद्यालय, सेंट जार्ज हॉस्पीटल कंपाउंड,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.श्रीकांत जोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२७.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करून एम.एचटी-सीईटी-२००७ या सामाईक प्रवेश परीक्षेची प्रश्न पत्रिका पी.सी.व्हर्शन-२२, सीरीयल नं.२४६६४१ व मॅथ्-व्हर्शन-२२, सीरीयल नं.२३२५४७ या प्रश्नपत्रिकाची मागणी केली होती. मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्र.१७९८/२००२ व इतर समविषयांकित याचिकामध्ये निर्णय देतांना मा.न्यायालयाने विद्यार्थ्यास

मुळ प्रश्नपत्रिका देणे गोपनियतेच्या दृष्टीने आवश्यक नाही असा निर्णय दिला. मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आधार घेउन अपीलकारास माहिती नाकारली.

यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपी दाखल केले. श्री.कार्तिकेय गुप्ता यांनी अशाच प्रकरणी एमएचटी-सीईटी-२००६ च्या प्रश्नपत्रिका प्राप्त व्हाव्यात याकरिता माहितीच्या अधिकारात अर्ज सादर केला होता. कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले होते. राज्य माहिती आयेगाकडे दि.११.०८.२००६ रोजी निर्णय घेउन अपील निकालात काढले होते. राज्य माहिती आयेगाच्या आदेशाविरुध्द श्री.कार्तिकेय गुप्ता यांनी याचिका क्र.२९४७/२००६ मा.उच्च न्यायालयात दाखल केली होती. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.३१.०७.२००७ रोजी निर्णय दिला. सदर निकालामध्ये मा.न्यायालयाने विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही असे नमुद केले. उपरोक्त दोन्ही निकालाच्या अनुषंगाने अपीलकाराची मागणी अमान्य केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०९.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास तसे कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन एम.एच.टी-सीईटी-२००७ सामाईक प्रवेश परिक्षेची पी.सी.ए.ग्रुपची प्रश्नपत्रिका मिळण्याची प्रश्नपत्रिका मिळण्याची मागणी मान्य केली नाही. याच मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.१७९८/२००२ व याचिका क्र.२९४७/२००६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आधार घेउन अपीलकारास माहिती नाकारण्यात आली आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२६२७/०२**

**श्री. श्रीकांत अंबादास जोशी**
**मातोश्री, केला प्लॉटस, जठार पेठ,**
**अकोला ४४४ ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय,**
**शासकीय दंत महाविद्यालय, सेंट जार्ज हॉस्पीटल कंपाउंड,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय,**
**शासकीय दंत महाविद्यालय, सेंट जार्ज हॉस्पीटल कंपाउंड,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.श्रीकांत जोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२७.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन एम.एचटी-सीईटी-२००७ या सामाईक प्रवेश परीक्षेची प्रश्न पत्रिका पी.सी.व्हर्शन-२२, सीरीयल नं.२४६६४१ व मॅथ्-व्हर्शन-२२, सीरीयल नं.२३२५४७ या प्रश्नपत्रिकाची मागणी केली होती. मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्र.१७९८/२००२ व इतर समविषयांकित याचिकामध्ये निर्णय देतांना मा.न्यायालयाने विद्यार्थ्यास

मुळ प्रश्नपत्रिका देणे गोपनियतेच्या दृष्टीने आवश्यक नाही असा निर्णय दिला. मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आधार घेउन अपीलकारास माहिती नाकारली.

यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपी दाखल केले. श्री.कार्तिकेय गुप्ता यांनी अशाच प्रकरणी एमएचटी-सीईटी-२००६ च्या प्रश्नपत्रिका प्राप्त व्हाव्यात याकरिता माहितीच्या अधिकारात अर्ज सादर केला होता. कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले होते. राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००६ रोजी निर्णय घेउन अपील निकालात काढले होते. राज्य माहिती आयोगाच्या आदेशाविरुध्द श्री.कार्तिकेय गुप्ता यांनी याचिका क्र.२९४७/२००६ मा.उच्च न्यायालयात दाखल केली होती. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.३१.०७.२००७ रोजी निर्णय दिला. सदर निकालामध्ये मा.न्यायालयाने विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही असे नमुद केले. उपरोक्त दोन्ही निकालाच्या अनुषंगाने अपीलकाराची मागणी अमान्य केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०९.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास तसे कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन एम.एच.टी-सीईटी-२००७ सामाईक प्रवेश परिक्षेची पी.सी.ए.ग्रुपची प्रश्नपत्रिका मिळण्याची प्रश्नपत्रिका मिळण्याची मागणी मान्य केली नाही. याच मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.१७९८/२००२ व याचिका क्र.२९४७/२००६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आधार घेउन अपीलकारास माहिती नाकारण्यात आली आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब सदर प्रकरणी मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५११/०२**

**श्री. पंढरीनाथ सालीगुंजेवार**
**विदर्भ अवार्ड विनर्स वेल्फेअर असोसिएशन,**
**गुरुदेव नगर, प्लॉट न.१६३, नंदनवन एरिया नागपूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग, (माजी सैनिक कल्याण)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग, (माजी सैनिक कल्याण)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.पंढरीनाथ सालीगुंजेवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपीलकाराने दि.१३.०३.२००८ रोजी अर्ज करुन खालीप्रमाणे माहिती मागीतली होती.

शासनानी केलेल्या शिफारसी प्रमाणे विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती करीता ६१ गुणवत कामगाराची यादी २० फेब्रुवारी, २००८ ला खाजगी सचिव नागपूर पालक मंत्री यांचे कार्यालयात पाठवीली. त्यानुसार खाजगी सचिव यांनी लीस्ट वर पत्ता प्रमाणे कार्यवाही बाबत माहिती अधिकारी २००५ च्या अतंर्गत माहिती देण्याची कृपा करावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२६.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद २ नमुद केलेली माहिती मागीतली होती. शासन पत्र उद्योग, उर्जा व कामगार विभाग, संकीर्ण ०८०७/आर.क्र.३१८/कामगार-८, दि.१६.१०.२००८ व श्री.पंढीरीनाथ एस.सालीगुंजेवार यांचा दि.०३.११.२००७ चा छायांकित अर्ज व इतर पत्रे तसेच विदर्भ अवार्ड विनर्स वेल्फेअर असोसिएशन यांचे दि.३०.०१.२००८ चे पत्र व ६१ व्यक्तींची यादी दि.२५.०७.२००७ चा शासन निर्णय व दि.१५.०१.२००८ चे शुध्दीपत्रक यांच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीकरिता, खाजगी सचिव, मा.मंत्री, वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कलयाण व रोजगार व स्वयंरोजगार तथा पालकमंत्री यांचेकडे दि.२०.०२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी पाठविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. विदर्भ अवार्ड विनर्स वेलफेअर असोसिएशन, नागपूर यांच्या विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीकरिता पाठविलेल्या प्रस्तावावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकाराने मागीतली आहे. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास अवगत करणे आवश्यक आहे. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकाराच्या विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावावर केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५०७/०२**

**श्री.हिरासिंह गुलाबसिंह चंदेल**
**निशांत, वैभव नगर, जिंतूर रोड,**
**परभणी ४३१ ४०१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसूल व वन विभाग (इ-२),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महसूल व वन विभाग (इ-२),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हिरासिंह चंदेल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१४.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०३.२००७ रोजी अर्ज करून, विलंबित सेवा उपदान वाटप रू.१, ५४, ६८८/- या रक्कमेवर मार्च, ९९ ते डिसेंबर, २००१ च्या कालावधीसाठी अनुज्ञेय देय भविष्य निर्वाह निधीवरील व्याज दराप्रमाणे भरपाई देण्यासंबंधी व्याज परिगणना करून कळविण्याची मागणी केली होती. माहितीपोटी रू.३१/- व जलदबवडयाचा टपालखर्च रू.२५/- असे एकूण रू.५६/- इतक्या रक्कमेचा भरणा करावा त्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. महाराष्ट्र नागरीसेवा (वेतन) नियम १९८२ मधील तरतुदीनुसार विलंबाने प्रदान केलेल्या सेवानिवृत्ती लाभावर, (सेवानिवृत्ती वेतनावर रू.२, ३८०/- व सेवानिवृत्ती उपदानावर रू.२९, ४५७/-) एकूण रू.३१, ८३७/- एवढे व्याज

अनुज्ञेय असल्याचे महालेखापाल, नागपूर यांनी कळविले. सदर पत्राची प्रत व व्याज परिगणना तक्ता जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास दि.२१.०५.२००७ च्या पत्रासोबत पुरविली.

अचुक माहिती कळविण्यासाठी जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयातील रेकॉर्ड मागवून दोन्ही पक्षकाराला समोरासमोर विश्वासात घेउन न्याय निर्णय देण्यात यावा म्हणून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२६.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतू आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराच्या निवृत्तीवेतन थकबाकीवर विभागाने १. व्याजाची गणना रू.३, ६५४/- इतकी केली. प्रत्यक्ष वाटप रू.२, ३८०/- इतके केले. २. सेवा उपदान वाटपाची रक्कम रू.९७, ५१५/- गृहीत धरून त्यावर व्याजाची गणना करून रू.२९, ४५७/- वाटप केले. महालेखापाल, नागपूर यांनी अपीलकारास सेवा उपदान रू.१, ५४, ६८८/- मंजूर केले तेवढी रक्कम दोन हप्त्यात जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयाने अपीलकारास वाटप केली आहे. म्हणून रू.१, ५४, ६८८/- इतक्या सेवाउपदानाच्या रक्कमेवर व्याज भरपाई अपीलकारास अनुज्ञेय आहे असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास वरील दोन्ही मुद्याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५१३/०२**

**श्री.हिरासिंह गुलाबसिंह चंदेल**
**निशांत, वैभव नगर, जिंतूर रोड,**
**परभणी ४३१ ४०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महसूल व वन विभाग (इ-२),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महसूल व वन विभाग (इ-२),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हिरासिंह चंदेल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१४.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०८.०३.२००७ रोजी अर्ज करुन, शासन ज्ञापन क्र.स.३०/४३ (अे) २०००/प्र.क्र.१२०/ई-२, महसूल व वन विभाग आणि शासन ज्ञापन समक्रमांक दि.३१.०१.२००७ मधील "मात्र श्री चंदेल यांचे विरुध्द सेवानिवृत्तीच्या दिनांकास विभागीय चौकशी प्रस्तावित असल्यामुळे" हा मचकुर वगळण्यात यावा अशी दि.०८.०३.२००७ च्या अर्जान्वये अपीलकाराने मागणी केली होती. सेवानिवृत्ती दि.२८.०२.१९९९ रोजी विभागीय चौकशी अर्जदाराविरुध्द प्रलंबित किंवा प्रस्तावित असल्याची माहिती कळविण्याची विनंती केली होती. माहिती पोटी रु.२९/- व जलदबटवडयाच्या टपाल खर्चासाठी रु.२५/- असे एकूण रु.५४/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती

उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. विहित शुल्क भरुनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही.

यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०९.२००७ रोजी विलंबाने सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन विभागीय चौकशी सेवानिवृत्तीच्या दिनांकाला २८.०२.१९९९, अपीलकाराविरुध्द प्रलंबित असल्यास आदेशाची / तामील नोटीसीची प्रत उपलब्ध करुन द्यावी. सेवानिवृत्तीनंतर अपीलकाराविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली असल्यास प्रस्ताव पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराने मागणी केली होती. याकरिता अपीलकाराने रु.५४/- इतके शुल्क कार्यालयाकडे भरले. तरीही अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नसल्याचा मुध्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. अपीलकाराच्या सेवानिवृत्ती ज्ञापन दि.३१.०१.२००७ मध्ये अपीलकाराविरुध्द सेवानिवृत्तीच्या दिनांकास विभागीय चौकशी प्रस्तावित असल्याचा उल्लेख केला आहे. यामुळे व्याज अकारणीत विभागीय चौकशी प्रस्तावित होती ती शिक्षा समजून व्याज भरपाईत महालेखापाल, नागपूर कार्यालय कपात करते असा अपीलकाराचा मुध्दा आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक ३०.०६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४८/०२**

**श्री.अनिल बाबुलाल कांबळे**
**उपसंचालक, औद्योगीक सुरक्षा व आरोग्य,**
**उद्योग भवन, ६ वा माळा, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर ४४० ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (कामगार)**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अनिल कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०३.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

श्री.ज.मो.मोटघरे यांची दि.०९.०८.२००१ पासून सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या पदावर नामनिर्देशनाने झालेल्या नियुक्तीनंतर त्यांच्या रिक्त जागी (अनुसूचित जाती) उपसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, अनुसूचित जाती संवर्गातील कोणत्या अधिका-यीच नियमित पदोन्नती झाली.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२९.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-

यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेली माहिती मागीतली होती. श्री.ज.मो.मोटघरे यांना सह संचालक पदावर पदोन्नती दिल्यामुळे निर्माण झालेल्या रिक्त पदी श्री.वि.प्र.देशमुख (खुला प्रवर्ग) यांची उप संचालक पदावर पदोन्नती करण्यात आली. सदर पदोन्नती दि.२२.०२.२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियमित करण्यात आली. सदरबाब अपीलकारास दि.१६.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी असेही अहवालात नमुद केले आहे की, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या उप संचालक संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १३% याप्रमाणे ५ पदे भरणे आवश्यक आहे. मात्र सदर संवर्गामध्ये पदोन्नतीच्या कोटयामध्ये सन १९९७ पूर्वीच अ.जा.प्रवर्गातील ६ पदे भरलेली असल्याने म्हणजेच सदर संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयामधील अनुसूचित जातीचा अनुशेष शिल्लक नसल्याने सदर संवर्गामध्ये जेष्ठतेनुसार श्री.वि.प्र.देशमुख (खुला प्रवर्ग) यांना उप संचालक पदावर पदोन्नती देण्यात आली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०६.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**